रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २५ जून २०२३



# विरोधी पक्षाचे एकजुटीचे बुजगावणे ?

आधुनिक केसरी

लोकसभेच्या२०२४ निवडणुकीत भाजपा व मोदी पराभव करण्याच्या या एकाच उद्देशाने पाटणा येथे विरोधी पक्ष एकवटल्याचे देखावा निर्माण केला जात आहे. या विरोधी पक्षाच्या विचारात मतभिन्नता आहे.अनेक प्रादेशिक व परिवारवादी पक्षाने राज्यावर कब्जा केलेला आहे. अजूनही जागा वाटपाचा निर्णय व्हायचा आहे. तसेच या एकतेच्या गाडीचे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व कोण करणार ? हा प्रश्न कायम आहे. एकतेच्या बैठकीत नेते एकमेकावर कुरघोडी करत होते.यात 'आम्हारे राज्य में तुम्हारा क्या काम है' असे म्हणत प्रादेशिक पक्ष काँग्रेस पक्षाची कोंडी करतोय ! पाश्चात्य देशात आघाड्यांचे राजकारण फार पूर्वीपासून आहे. त्याप्रमाणे भारतात अलीकडे आघाड्यांचा राजकारणाला महत्व आलेले आहे. केंद्रात आघाडीशिवाय सत्ता येवू शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. देशात व अनेक राज्यात १९५२ पासून काँग्रेस पक्षाची एक हाती सत्ता होती. १९६० मध्ये काँग्रेसचा अनेक राज्यात पराभव झाला.

पक्षाच्या नेत्या श्रीमती इंदिरा गांधी यांचे नेतृत्व स्विकारण्यावरुन मतभेद झाले,त्यातून काँग्रेस पक्षाचे दोन वेळेस विभाजन झाले.त्यावेळी काँग्रेस विरोधात कम्युनिस्ट,जनसंघ,समाजवादी पक्ष व इतर विरोधी पक्ष काँग्रेस वर्चस्वाला आव्हान देत होते !विरोधी पक्षात मातब्बर नेते होते.पण त्यांना सत्ता मिळविता आली नाहीत्यांची लढाई काँग्रेस विचाराच्या विरोधात होती.१९६७ मध्ये राममनोहर लोहिया यांनी गैर काँग्रेसवादातून आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.राष्ट्रीय स्तरावरील पक्ष कमकुवत झाला की,आघाडीच्या राजकारणाला पोषक वातावरण निर्माण होते. देशात १९५३ पासून



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


राज्यस्तरावर आघाड्याच्या पासून राजकारणाला सुरुवात झाली.देशात व राज्यात आघाडीशिवाय सत्ता मिळविता सत्ता मिळविता येत नाही.हे राजकीय लक्षात आले त्यातून सत्ता प्राप्तीसाठी नैतिक,अनैतिक मार्गाचा अवलंब केला जाऊ लागला आहे ! आज काँग्रेस पक्ष कमकुवत झाला आहे,यामागे पक्षातील अनेक नेत्यांनी पक्ष सोडून स्वंतत्र पक्ष स्थापना केली.यात ममता बॅनर्जी, शरद पवार आदी नेते आहेत.१९७७ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी एकाधिकारशाहीच्या विरोधात भारतीय जनसंघ,भारतीय लोकदल,समाजवादी,काँग्रेस ( ओ ) एकत्र आले व त्यांनी जनता पार्टी स्थापन केली.या आघाडीने ५४३ जागापैकी २७१ जागावर विजय मिळविला.देशात स्वातंत्र्यानंतर ३० वर्षांनी बिगर काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले होते. बिगर काँग्रेसचे पंतप्रधान मोरारजी देसाई झाले होते.नंतर आघाडीतील मतभेदामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. नंतर चरणसिंग यांना काँग्रेसने बाहेरून पाठिंबा दिला व ते पंतप्रधान झाले ! पण ऐनवेळी काँग्रेसने चरणसिंग यांचा पाठिंबा काढला त्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. पुन्हा १९८९ काँग्रेस पक्ष सत्तेत आला.१९८८ मध्ये व्हि,पी सिंग यांनी राष्ट्रीय मोर्चाची स्थापना केली.यावेळी विरोधी पक्षांनी काँग्रेस विरोधी मतांची विभागणी टाळण्यासाठी राजकीय व्यूहरचना तयार केली.तरी काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत.जनता दल,मार्क्सवादी कन्युनिस्ट, भाजपा सात पक्षांच्या पाठिंब्याने राष्ट्रीय मोर्चा स्थापना झाली होती.या आघाडीचे नेतृत्व व्हि,पी सिंग हे नेते व ते पंतप्रधानही झाले !पण नंतर भाजपाने पाठींबा काढून घेतल्यानंतर सिंग सरकार कोसळले !राष्ट्रीय पातळीवर एकाही राजकीय पक्षाला बहुमत मिळत नसल्याने चंद्रशेखर, एच.डी,देवगौडा,आय.के.गुजराल अटल बिहारी वाजपेयी हे पंतप्रधान- पदावर अल्पकाळ राहता आले.१९९९ मध्ये २४ घटक पक्षानी मिळून 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' स्थापन करण्यात आली होती.यातून अटल बिहारी यांचे देशाचे नेतृत्व आले.तेंव्हा जयललितांनी वाजपेयी सरकार समोर अडचणी निर्माण केल्या.त्यामुळे वाजपेयी सरकार कोसळले.

माजी पंतप्रधान पी.व्हि, नरसिंहराव व व्हि पी.सिंग,अटलबिहारी वाजपेयी,मनमोहनसिंग यांना भिन्न विचारसणीच्या पक्षांना सोबत घेत सरकार चालविण्यासाठी कसरत करावी लागली.त्यानंतर काँग्रेसने विविध पक्षाची मोळी बांधून राष्ट्रीय पुरोगामी आघाडी स्थापन केली.या आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी होत्या तर मनमोहनसिंग पंतप्रधान झाले खरे ! पण त्यांना प्रत्येक निर्णय घेतांना श्रीमती गांधी यांची संमती घ्यावी लागत असे.मनमोहनसिंग यांनी पंतप्रधानपदाचा काळ पूर्ण केला.तेंव्हा सरकारमधील घटक पक्ष सरकार मध्ये मनमानी करत होते,यातून देशात अनेक घोटाळे झाले !यात स्वच्छ चारित्र्याचे नेते ओळखले जाणारे नेते मनमोहनसिंग यांची प्रतिमा मात्र मलिन झाली. काँग्रेसपक्ष बदनाम झाला.देशात अस्थीर सरकार आल्याने मध्यावधी निवडणुकीला सामोरे जावे लागलेले आहे.देशात प्रथम २०१४ मध्ये विरोधी पक्षाला म्हणजे भारतीय जनता पक्षाला बहुमत मिळाले व सत्तेत आला.पंतप्रधान मोदी यांनी गेल्या नऊ वर्षात अनेक शेतकरी ,गरीब माणसासाठी महत्वपूर्ण निर्णय घेतले.तसेच तीन तलाक, कलम ३७० या धाडसी निर्णय घेतले.देशाची अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर आहे.प्रगत राष्ट्र पंतप्रधान मोदींना विश्व गुरू मानत आहेत.पण दुसरीकडे देशातील विरोधी पक्ष मोदींना व भाजपाला सत्तेतून घालविण्यासाठी आतूर झालेला आहे.याचे प्रमुख कारण म्हणजे, भ्रष्टाचार हेच आहे !विरोधी पक्षाचे नेते भ्रष्टाचारात अडकले आहेत.यात का आही नेत्यांना अटकेची भीती वाटते आहे !त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मोदींना हटविले पाहिजे, यासाठी ते व्यूहरचना तयार रचत आहेत !आज देशात मोदी विरोधात लाट तर विरोधी पक्षाबद्दल सहानुभूती दिसून येत नाही. विरोधी पक्ष नेत्याकडे मोदी विरोधात वातावरण निर्माण करण्यासारखे तसे विरोधी पक्षाकडे प्रश्न नाहीत ! पाटण्याच्या बैठकीला काँग्रेससह १५ विरोधी पक्षाचे नैते होते.यात चार तास मंथन झाले.यात मोदी विरोधात एकजूट करण्याचा निर्धार करण्यात आला.विरोधी पक्ष एकजूट दाखवित असला तरी तो आतून पोखरलेला आहे !कारण याचे आघाडीचे नेतृत्व कोण करणार ? असा प्रश्न आहे,यात राहूल गांधी,नीतीशकुमार, ममता, शरद पवार,केजरीवाल यांची पंतप्रधान होण्याची सूप्त इच्छा आहे.पण ज्या राज्यात प्रादेशिक पक्ष मजबूत आहे तेथे काँग्रेसने काय काम ? तेथे काँग्रेसने शिरकाव करू नये ! काँग्रेसने त्याग करावा, असा सल्ला दिला जात आहे ! म्हणजे भाजपाचे काँग्रेसमुक्त धोरण प्रादेशिक पक्ष अंमलात आणत आहे !या एकजुटीत काँग्रेस पक्षाची कोंडी होणार आहे. देशात लोकसभेच्या ५४३ जागा आहेत.केंद्रात सत्ता येण्यासाठी विरोधी पक्ष आघाडीला किमान २७२ जागा जिंकाव्या लागतील ! पण आज यातील प्रत्येक नेता आपला गड कसा सांभाळता येईल याचा विचार करत आहेत !यातून काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय पातळीवर बळी दिला जाण्याची शक्यता आहे !लोकसभेच्या सर्वात अधिक जागा उत्तरप्रदेशमध्ये,म्हणजे ८० जागा आहेत ! उत्तरप्रदेश मध्ये योगी सरकार मजबूत आहे. या उत्तरप्रदेशमध्ये राहुल गांधी, मायावती व अखिलेश यादव हे तिघे एकत्र येवून राज्यात योगी सरकारला पराभूत करू शकले नाहीत. त्यानंतर महाराष्ट्रात ४८ जागा आहेत.यात महत्वाचे राज्यातील लोकसभेच्या जागा वाटपाचा प्रश्न महत्वाचा आहे.यावरुन विरोधी पक्षात वाद निर्माण होईल निर्माण होईल असे दिसतेय ! आम आदमीचे नेते केजरीवाल हे तर राजकारणात नैतिकतेच्या आधारावर आले,त्यांनी काँग्रेसमध्ये भ्रष्ट नेते असून त्यांना जेलमध्ये टाकले पाहिजे असे जाहीरपणे टीका केली होती. तोच भ्रष्टाचारात बुडाला आहे.दिल्ली देशाची राजधानी आहे,त्यामुळे दिल्ली सरकार तेथे केंद्र शासित राज्य आहे.काँग्रेस राजवटीत दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा दिलेला गेलेलानाही.तर केजरीवाल यांना दिल्ली इतर राज्याप्रमाणे सर्व अधिकार हवे आहेत प्रशासकीय बदल्याचे बाबत केंद्र व आम आदमी यांच्यात वाद निर्माण झाला.यातून प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेला, न्यायालयाने आम आदमी सरकारच्या बाजूने निर्णय दिला.हा निकाल येताच ! केजरीवाल सरकार रातोरात फाईल पळविणे व अधिकाऱ्याच्यावर बदल्याचा दबाब आणत होते ! केंद्राने प्रशासकीस सेवेतील नियंत्रणाबाबतचा वटहुकूम काढला.हा वटहुकूम असंवैधानिक आहे,असे केजरीवाल म्हणत आहे,पण घटनेने केंद्राला तसे अधिकार आहेत.केंद्राच्या वटहुकूम राज्यसभेत फेटाळला जावा,हे केजरीवाल यांचे राजकारण आहे.यासाठी विरोधी पक्षाचा पाठींबा मिळविण्यासाठी ते देशभर भ्रमण करत आहेत. ते काँग्रेसला "ब्लॅकमेल' करू पहात आहेत केजरीवाल याबाबत दिशाभूल करत आहेत. पश्चिम बंगालमध्ये ममता दीदीचे राज्य आहे !तेथे काँग्रेस व डाव्या आघाडीत तीव्र मतभेद आहेत दीदी या आघाडीतील इतर पक्षाला आपल्या राज्यात जागा सोडतील काय ?ते शक्यच नाही ! केजरीवाल आपण भाजपाविरोधी दाखत असले तरी ते काँग्रेस पक्षाला दिल्ली व पंजाब राज्यात मदत करणार नाहीत.

महाराष्ट्रात तीन पक्षाची आघाडी आहे.शिवसेनेचे नेते उध्दव ठाकरे हे आजपर्यंत महेबुबा मुफ्ती ( पी,डी. पी.) वरून भाजपावर टिप्पणी करत होते,आता तेच मुक्ती यांच्यासोबत व्यासपीठावर बसणार आहेत काय ? राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व सेना तीन वाटेकरी आहेत ! काँग्रेस पक्षाचे चार राज्यात सत्ता आहे ! या राज्यात काँग्रेस इतर पक्षाला जागा सोडेल काय ? याला विरोधी पक्षाची एकजूट म्हणावयाचे काय ?काँग्रेस पक्षाने तर राष्ट्रीय अधिवेशनात स्वबळावर निवडणूका लढविण्याचा निर्णय घेतलेला होता,पण आता पक्षाला तिलांजली द्यावी लागणार आहे.या पक्षावर प्रादेशिक पक्षाची मदत घेण्याची दुर्देवी वेळ आली आहे.हि एकजूट म्हणजे 'तुझे माझे जमेना,तुझ्यावाचून करमेना' अशी विरोधी पक्षक्षाची अवस्था आहे.विरोधी पक्षाच्या एकजुटीच्या या प्रयोगात ओरिसा,तेलंगणा,आंध्रप्रदेश,तसेच बसपा आदी पक्षाचे नेते बैठकीला आलेले नाहीत.दुसरीकडे भाजप सुध्दा लोकशाही आघाडीत इतर पक्षाला सामील करून घेऊन आपले बळ वाढवित आहे. तेंव्हा भाजपाच्या विरोधात सर्वच विरोधी पक्ष विरोधात आहेत,असे म्हणणे चुकीचे आहे. त्यामुळे विचारात भिन्नता व मनभेद असलेले नेते एकत्र कसे येतील ? हा यक्ष प्रश्न आहे.देशात पुन्हा अस्थीर सरकार आणण्याचा डाव खेळला जात आहे.विरोधी पक्षात जागा वाटपावरुन मतभेद निर्माण झाले ते स्वंतत्रपणे निवडणूक लढवतील व निकालानंतर एकत्र येतील, अशी शक्यता आहे.भाजपाच्या विरोधात विरोधी पक्षाने जरी एकजुटीचा निर्धार केला असला तरी निवडणुकीपूर्वी एकजुटीच्या प्रयोगाचा भोपळा फुटेल ! हे निश्चितच !





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अनेक क्रांतिकारकांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी रात्री जागून काढल्या आहेत. त्यांच्या अस्वस्थेतेच्या अनेक रात्रींनी त्यांना विचारांचे बळ दिले आहे. म्हणून तर कुसुमाग्रजांसारखा शतकातून होणारा एखादा कवी सुंदर ओळी लिहून जातो,

'कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल.
सरणावरती आज आमची पेटतात प्रेते
उठतील त्या ज्वालांतून भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायामधले खळखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार.

अशा अनेक प्रकारच्या क्रांती आणि क्रांतिवीरांना रात्रींनी बळ दिले आहे. अनेक लेखक आणि कवींना जशी पहाटेच्या वेळेने स्फूर्ती दिली आहे, तशीच रात्रींनीही दिली आहे. 'अन्नदाता' या चित्रपटात एक गाणे आहे, रातोंके साये घने, जब बोझ दिल पे बने


न तो जले बाती, ना हो कोई साथी
फिर भी न डर अगर बुझे दिये
सहर तो हैं तेरे लिये.

कवी म्हणतो, 'रात्र जरी अंधारी असली, कोणताही दिवा लागलेला नसला आणि कोणीही जोडीदार सोबत नसेल तरी घाबरू नकोस. तुझ्यासाठी ( सहर ) पहाट होणार आहे.' एक उज्ज्वल पहाट, एक उज्ज्वल उद्या तुझी वाट पाहतो आहे. केवढे बळ देणारे हे शब्द ! असेच अजून एक गाणे मला आठवते. 'ऍन इव्हिनिंग इन पॅरिस' या चित्रपटातले हे सुंदर गीत आहे.

रात के हमसफर, थक के घर को चले झुमती आ रही हैं सुबह प्यार की.

'रात्र हे आयुष्यातील कष्टांचे, संकटांचे प्रतीक आहे. तुम्ही कष्ट, संकटे, आयुष्यातील कठीण काळ यांना धैर्याने सामोरे गेलात की मग 'झुमती आ रही हैं सुबह प्यार की' हे खरे होणारच ! प्रेमाने भरलेली, सुहास्यवदना सकाळ मग तुमचीच ! तुम्ही ज्या रंगात रंगवाल तशी रात्र भासते. तुम्ही आनंदी तर रात्र आनंदी, तुम्ही दुःखी तर रात्र तशीच भासणार. एकटे एकांतात असताना कधी ती भयाण रात्र वाटणार. तर कधी ती आपल्याला हवी तशी. तुमचा जसा मूड असेल, तशी ती तुम्हाला भासेल. तुम्हाला तुमचा दिवस प्रसन्न हवा असेल तर तुमची रात्र आनंदात घालवा. पावसाळ्यातील रात्रींनी निरनिराळी गाणी लिहिण्याची कवींना प्रेरणा दिली. ' अजून आठवे ती रात पावसाळी...' असे एक कवी म्हणतो. तर हिंदीत अनेक कवींनी पावसावर गाणी लिहिली. त्या वर्षावात नायक, नायिका आणि चित्रपट रसिकही चिंब भिजले.



# आनंदी पहाट

## प्रत्येकाने प्रत्येक क्षण आनंदाने जगावा

आधुनिक केसरी

जसे भूतकाळाचे भूत आपल्या मानगुटीवर बसलेले असते, तसेच काहीसे भविष्यातील विचाररूपी राक्षसदेखील आपल्या हात धुवून मागे लागलेला असतो. अनेकदा भूतकाळातल्या आठवणी आपल्याला स्वस्थ बसू देत नाहीत; तर काहीवेळा भविष्याची चिंता, काळजी आपल्याला काही सुचू देत नाही. कितीही ठरवले आणि काहीही केले, तरीही आपण मात्र ह्याच दुष्ट्चक्रांत अडकतो. गेलेला काल आपल्याला विसरणेच संयुक्तिक ठरते आणि येणाऱ्या उद्याच्या चिंतेत व्यथित न होता आजचा वर्तमानातला दिवस आनंदात व्यतीत करणे अधिक महत्वाचे, आवश्यक, जरुरीचे आणि गरजेचे असते. गेलेला काल आपल्या हातातून निसटून गेलेला असतो आणि उद्याची प्रत्येक घडोमोड ही येणारा काळ ठरवतो. अर्थात, उद्याचा येणारा प्रत्येक क्षण विलक्षण कसा करता येईल, त्याची सुरुवातच सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहाराने कशी होईल, हे आपण अभ्यासपूर्ण वैचारिक मंथनातून ठरवू शकतो आणि त्यानुरूप कार्यकृती करू शकतो. ह्याठिकाणी आकर्षणाचा सिद्धांत ( लॉ ऑफ अ‍ॅट्रॅक्शन ) ह्या सिद्ध आणि स्पष्ट झालेल्या शास्त्रीय प्रयोगाचा वापर उपयुक्त ठरू शकतो. थोडक्यात, आपल्या आंतरिक इच्छाशक्तीच्या जोरावर आपण आपली कार्यसिद्धी करू शकतो, त्यांत भरघोस यशही संपादन करू शकतो, अशा दृष्टीकोनातून आकर्षणाचा सिद्धांत आपल्या सुखी, आनंदी आणि मनःशांती देऊ करणाऱ्या उद्यासाठी आपण आजपासून रोजच वापरू शकतो. आपल्या भविष्यातील योग हे नशिबावर नाही तर आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार यांवर अवलंबून, आधारलेले असतात. त्यासाठी वर्तमानातील आपण प्रत्येक क्षण आनंदाने जगावा.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# विश्वास

आधुनिक केसरी

जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला. असा एक सुविचार आहे. विश्वासाला तडा गेला की पुन्हा नाते विश्वासाचे राहत नाही .पुढे काही मार्ग उरत नाही .पण तरीही किमान आपल्या माणसावर तरी विश्वास ठेवावा लागतो. नाहीतर जगण्याची आशाच उरत नाही. जग हे विश्वासावर चालते. प्रत्येक ठिकाणी आपण हजर राहू शकत नाही, तेव्हा तिथे विश्वासावरच काम चालतात. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कामवाली बाई वर विश्वास ठेवावाच लागतो. तिच्या भरवशावर घर सोडावे लागते. पाळणा घरात मुलं सोडावी लागतात . काळजाचे तुकडे दुसऱ्यांकडे सोपवताना विश्वास ठेवावाच लागतो. जग हे मिथ्या आहे असे जरी आपण मानले तरी विश्वास शाश्वत सत्य आहे. तो ठेवावाच लागतो. प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी प्रत्येक व्यक्तीवर विश्वास ठेवावा लागतो. मुक्या प्राण्यांवर सुद्धा आपण विश्वास ठेवतो. कुत्रीही खूप इमानदार असतात .म्हणून राखणदार म्हणून त्यांना पाळतात. मालकांशी ते प्रामाणिक राहतात .रात्री मालक झोपले असता ते इमानदारीने राखण करतात. कोणी अनोळखी आल्यास ते लगेच भुंकतात. मालकाचा त्यांच्यावर विश्वास असतो. मालक लगेच उठून पाहतो ,कोण आलंय का ? किती विश्वास असतो मालकाचा त्या प्राण्यावर. असाच विश्वास आपल्याला आपल्या मुलांवर सुद्धा ठेवावा लागतो. मुले जे काय करतील ते चांगलंच करतील. असा ठाम विश्वास त्यांच्यावर असावा. मुलांचाही आपल्या आई-वडिलांवर तेवढाच विश्वास असावा. जसे की नदीच्या पुरात घर पूर्ण वाहून गेले तरी मुलांना पूर्ण विश्वास असतो की माझे बाबा पुन्हा सगळं उभं करतील. मुलांसाठी बाप म्हणजे समुद्रातलं एक जहाज असतं. पाण्यात न भिजवता किनाऱ्यावर अलगद ते सोडतात. विश्वास जरूर ठेवावा .पण कोणाचा विश्वासघात करू नये. काचेचा ग्लास हातातून खाली पडावा आणि तो टचकन फुटून त्याच्या इतस्तः काचा व्हाव्यात. त्या वेचताना हाताला जखमा होतात. तसं आपल्या मनाचं, हृदयाचं होऊ नये. काचा भरून घेतल्या जातील, दुसरा ग्लास आणल्या जाईल, पण मानवाचं हृदय, त्याचं मन हे जर फुटलं तर ते पुन्हा जोडता येत नाही. जसा मोती हातातून खाली पडला असता तो फुटतो त्याला आपण जोडू शकतो. परंतु मनाला पुन्हा जोडता येत नाही. विश्वास संपादन करण्यासाठी कित्येक कालावधी लागतो. पण विश्वासघात करायला एक क्षणही लागत नाही इतकं प्रामाणिकपणे, इमानदारीने वागावं की कधीकाळी शत्रूलाही वाटलं पाहिजे की हा माझा शत्रू जरी असला तरी पण विश्वासू आहे. कधीही विश्वासघात करणार नाही.समोरच्या व्यक्तींना आपल्यावर विश्वास ठेवावा त्यासाठी त्या विश्वासास पात्र आपण असायला पाहिजे. काच फुटल्यावर ती वेचताना सहज हातात घुसते ,हात रक्तबंबाळ होतो ,.तसं विश्वासघाताने कोणाचे हृदय रक्त वंबाळ होऊ नये....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-3

# निरूपण

आधुनिक केसरी

**यत्र यान्ति जनास्ते वै तत्र तत्र सुखं महत्|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| २९ || असे तुझे स्मरण करणारे लोक जेथे जातात, तेथे तेथे महान असे सुख त्यांच्या मागे मागे जाते. म्हणून तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**गृह सम्पति मन्दिर महल, देश राज सब साज । सब प्रभु का जन जानते, आप भजन रत काज ।।३३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/३३**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
विवेकी संत गृह, संपत्ती, महाल आणि देशाचे सुशोभित समस्त राज्य तसेच धन हे सर्व परमेश्वराचे आहे असे जाणून आपल्या भक्तीत रममाण असतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥२॥
तुका म्हणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥३॥
काय कशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ॥१॥
अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ॥ध्रु.॥
काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥२॥
तुका म्हणे प्रेमें विण । बोले भुंके अवघा शीण ॥३॥
शिंदळा साल्याचा नाहीं हा विश्वास । बाईल तो त्यास न विसंभे ॥१॥
दुष्ट बुद्धि चोरी करी निरंतर । तो म्हणे इतर लोक तैसे ॥२॥
तुका म्हणे जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ॥३॥
काला चेंडुफळी - अभंग १००
झेला रे झेला वरचेवर झेला । हातिचें गमावी तो पाठीं साहे टोला ॥१॥
त्रिगुणाचा चेंडू हातें झुगारी निराळा । वरिलिया मुखें मन लावी तेथें डोळा ॥ध्रु.॥**

# स्थूलपंचमहाभूते

आधुनिक केसरी

'पाणी' या पंचमहाभूताचा अभ्यास आपण करणणार आहोत. या जगात पाणी कसे आले पाण्याचा आपल्याला कसा आणि किती उपयोग होतो हे वेगळे सांगायला नकोच. विहीर, आड,तलाव ,बारव, निरनिराळ्या नद्यांच्या रूपाने मिळणारे पाणी, सागराच्या रूपाने मिळणारे पाणी. छोटे छोटे ओहळ,कालवे ,धरणे बांधून अडवलेले पाणी पावसाच्या रूपाने मिळणारे पाणी. या व्यतिरिक्त आणखी काही नवीन आश्चर्य कारक पाण्याचे स्त्रोत आपण आता पहाणार आहोत. श्लोक-- क्षारक्षीरसुरासप्रिर्दधि इक्षुर्जलं तथा मिठाचा, दुधाचा, दारूचा, तुपाचा, दह्याचा, उसाच्या रसाचा आणि गोड पाण्याचा असे सात समुद्र आहेत. ज्यातुन मीठ मिळते तो मिठाचा समुद्र हे आपण समजू शकतो. म्हणून त्याला क्षारसमुद्र असे म्हणतात. दुधाचा समुद्र--व्याघ्रपाद ऋषींचा मुलगा उपमन्यु ह्याला दुध मिळत नव्हते तेव्हा त्याच्या आईने पीठ कालवलेले पांढऱ्या रंगाचे पाणी त्याला दूध म्हणून देत असे. एकदा उपमन्यू बालक मित्राच्या घरी खेळायला गेला. तिथे खेळून दमल्यावर मित्राच्या आईने सर्व मुलांना दूध प्यायला दिले . घरी आल्यावर त्याने आईल खरे दूध कसे असते हे सांगितले. मला पण असे खरे दूध प्यायला दे असे त्या उममन्यू बालकाने माते कडे हट्ट केला. आईने त्याला असे दूध फक्त देवचं देतो असे आपल्या बालकाला सांगितले ,आता त्याने देवाकडे दूधासाठी हट्ट धरला, "बालहट्ट"आहे म्हणल्यावर देव थोडेचं गप्प बसणार! देवाने त्याला क्षीरसागर देऊन टाकला. आता बालक केवढा खूष झाला असेलना,त्याने हे तपश्चर्येने हे मिळवले. म्हणून पवित्र अंतकरणाने काही मागितले तर देव ती ईच्छा पूर्ण करतो.हे या क्षीरसागराच्या व उपमन्यूच्या गोष्टी वरून लक्षात येते. एक सागर दारूचा आहे. एक सागर पातळ तुपाचा आहे एक सागर गोड्या पाण्याचा आहे. प्रुथ्वीच्या तिनही लोकात पाणी आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सुखदु:ख मनावर अवलंबून आहे

आधुनिक केसरी

जिथे रोग असेल तिथेच औषध लावले तर उपयोग होईल. दुःखाचे मूळ कुठे आहे हे प्रथम पहावे. प्रपंचात काही न्यूनता पडली की दुःख होते. श्रीमंताच्या किंवा गरिबाच्या सुखदुःखात तसा फरक तो कोणता ? एखाद्याजवळ पैसा पुष्कळ आहे परंतु मूलबाळ नाही म्हणून तो दुःखी असतो; तर दुसऱ्याला संतती आहे पण पैसा नाही, म्हणून तो कष्टी होतो. तिसऱ्याला संतती, संपत्ती वगैरे सर्व आहे परंतु पोटदुखीच्या विकाराने तो बेजार आहे. एकंदरीत सुखदुःखे कोणालाही सुटली नाहीत. जितक्या गोष्टी कमी पडल्या तितक्या प्रयासानेसुद्धा आणल्या तरी पण न्यूनता काही सरत नाही. दुःखावर आपण वरवर उपाय करतो परंतु आपल्या दुःखाच्या मुळाशी आपले मनच आहे हे नाही आपल्या ध्यानात येत. खरोखर, सुखदुःख हे वस्तूत नसून आपल्या मनःस्थितीवरच अवलंबून आहे. वस्तू चोरीला गेली त्या वेळी झोपेत, आनंदात होता; पण जागे झाल्यावर, वस्तू गेल्याचे समजल्यावर दुःखी झाला. म्हणजे दुःखी होते ते मन. तेव्हा औषध द्यायचे ते मनाला द्या. संतांनी मनाला शिकवण दिली.



आजवर आम्ही विषयसुख सख्ख्या मुलाप्रमाणे भोगले, आणि परमार्थ सावत्र मुलासारखा केला. सावत्र आईप्रमाणे आम्ही मनाला शिकविले. ज्याचा सहवास झाला, त्याप्रमाणे मनावर परिणाम होऊ लागले. विषयाचा सहवास गर्भापासून आपण ठेवतो, म्हणून विषयापासून मिळणारा आनंद खरा असे मानू लागलो. ज्याचे बीज लावावे त्याची फळे खावी. आपण विषयाचे बी पेरतो, आणि विषयाची फळे दुःखदायक आहेत म्हणून मग शोक करतो, याला काय करावे ? व्यापारी दरवर्षी आढावा घेतात त्याप्रमाणे, माझे विषय किती कमी झाले हे आपण पहावे. जितकी प्रपंचाकरिता तळमळ करतो, तितकी भगवंताकरिता करावी. प्रपंचातल्या अनुकूल परिस्थितीपेक्षा प्रतिकूल परिस्थिती हीच परमार्थाला जास्त उपकारक आहे. परमार्थ हा परिस्थितीवर, श्रीमंती-गरिबीवर, रोगी-निरोगीपणावर वगैरे कशावरही अवलंबून नाही. मनाची स्वस्थता, अंतःशुद्धता, आचरणाची पवित्रता यांवर तो अवलंबून आहे. प्रपंचातल्या सोयी आणि गैरसोयी या दोन्ही परमार्थाच्या आड येतात. आपण रस्त्यातून चाललो असताना, एखादे अत्तराचे दुकान पाहून थांबलो काय किंवा मिरच्यांचे दुकान पाहून थांबलो काय, रस्ता चालण्याच्या दृष्टीने दोन्ही घातकच ठरतात. प्रपंच मुळात चांगलाही नाही आणि वाईटही नाही, आपण आपली आसक्ती त्यात कालवतो म्हणून आपल्याला तो सुखदुःख देतो. ही आसक्ती काढणे याचेच नाव परमार्थ होय. **आजचे बोधवचन आहे - १६३. त्याच गोष्टी 'आसक्ति' सोडून करणे याचे नाव परमार्थ. श्रीराम समर्थ**

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**स्पृशन्नपि गजो हन्ति जिघ्रनपि भुजङ्गमः
हसन्नपि नृपो हन्ति मानयन्नपि दुर्जनः
स्पष्टीकरण - या श्लोकाचा मुख्य रोख आहे तो असा - राजा (सत्ताधारी) आणि दुर्जन यांच्याशी फार लगट करू नये. त्यांचे बोलणे आणि करणे या दोन गोष्टीत तफावत असते. आपण मात्र विश्वास धरून चालतो. पण असा विश्वास धरू नये.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, २५ जून २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 25 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-282 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# पाटण्याच्या बैठकीमुळे 'मविआ'ला आले बळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पाटण्यात झालेल्या विरोधकांच्या बैठकीत भाजपच्या विरोधात देश पातळीवर एकत्रित लढण्यावर विरोधकांचे एकमत झाल्याने राज्यातही महाविकास आघाडीला बळ मिळणार आहे. जागावाटपाचा तिढा सोडविण्याचे तिन्ही पक्षांसमोर मोठे आव्हान असेल.

पाटण्यातील बैठकीला राष्ट्रवादीचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्यासह कार्याध्यक्ष प्रफुल पटेल व सुप्रिया सुळे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे व संजय राऊत हे उपस्थित होते. या बैठकीत भाजपला पराभूत करण्याकरिता एकत्रित निवडणूक लढविण्यावर सहमती झाली. राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने एकत्र लढण्याचे तत्त्वतः मान्य केले असले तरी अधूनमधून स्वबळाचे नारे दिले जातात. पाटण्यातील बैठकीत एकत्र लढण्यावर सहमती झाल्याने राज्यात काँग्रेस नेत्यांना आघाडीचा निर्णय मान्य करावा लागणार आहे.

तीन पक्षांमध्ये एकत्र लढण्यावर एकमत असले तरी जागावाटप हा कळीचा मुद्दा ठरला आहे. तिन्ही पक्षांना अधिकच्या जागा हव्या आहेत. तसेच कोणीच माघार घेण्यास तयार नाही. विरोधी पक्षनेते अजित पवार आणि शिवसेनेचे संजय राऊत यांनी जागावाटपाचे सूत्र जाहीर करून टाकले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी हे सूत्र फेटाळून लावले आहे.

# लवकरच रशियाला एक नवा राष्ट्राध्यक्ष : येवगिनी ग्रिगोझीन

आधुनिक केसरी न्यूज

**मॉस्को : रशियामध्ये राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनीच निर्माण केलेल्या वॅग्नर या सत्ताबाह्य खासगी लष्कराने बंडखोरी केली आहे. या लष्करी संघटनेचा वापर देशाबाहेरच्या दहशतवादी कारवायांसाठी केला जायचा. विशेष म्हणजे या वॅग्नर लष्कराचा युक्रेन युद्धामध्येही वापर झाला. मात्र, हे युद्ध लांबले आणि त्यात वॅग्नरचे मोठे नुकसान झाले. यानंतर आता या खासगी लष्कराने पुतिन यांच्याविरोधात बंडखोरी केली. तसेच पुतिन यांनी चुकीचा मार्ग अवलंबला, आता लवकरच रशियाला एक नवा राष्ट्राध्यक्ष मिळेल, असे सूचक वक्तव्य केले.**

पुतिन यांनी बंडखोर खासगी लष्कराला संपवण्याची शपथ घेतल्यानंतर आता वॅग्नर लष्कराचा प्रमुख येवगिनी ग्रिगोझीनने पुतिन यांनी चुकीचा मार्ग अवलंबल्याचे म्हटले आहे. तसेच लवकरच रशियाच्या जनतेला नवे राष्ट्राध्यक्ष मिळतील, असे सुतोवाच केले. वॅग्नर लष्कराने रशियाच्या दोन शहरांवर आपलं नियंत्रण असल्याचा दावा केला आहे. याशिवाय वॅग्नरने रशियन सैन्याचे तीन हेलिकॉप्टर पाडल्याचाही दावा केला आहे. दरम्यान, वॅग्नर लष्कराच्या बंडानंतर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी वॅग्नर लष्करावर देशाशी गद्दारी केल्याचा आरोप केला आहे. ते म्हणाले, रशियात जे घडत आहे ती गद्दारी आहे. व्यक्तिगत महत्त्वकांक्षेमुळे देशद्रोह करण्यात आला आहे, असाही आरोप पुतिन यांनी केला आहे.ज्यांनी जाणीवपूर्वक खासगी दहशतवादी मार्गाने सशस्त्र बंड केला आहे, त्यांना कठोर शिक्षा होईल. युक्रेन युद्धात वॅग्नर लष्कराचे मोठे नुकसान झाले. त्याची जबाबदारी घेणे पुतिन यांनी टाळले आणि म्हणून ही बंडखोरी झाली. आता त्याचे रशियावर दूरगामी परिणाम होतील असे जाणकार सांगत आहेत.







काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सोलापूर दौऱ्यादरम्यान सहकुटुंब वारीत सहभागी होत जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेतले. विठ्ठनामाचा गजर करीत रिंगण सोहळ्याचा आनंद लुटला.

# राज्यात मान्सूनचे आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या जवळपास दोन आठवड्यांपासून जणूकाही रुसून बसलेला पाऊस अखेर अवतरला असून पुढचे पाच दिवस महाराष्ट्राच्या बहुतांश भागात तो सक्रीय राहणार असल्याचा अंदाज कुलाबा वेधशाळेकडून वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या दोन आठवड्यांची प्रतीक्षा संपुष्टात आली आहे. यासंदर्भात पुणे वेधशाळेचे प्रमुख के. एस होसाळीकर यांनी ट्वीट करून माहिती दिली आहे. या ट्वीटमध्ये होसाळीकर यांनी मुंबईतील कुलाबा वेधशाळेकडून जारी करण्यात आलेला तक्ताच शेअर केला आहे. त्यानुसार महाराष्ट्राच्या कोणत्या भागात कधी आणि किती प्रमाणात पाऊस पडेल, याविषयीचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. गेल्या तीन आठवड्यांपासून पावसाच्या प्रतीक्षेत उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. शुक्रवारी रात्रीच महाराष्ट्राच्या काही भागात मान्सूनने हजेरी लावली. आज सकाळपासून पुणे, मुंबईत पावसाच्या सरी बरसल्या आणि नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

महाराष्ट्रातल्या बहुतांश भागात मान्सून सक्रीय झाला असून येत्या पाच दिवसांत मनसोक्त कोसळणार असल्याचा अंदाज वेधशाळेकडून वर्तवण्यात आला आहे. के. एस. होसाळीकरांनी केलेल्या ट्वीटमध्ये महाराष्ट्राच्या बहुतांश भागात पुढच्या पाच दिवसांत मान्सून सक्रीय राहण्याचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. यानुसार कोकण व विदर्भात काही दिवस मुसळधार ते अतीमुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातही मुसळधार ते अतीमुसळधार पावसाचा अंदाज नमूद करण्यात आला आहे. मराठवाड्यात पावसाचा जोर असेल, असेही वेधशाळेकडून सांगण्यात आले आहे.

मुंबईत आज आणि उद्या अर्थात २४ आणि २५ जून रोजी मध्यम तीव्रतेचा तर २६ ते २८ जून या तीन दिवसांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ठाणे आणि पालघरमध्येही याच प्रमाणात पुढचे पाच दिवस पाऊस असेल.

# नेत्रदीपक रिंगण सोहळ्याने झाले भक्तीमय वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण वरुणराजाच्या साक्षीने पुरंदवडे येथे तर तुकोबारायांच्या पालखीचे गोल रिंगण अकलूज येथे संपन्न झाले. पालखी सोहळा निघाल्यापासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या भाविकांची मनोकामना पूर्ण झाली. भाविकांच्या उत्साहाला आलेले उधाण, चैतन्य निर्माण करणाऱ्या आणि नेत्रदीपक रिंगण सोहळ्याने वातावरण भक्तीमय झाले. उद्या माउलीच्या पालखीचे खडूस येथे दुसरे गोल रिंगण होऊन वेळापूर येथे मुक्कमी तर संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे माळीनगर येथे उभे रिंगण होऊन बोरगावी मुक्कमी असणार आहे. विशेष म्हणजे अमेरिकेचे राजदूत माईक हेनकी यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

पालखी सोहळ्यातील परमोच्च क्षण म्हणजे गोल रिंगण. लष्करी शिस्त, ठरलेले ठिकाण, रिंगण लावण्यासाठी चोपदारांचा इशारा आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच अश्वांची धाव अशा या नेत्रदीपक रिंगणाची भाविकाना आस लागलेली असते. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे पहिले गोल रिंगण पुरंदवडे येथे संपन्न झाले. सकाळपासून ढगाळ वातावरण आणि वारा सुटला होता. अशातच दुपारी बाराच्या सुमारास मैदानामध्ये टाळ मृदुंग, डोक्यावर तुळशी वृंदावन घेवून महिला, विणेकरी टाळकरी जमा होऊ लागले. त्यानंतर माउलीची पालखी रिंगणाच्या मध्यभागी आली. लगेच माउलीच्या अश्वाचे आगमन झाले. अश्वाची आणि पादुकांची पूजा झाली. चोपदारांनी हातातील दंड गोल फिरवला. उपस्थित भाविकांचा माउली-माउलीचा जयघोष, तसेच टाळ मृदुंगाचा जयघोष सुरु असतानाचा अश्वाने वेगाने धावत गोल फेरी पूर्ण केली आणि मग जमलेल्या भाविकांचा उत्साह अजून वाढला. माउलीच्या अश्वाची पायाची धूळ मस्तकी लावण्याची लगबग झाली. या वैष्णवांच्या उत्साहात वरुणराजा देखील सामील झाला. ज्याची आतुरतेने वाट बघत होते तो पाउस पडू लागल्याने उत्साह द्विगुणित झाला. जमलेल्या वैष्णवांनी फुगडी, सोंग, आदी खेळ खेळून आपल शीणवठा घालवला. तर दुसरीकडे जगद्गुरू तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा नीरा नदी ओलांडून शनिवारी सकाळी माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे जिल्ह्यात आगमन झाले.यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अश्व आणि पादुकाचे पूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. या वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जेष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, आ. राम सातपुते, पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ, धैर्यशील मोहिते पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे आदी उपस्थित होते. पुणे जिल्हा प्रशासनाने भक्तीमय वातावरणात पालखीला निरोप दिला. अकलूज येथे पालखीचे स्वागत फुले उधळून



आणि रांगोळ्यांच्या पायघड्या घालून करण्यात आले, येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात गोल रिंगण संपन्न झाले. माने विद्यालयात पालखीचे आगमन झाल्यानंतर प्रथम पताका, हांडे-तुळशी, विणेकरी, मृदंग व टाळकरी जमले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते अश्व पूजन करुन अश्व रिंगणी धावले. अश्वाचे रिंगणात धावणे हा क्षण टिपण्यासाठी प्रत्येकजण नजरा एकटक लावून बसला होता. लाखों वारकरी, ग्रामस्थ अश्वाचा नेत्रदीपक सोहळा पाहून तृप्त झाले.दरम्यान, रविवारी माउलीची पालखी माळशिरस येथून प्रस्थान ठेवून खडूस फाटा येथे दिसरे गोल रिंगण होऊन पालखी वेळापूर येथे मुक्कामी येणार आहे.

# राष्ट्रवाद जोपासताना



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**राष्ट्रवाद ही शब्दावली अलीकडची आहे असे वाटत असले तरी भूमीसाठी भूमिका घेऊन प्राणार्पण करण्यामागची प्रेरणा आणि इतिहास हा मात्र प्राचीन आहे. ज्याला भूमी आहे तो भूमिका घेईल, पण ज्यांना भूमीच नाही किंवा या भूमीवरील लोक विशिष्टांना आपले मानतच नसतील तर त्यांनी कोणती भूमिका घ्यावी, हा मोठा गहन प्रश्न आहे. हे केवळ भारताच्याच संदर्भात आहे असे नव्हे, तर जिथे जिथे माणूस विशिष्ट क्षेत्रात आहे तेथील समस्या आहे. मानवता, भूतदया, सहानुभूती किंवा तत्सम प्रकारातील राष्ट्रवाद की विशिष्टांच्या हितरक्षणासाठी राष्ट्रवाद हे अगोदर ठरवले पाहिजे.**



## क्षितिजापल्याड

राष्ट्रवाद ही काही सर्वव्यापी आणि सर्वसमावेशक संकल्पना निश्चितच नाही. मग राष्ट्र उभारणीसाठी राष्ट्रवादी भूमिका कशी असावी याबद्दल थोडी चर्चा करू या. राष्ट्रवादाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. ते एकदा समजून घेतल्यानंतर आपण यात नेमके कोठे आहोत आणि आपली भूमिका काय? याचा उलगडा होईल. माझ्या मते भूमी, संस्कृती, इतिहाससिद्ध सातत्य आणि प्रशासन हे ते चार घटक होत. यापेक्षा वेगळी लक्षणे आपणांस सांगता येतील आणि पाश्चात्य विचारवंतांनी सांगितली देखील आहेत. त्या तपशिलात आपणास जायचे नाही. सर्व भूमी परमेश्वराची असे म्हणणे ही आदर्शवत भूमिका झाली, पण वास्तव यापेक्षा वेगळे आहे. विशिष्ट सीमेच्या आत आणि बाहेर हे वास्तव आहे. हे असे कोणी ठरवले, ते चांगले की वाईट हा स्वतंत्र चर्चेचा विषय ठरेल. पण जे आहे ते असे आहे. मग या विशिष्ट भूमीत राहणाऱ्या लोकांसाठी तो जमिनीचा तुकडा विशिष्ट राष्ट्र. ज्यांच्याकडे जमीन आहे ते राष्ट्रवादाचा पुरस्कार करणार त्याकामी इतरांनीही अशीच भूमिका घ्यावी असा अट्टहास देखील धरणार. पण ज्यांच्याकडे काहीच नाही त्यांनी अशी भूमिका का घ्यावी. या प्रश्नाचे उत्तर स्वातंत्र्यपूर्व काळात वेगळे असले असते आणि आता वेगळे असेल. कारण आपण राज्यघटना स्वीकारली आहे आणि त्यानुसार राज्य कोणत्याही प्रकारचा भेद देशातील नागरिकांत करणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा राज्यघटना देते. अंतर्गत वादाचे आणि विसंवादाचे जे मुद्दे असतील ते सामोपचाराने सोडवता येतील. हे सोडवत असताना कोणालाही कसल्याही प्रकारचे झुकते माप दिल्यास कलह निर्माण होणार. राष्ट्रवादाची उभारणी आपण विकासाच्या मापदंडानुसार करतो की अस्मितेवर करतो यावर राष्ट्रवादाची पुढची वाटचाल अवलंबून असेल. इतिहासामध्ये अस्मितेवर आधारित राष्ट्रवाद जेव्हा कोठे उभा राहिला तेथे नेहमीच अशांतता, कलह, विद्वेष आणि परस्पर अविश्वासाचे वातावरण राहिले आहे. ज्या मुहंमद अली जिना यांना नामदार गोखले यांनी हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून गौरविले होते त्यांनी महात्मा गांधींच्या उदयानंतर वेगळी धार्मिक भूमिका घेऊन स्वतंत्र पाकिस्तानची भूमिका मांडली. आज एकाच वेळी स्वातंत्र्य मिळविणारी दोन राष्ट्रे विकास आणि मानवतेच्या परिप्रेक्ष्यात कोठे आहेत, हे आपल्यासमोर ताजे उदाहरण आहे. अलीकडे हिंदू राष्ट्रवाद अशी काहीजण मांडणी करतात. यात जैन, बौद्ध, शीख यांचाही समावेश या संकल्पनेत करण्यात येतो. पण यातून इस्लाम आणि ख्रिश्चन यांना वगळण्यात आले. यात धर्मापेक्षा सांस्कृतिक अंगाने विचार केला आहे असे स्पष्टपणे दिसते. हे असे कसे यावर खलबते होऊ शकतात त्यात आपणास शिरायचे नाही, पण भारताचे वास्तव धर्म वास्तव नसून जातवास्तव आहे हे प्रथम समजून घेतल्यास यातील मेख लक्षात येईल. धर्माच्या नावावर तुम्ही सर्वांना एकत्र करत आहात ही स्वागतार्ह बाब, पण जातींचे काय करायचे हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. मुळात हिंदू राष्ट्रवाद म्हणत असताना आपण जातींकडे साफ दुर्लक्ष करतो. जातींचे कल्याण अथवा जातनिर्मूलन या चर्चाबाह्य बाबी होतात. धर्म ही अत्यंत खाजगी आणि अमूर्त अध्यात्मिक संकल्पना असून जात व्यवहारात प्रत्यक्ष कार्यरत आहे. किमान भारताच्या बाबतीत आपणांस जातविरहित विचार करणे न्यायाला धरून होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपण हिंदू आहोत म्हणून एकत्र येऊन परकियांशी लढले पाहिजे ही भूमिका घेतली नव्हती तर सर्व जातींना एकत्र करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली होती. कारण जातवास्तव आहे आणि आपणास त्याला नाकारता येणार



नाही. हिंदू राष्ट्रवाद म्हणत असताना आपण केवळ जातींकडे दुर्लक्ष करतो असे नाही तर त्यात काही सुधारणा करावी असाही मनोदय नसतो. परंपरेने चालत आलेली जातिव्यवस्था मला त्यावेळी मान्य झालेली असते. राष्ट्रवादी भावना राष्ट्राला पुढे नेण्यासाठी, सामान्यांना प्रेरणा देण्यासाठी महत्त्वाची असतेच, त्यात दुमत असण्याचे कारण नाही. भारतीय स्वातंत्र्यानंतर पहिल्या पिढीच्या नेतृत्वांनी कोणत्याही धर्माला प्रोत्साहन न देता विकास हे एकक वापरून आणि जगातील कलहापासून अलिप्त राहून आपला विकास कसा साधता येईल यावर भर दिला. उद्योग, कृषी आणि सेवा क्षेत्रात आज आपण जी प्रगती पाहतो आहोत हे त्याचेच तर प्रतीक आहे. विकासाच्या वाटेवर चालताना आपणास अस्मिता दूर ठेवाव्या लागतात नाहीतर भ्रामक अस्मितेतच आपण अडकून पडण्याची संभावना जास्त असते. व्यक्ती आणि राष्ट्र यातील अस्तित्व आणि अस्मितेच्या फुटपट्ट्या निश्चितच वेगळ्या असायला हव्यात. कारण राष्ट्र सर्वोतोपरी म्हणत असताना व्यक्तीच्या अस्मितेला नगण्यता येणार हे उघड आहे. पण जिकिरीची बाब अशी की राज्यकर्ता हा देखील माणूसच असतो. त्याचा राग, लोभ, धारणा आणि दृष्टिकोन याचे प्रतिबिंब नाही म्हटले तरी धोरणावर पडत असते. राष्ट्रवाद ही अशी चिंचोळी वाट आहे की, ज्यावरून चालताना आपण आपला तोल कसा सांभाळतो यावर आपले भविष्य निर्धारित असते. आपणांस केवळ धार्मिक अंगाने राष्ट्रवादाचा विचार न करता सांस्कृतिक घटकांच्या लसावीतूनच आपणांस हे राष्ट्र उभा करता येईल आणि विकसित करता येईल. केवळ पाश्चात्यांच्या धर्तीवर जशास तसा राष्ट्रवाद भारत भूमीसाठी हितावह ठरणार नाही. विशिष्टांचे एकत्रीकरण आणि विशिष्टांचा दुस्वास हे मनभेदाचे कारण ठरणारे असते. सबका साथ सबका विकास ही बिरुदावली जेव्हा आपण प्रामाणिकपणे राबवू तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण राष्ट्रवादी होऊ.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# मोदींचा अमेरिका दौरा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौऱ्याचे वर्णन ऐतिहासिक म्हणून केले जात आहे. या दौऱ्यामुळे भारत अमेरिका संबंध दृढ होतील. या दौऱ्यात उभय देशांनी महत्त्वपूर्ण दहा करारांवर स्वाक्षरी केली.त्यामुळे भारत अमेरीका मैत्री संबंधाचा एक नवा अध्याय लिहिला जाईल.संरक्षण संबंध बळकट होतील.अशा बातम्या समोर येत असताना या दौऱ्याची दुसरी बातमी देखील तितकीच धक्कादायक व भारतासाठी.चिंता निर्माण करणारी आहे. मोदींच्या अमेरीका दौऱ्यात अमेरिकन सिनेटर्सची देशांतर्गत धोरणावर चिंता व्यक्त करत मोदींच्या अमेरिका दौऱ्याला विरोध केलेला आहे.**

एवढेच नव्हे तर अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी देखील एका मुलाखतीत भारतात अल्पसंख्याकावर होत असलेल्या अत्याचारावर चिंता व्यक्त केली.एवढेच नव्हे तर बायडन यांनी मोदी यांच्या भेटी दरम्यान हा मुद्दा लावून धरावा,असे देखील त्यांनी म्हंटले.मी जर राष्ट्राध्यक्ष असतो तर मी मोंदिना भारतात होत असलेल्या मानवाधिकार प्रश्न केलाच असता,असे त्यांनी त्यांनी मुलाखती दरम्यान म्हंटले. बायडन शी जिनपिंग च्या धोरणावर व त्यांनी घेतल्या निर्णयावर टीका करतात तर पण मोदींच्या निर्णयाचे समर्थन का करतात,असा प्रश्न ओबामा यांनी उपस्थित करत मोदींच्या अमेरिका यात्रेवर चिंता व्यक्त केली.

राष्ट्राध्यक्ष बिडेन आणि त्यांच्या पत्नीने शाही जेवणाची व्यवस्था कशी केली हे आज भारतीय मीडिया सांगत आहे. शाकाहारी जेवणात किती विविधता होती. डीडी न्यूजचे अशोक श्रीवास्तव सतत आपल्या ट्विटद्वारे प्रत्येक क्षणाची बातमी आपल्या फॉलोअर्सना पाठवत आहेत, जणू काही त्यांना हा क्षण पुन्हा मिळणार नाही.

पण या प्रवासाबद्दल अमेरिकन मीडियामध्ये काय लिहिले आणि बोलले जात आहे हे दाखवण्याचा प्रयत्न क्वचितच कोणी करत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या देशांतर्गत धोरणांवर तीव्र आक्षेप नोंदवून, ७० हून अधिक अमेरिकन खासदार आणि काँग्रेस सदस्यांनी बिडेन यांना भारतातील लोकशाहीच्या झपाट्याने होत असलेल्या घसरणीबद्दल सार्वजनिक आणि वैयक्तिकरित्या चिंता व्यक्त करण्याचे आवाहन केले आहे.

डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रमुख नेते आणि दोन वेळा अव्वल मानांकित यूएस अध्यक्षपदाचे उमेदवार बर्नी सँडर्स यांनी शेवटच्या क्षणी माघार घेतली आणि मोदींवर अनिश्चित शब्दांत टीका करत ट्विट केले की, "पंतप्रधान मोदींच्या सरकारने प्रेस आणि नागरी समाजाचा नाश केला आहे. अल्पसंख्याकांचे दमन केले, त्यांच्या राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबले आणि आक्रमक हिंदू राष्ट्रवादाला खतपाणी घालून भारतातील धार्मिक अल्पसंख्याकांसाठी जागा सोडली नाही. बिडेन यांनी मोदींसोबतच्या भेटीत हे प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. मणिपूर हिंसाचाराचा मुद्दा अमेरिकेच्या रस्त्यावरही गाजत आहे. मणिपूर वंशाच्या स्थलांतरित महिला, मुले आणि तरुणांनी हातात फलक घेऊन प्रश्न विचारले आहेत. "पंतप्रधान मोदी गप्प का आहेत", "मणिपूर वाचवा" आणि "आम्हाला मणिपूरमध्ये शांतता हवी आहे" अशा मागण्या असलेले फलक हातात घेतलेले लोक उपस्थित करत असलेले प्रश्न भारताच्या प्रतिष्ठेला कलंकित करतात. १०० हून अधिक मृत्यूंसह, मेईतेई आणि कुकी समुदायांमधील फूट इतकी खोलवर गेली आहे की ते दूर करणे जवळजवळ अशक्य आहे. पीएम मोदींनी मणिपूरबाबत एकदाही ट्विट केलेले नाही, तोंड उघडणे सोडा

गेल्या वेळी जेव्हा अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेत महाभियोगाचा सामना करावा लागला तेव्हा त्यांचे जिवलग मित्र मोदीजींनी त्यांच्यासाठी भारतात एका चुटकीसरशी भव्य रिसेप्शनची व्यवस्था केली. जगातील सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम, वल्लभभाई पटेल स्टेडियम, ज्याला आता नरेंद्र मोदी यांचे नाव देण्यात आले आहे, येथे ट्रम्प यांचे जल्लोषपूर्ण स्वागत ट्रम्प यांच्यासाठी अमेरिकेतील त्यांचे जागतिक श्रेय सिद्ध करण्याचे एक साधन ठरले. मात्र त्यांच्या दिल्ली दौऱ्यात ईशान्य दिल्लीतील दंगलीची उष्णता अमेरिकेतील नागरिकांना अजूनही जाणवत होती.

२०२० नंतर म्हणजे २०२३ मध्येही भारतातील एक राज्य पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी आहे हे उघड आहे आणि पिएम् मोदी टोकियो येथे G-7 च्या बैठकीला पाहुणे म्हणून जाण्यापासून थांबले



नाहीत तर ते रद्द करून ऑस्ट्रेलियात जाण्याचा आनंद झाला. आधीच झालेली बैठक असूनही तीन दिवसांसाठी (जो बिडेनच्या देशांतर्गत आर्थिक समस्या). आपण सामान्य भारतीयांना या गोष्टी समजत नसतील, कारण आपल्याला नेहमी गोडी माध्यमांतून त्याच बातम्या दिल्या जातात, त्यामुळे आपली विचार करण्याची आणि समजण्याची शक्ती कुंद राहते.

व्हॅन अमेरिकेच्या रस्त्यावर फिरत असलेल्या चित्रपटात बदलली आहे. यामध्ये अमेरिकेत भारतातील आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांवर पंतप्रधान मोदींच्या पक्षाचे खासदार ब्रिजभूषण सिंह यांनी मौन बाळगले आहे. जागतिक मानवाधिकार संघटना न्यूयॉर्कमध्ये भारतात बंदी घालण्यात आलेल्या बीबीसी माहितीपटाचे स्क्रीनिंग करत आहेत. या सर्व गोष्टी भारताच्या 10% लोकांपर्यंत क्वचितच पोहोचतात. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पीएम मोदींनी लोकांना जोडणारा योग असे वर्णन करून बरीच प्रशंसा मिळवली आहे. पण काही लोक असा सवाल करत आहेत की जर लोकांना योगाने जोडता येत असेल तर तुम्ही मणिपूरच्या लोकांना जोडण्याचा एकही प्रयत्न अजून का केला नाही?

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पालकमंत्री साहेब शासन आपल्या दारी, अधिकारी कर्मचारी मात्र दुपारीच घरी

## शाळा सुरू, शैक्षणिक विभागात मात्र अधिकाऱ्यांची दांडी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** पाच दिवसांचा आठवडा, गतिमान शासन, पालकमंत्र्यांचे जनता दरबार, खासदारांनी घेतलेली शिक्षण विभागाची बैठक तरीही जिल्ह्यातील शिक्षण विभाग सुस्तच असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शासकीय कार्यालती कामाची वेळेची शिस्त भंग करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्यावर आता जिल्हाधिकारी साहेबांकडून दबंग कामगिरीची अपेक्षा सामान्य वर्गातून होत आहे. एकीकडे खाजगी शाळांचे वाढते जाळे त्यात शाळेतील पटसंख्या वाढवण्यासाठी खाजगी शाळेतील शिक्षक व ईतर कर्मचाऱ्यांकडून मे महिन्यापासूनच पालकांच्या दारोदारी फिरत खाजगी शाळेच्या विद्यार्थी पटसंख्येत भरघोस वाढ करून घेतली.
तर हे शिक्षण विभागाच्या या लेट-लतिफ कर्मचारी अधिकाऱ्यांमुळे जिल्ह्यातील अनेक शाळांची पटसंख्या बोटावर मोजता येईल एवढीच शिल्लक राहिलेली आहे. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनच जर कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत दांडी मारत बेशिस्तीचे धडे गिरवले जात असतील, तर शाळेत शिक्षण देणाऱ्या शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना शिस्तीची अपेक्षा करावी यामुळेच अनेक पालक वर्ग परिस्थिती नसतानाही आपल्यामुळे सरकारी शाळा ऐवजी खाजगी शाळेला पसंती देत आहेत.










# भाजपाचे जनहिताच्या योजनेची पत्रके घराघरात देण्याचे काम

आधुनिक केसरी न्यूज


**खुलताबाद :** मोदी@9 महाजनसंपर्क अभियान भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारला 9 वर्ष पूर्ण झाले या सेवा, सुशासन और गरिब कल्याण अंतर्गत 9 वर्षात मोदीजीने जनतेसाठी सुरू केलेल्या सबका साथ , सबका विश्वास, सबका प्रयास या मोदीजींच्या वचनाप्रमाणे 9 वर्षांत केलेल्या नागरिकांच्या जनहिताच्या योजनेचे माहिती पत्रक प्रत्येक घराघरात देण्याचे काम सर्व लोकप्रतिनिधीं, शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून रत्नपुर-खुलताबाद तालुक्यात आमदार प्रशांतजी बंब साहेब यांच्या मार्गदर्शनात सुरू केले असून पत्रके वाटण्याची सुरवात भडजी येथून आज करण्यात आली या पत्रकात मोदी सरकारने सुरू केलेल्या योजनांची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे , जसे की, पी.एम.स्वनिधी, प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस, सुकन्या समृद्धी योजना, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, जल जिवन मिशन पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, प्रधानमंत्री फसल बिमा योजना, अटल पेन्शन योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान योजना, स्टँड- अप इंडीया, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, किसान क्रेडिट कार्ड योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, न.मो.किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री गरिब कल्याण योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री मुद्रा योजना, अशा अनेक योजनांची माहितीचे पत्रके वाटताना भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, बूथप्रमुख गणेश भानुदास वाकळे, याच्या हस्ते गावातील नागरिकाना परिपत्रक देण्यात आले यावेळी सरपंच बाबासाहेब वाकळे, रत्नाकर वाकळे, सुधाकर वाकळे, साहेबराव वाकळे, वामन वाकळे, कडुबा वाकळे, कारभारी वाकळे, विश्वनाथ वाकळे, भागिनाथ वाकळे, रहमान शेख, मच्छिंद्र वाकळे, सांडु वाकळे, अंकुश वाकळे, सोमिनाथ वाकळे, सोनाजी वाकळे, बाळु वाकळे, रघुनाथ वाकळे, कडु शेख , विजय वाकळे व गावातील नागरिक उपस्थितीत होते.

# डॉ. प्रभाकर शेळके यांना नामदेव ढसाळ पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** डॉ. प्रभाकर शेळके यांच्या 'जातीअंताचे हुंकार' या कवितासंग्रहास 'विद्रोही कवी नामदेव ढसाळ राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर झाला आहे. आंबेडकरी चळवळीचे वृतपत्र 'निळे प्रतीक' बहुउद्देशीय संस्था छत्रपती संभाजीनगर चे संस्थापक रत्नकुमार साळवे यांनी आज ही घोषणा केली. येत्या २९ जून रोजी मौलाना आझाद टाऊन हॉल, छत्रपती संभाजी नगर येथे डॉ. ऋषीकेश कांबळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. मानपत्र, सन्मानचिन्ह, महावस्त्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराबद्दल माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य डॉ. बी. आर गायकवाड, बसवराज कोरे, राहुल भालेकर, देवराव सोनवणे, बाबासाहेब अंबडकर, डॉ. धोंडोपंत मानवतकर, आप्पासाहेब नाटकर, भिकन गाढे, नामदेव शेळके, डॉ. सुहास सदाव्रते यांनी अभिनंदन केले आहे.



# शांतता बिघडविणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई : महानिरीक्षक शेखर

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** भ्रमणध्वनीवर आलेल्या चुकीच्या संदेशाची खात्री न करता आपण त्यावर सलोखा बिघडविणारी प्रतिक्रया देतो. तेथूनच शहरातील शांततेला गालबोट लागते. सण, उत्सव काळात शहराची शांतता बिघडविणाऱ्या समाजकंटकांना, दंगेखोरांना पोलीस प्रशासनाकडून कठोर शासन केले जाईल, असा इशारा नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक बी. जी. शेखर पाटील यांनी दिला.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत त्यांनी मार्गदर्शन केले. जे घडलंच नाही ते दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. अफवा पसरविल्या जातात. जे सांगितले जाते, त्याचा अपभ्रंश केला जातो. समाजमाध्यमांवर अशा परिस्थितींमध्ये टाकण्यात आलेले ९९.९९ टक्के चित्रफिती, संदेश खोटे असतात. फेसबुकवर खोटे खाते उघडले जाते. असे संदेश पुढे पाठविण्यापूर्वी त्याची पडताळणी होणे गरजेचे आहे, असे शेखर यांनी सांगितले. कुठेतरी काहीतरी होतं. आणि आपण धुळे जाळायला निघतो, मालेगाव जाळायला निघतो. प्रत्येकाने आपल्या समुदायातील तरुणांचे समुपदेशन करावे, कायदा हातात घेतला तर हातात बेड्या पडतील हे ध्यानात ठेवा. अशांतता पसरविण्यामागे जे सूत्रधार असतील त्यांना सोडणार नाही. दंगे करून धुळ्याचे नाव बदनाम होईल हे खपवून घेणार नाही. अनेकजण वादग्रस्त, शांतता बिघडविणारे संदेश पाठवून नंतर उडवितात. परंतु, आमच्याकडे त्याची नोंद असते. धुळे हे शांत आणि चांगले शहर आहे. एकादशी आणि ईद शांततेत, उत्साहात साजरी करा. शहराची शांतता कायम ठेवण्यासाठी सर्व समाज घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन शेखर यांनी केले.





महाराष्ट्र Business Katta












# सेत करा रे फुकाचें ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**भारतात शेतकरी आणि शेती शिवाय कोणताच विषय पुढे जाऊ शकत नाही. कृषीप्रधान भारतात शेती हा मुख्य व्यवसाय असून त्यावर इथल्या सर्वच लोकांचे जगण्याचे गणित अवलंबून आहे. ही काही आजची गोष्ट नसून विश्वाच्या निर्मिती काळापासून आजतागायत जशाला तशी सुरूच आहे आणि राहणार आहे! भारताचा इतिहास-भूगोल पाहिला असता, शेती आणि शेतकरी यांच्या विषयी सातत्याने लिहिले, बोलले आणि कार्य केले गेले आहे. याचे अनंत दाखले वाचायला आणि पाहायला मिळतात. अनादी काळापासून कृषी संस्कृती इथे नांदतांना अगदी आद्य दैवत भगवान शंकर-पार्वती ज्यांच्यासोबत नित्य नंदी असून तो कृषी संस्कृतीचे द्योतक आहे हे महत्वपूर्ण तत्व लक्षात घ्यायला हवे.**



रामायण काल, श्रीकृष्ण काल, बुद्ध काल आधी सर्वच काळात शेतीमातीचे संदर्भ आढळून येतात. एवढेच काय इसविसनपूर्व पासून शेतीचे संदर्भवाङ्मयात आढळून येतात. याचे पुरावे म्हणजे ऋग्वेदात गुत्समद हा शेतकरी प्रतिनिधी होता आणि त्याने ऋग्वेदातील दुसऱ्या भागात त्याचे शेतीविषयीचे महत्वपूर्ण लेखन केलेले आढळून येते. गुत्समद हा शेतकरी तो एक कृषी ऋषी होता जो "महाभारताच्या युद्धाच्या आधी १५ पिढ्या होऊन गेला होता." साधारणतः त्याचा काळ ख्रिस्तपूर्व २७०० असावा. मौर्य सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज आदि सर्वांच्या काळात सर्वकाळ त्यांनी इथली कृषी संस्कृती समृद्ध-सुरक्षित करण्याचे महत्कार्य केल्याचे अनेक दाखले आहेत. तदनुषंगाने आत्तापर्यंतच्या सर्वच संत, विचारवंत, कवी, लेखक, समाजसुधारक, राजे-महाराजांनी आणि अलीकडे लोकशाही काळात सर्वच पक्ष-सत्ताधाऱ्यांनी शेतकरी केंद्रबिंदू मानून आपले सर्वांगीण धोरण आखल्याचे निदर्शनास येते. यात जगद्गुरू तुकोबाराय सुद्धा आपले बहुमुल्य योगदान देण्यासाठी अभंग-कीर्तनाचा विनियोग करतांना प्रबोधनाचे नवे पर्व सुरु करतांना दिसतात.

तुकोबांचे संपूर्ण जीवनच कृषी संस्कृतीशी निगडीत होते. वडिलांचे निधन झाल्यानंतर शेती सांभाळत सांभाळत त्यांना सावकारी करावी लागली. त्यांच्या काळात भयंकर दुष्काळ पडले. सर्वत्र अन्न-पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य! गुरं-ढोरं-पक्षी एवढंच काय माणसं सुद्धा अन्न अन्न करून मेली. हा जवळून आलेला अनुभव स्वतः तुकोबांनी आपल्या अभंगातून व्यक्त केला. दुष्काळाने गोठा आणि घरही रिकामे झालेले आणि धर्ममार्तंडांचा अतोनात छळ! यामुळे तुकोबाराय शरीराने आणि मनानेही खचले असतांना त्यांच्या एकनिष्ठ भक्तीने आणि भजनाने त्यांना तारले. घनघोर आघात झाले तरी तूकोबांनी मायमातीशी आपली नाळ तुटू दिली नाही आणि त्याला जोड दिली ती आपल्या निरपेक्ष भजन-कीर्तनाची! कृषित नांदणारे तुकोबाराय म्हणजे जणू कृषी ऋषीच! यातूनच त्यांचे शेतीमातीचे, नांगरी संस्कृतीतून नागर लोकांना उपदेश करणारे नागरी अभंग लोकाभिमुख झाले. त्यांचे जिते-जागते अनुभव त्यांच्या अलौकिक लेखणीतून द्रवतांना सामान्य वाचक-श्रोत्यांचे सहज प्रबोधन करून जातात. या शिवाय तुकोबा हे एक उत्तम शल्यचिकित्सक ( डॉक्टर ) आहेत. आपले अभंग शुगर कोटेड गोळीसारखे गोड गोड मुलामा देऊन आपल्याला जे विचाररुपी औषध समाजमनात पेरायचे आहे ते बरोबर पेरतात आणि आपले उद्दिष्ट साध्य करतात. नांगरी संस्कृतीतून शेतीमातीतलोकसंस्कृतीरुजविणारात्यापैकीचहाएकसुंदरअभंग!

**सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ॥१॥**
**नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा ।**
**सरिक नाहीं रे दुसरा । धनी सारा तुझा तूं ॥ध्रु.॥**
**जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ॥२॥**
**कर्म कुळवणी । न लगे धर्मपाळी दोन्ही ॥३॥**
**ज्ञानपाभारी तीफणी । न लगे करावी पेरणी ॥४॥**
**बीज न लगे संचिताचें । पीक पिकलें ठायींचे ॥५॥**
**नाहीं यमाचें चोरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ॥६॥**
**पीक न वजे हा भरवसा । करी उद्वेग तो पिसा ॥७॥**
**सराई सर्व काळ । वांयां न वजे घटिकापळ ॥८॥**
**प्रेम पिकलें अपार । नाहीं सांठावावया थार ॥९॥**
**ऐसीये जोडी जो चुकला । तुका म्हणे धिग त्याला ॥१०॥**

प्रस्तुत अभंगात तुकोबाराय लोकांना शेती करायला सांगतात. फुकाचे हा शब्द द्विअर्थि आहे. एक तर शेती निसर्गाची फुकट निर्मिती असून तशीच पांडुरंगाची भक्ती सुद्धा फुकटच आहे. दोन्हीलाही मोल लागत नाही, परंतु दुर्दैवाने स्वार्थी माणसांनी फुकटची, निसर्गाने दिलेली शेती वाटून घेतली आणि त्यावर कळस म्हणजे फुकट होणारी भक्ती सुद्धा थोतांड-कर्मकांडात अडकवली. याचा परिणाम म्हणजे काही लोकांकडे शेकडो एकर शेती तर काहींना पाय ठेवायला जमीन नाही. हा भेद माणसाने निर्माण केला. तसेच भक्तीचे सुद्धा झाले. देव-दैवत-प्रार्थना स्थळे ही स्वातंत्र्य-समता-बंधुता इत्यादीची द्योतक असतांना दर्शन-पूजा-भजन-कीर्तन इत्यादीसाठी भेदाभेद केला गेला. दोन हाय, दोन पाय, एक मुंडकं असणारी सगळी सारखीच माणसं! मात्र तिथेही ते स्थळ

**तुकारामनीती**
**भाग -५९**



बंदिस्त केलं गेलं! इथच मानव जातीचा ऱ्हास सुरु झाला. त्यासाठी तुकोबाराय फुकटची शेती म्हणतांना भक्ती सुद्धा फुकटची करण्याचा उपदेश करतात. भक्ती करतांना कोणताही शेत सारा किंवा व्याज द्यायची गरज नाही. श्री विठ्ठलाच्या भक्तीसारखे सोपे, फुकट दुसरे काहीच साधन नसून इथे आपणच आपले मालक आहोत. ईश्वर नामाच्या जपाने आणि ध्यानाने मानवी जीवन-विचारांची खोलवर नांगरणी होते. विहित, योग्य कर्म केले की; कोणतेही कुळ लागत नाही. यासाठी कोणता असा विशिष्ट धर्म सुद्धा नको आहे. ज्ञानाच्या तिफणीने मशागत झालेल्या शेतात योग्य विचारांची पेरणी केली की; त्या बी आणि पिकाला संचिताची कीड लागत नाही आणि याचा परिपाक म्हणजे स्वतःमध्ये अत्मानंदाचे पिक भरभरून येते. मानवी जीवनाला असे उत्तम पिक लागले की त्याची राखण पागोरा म्हणजे चाबूक घेऊन स्वतः देवच करतो. तिथे यम नावाचे चोर येत नाहीत. तेंव्हा, पिक येणार नाही असं बेभरवशाचे वेडे-पिसे विचार मनात आणू नको. असे केले म्हणजे सर्वकाळ सराई-भरभराट होईल. त्यासाठी माणसाने आपल्या जीवनातील एक क्षण सुद्धा व्यर्थ दवडू नये. भक्ती-प्रेम-जिव्हाळा-आपुलकी आदि पिक अमाप आले की मग ते साठवायला सुद्धा जागा पुरणार नाही. अशा प्रेमळ भक्तीच्या शेतीला जो मुकला त्याच्या एवढा अभागी दुसरा कोणीच नसून त्याचे जगणे धिग म्हणजे तुच्छ आहे असे तुकोबाराय उपदेशीत करतात.

किती मजेशीरपणे शेतीच्या रूपकातून भक्ती आणि त्याच्या जोडीला कसून, इमाने इतबारे शेती करण्याचा उत्तम सल्ला या अभंगांतून महाराज आपल्याला देतात. हे आणखी एक तुकोबांच्या अभंगांचे वैशिष्ट्ये! भक्तीची आणि शेतीची जोड या अगोदरही अनेकांनी लावून शेतकरी वर्गाला तनमनाने मजबूत करण्याचे काम झाले आहे. संत सावतामाळी महाराजांनी आपल्या

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥१॥**
**लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥२॥**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥३॥**
**सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायीं गोंविला गळा ॥४॥**

या अभंगातून कृषी संस्कृती आणि श्री विठ्ठल भक्ती याची सुंदर सांगड घातली आहे. भूतकाळातील हेच विचार संत तुकाराम महाराजांनी सतराव्या शतकात लोकमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केलेला आहे. सावतोबा आणि तुकोबा या दोघांचाही काळ मोठा खडतर होता. राजेशाही, कडेकोट वर्णव्यवस्था आणि त्याच्या जोडीला भक्तिमार्गात थोतांड, कर्मकांड, पूजा-अर्चा, दर्शनी देवदेव याने समाज अक्षरशः पोखरून निघाला होता. सर्वसामान्य, गोरगरीब, बाय-बापड्या यात पुरते पिचले गेले होते. देव आणि धर्माविषयी समाजात प्रचंड दहशत निर्माण झाली होती. देव बंदिस्त झाला होता. यावर रामबाण औषध वारकरी संतांनी शोधून काढले ते म्हणजे आपल्या कर्मातच खरा देव आहे हे पुन्हा पुन्हा सांगितले. याचा परिणाम म्हणजे त्या संतांना धर्ममार्तंडांचा मार खावा लागला परंतु आपली शेती इमाने इतबारे करणे म्हणजेच खरी भक्ती असून तिथेच ईश्वराचे अस्तित्व आहे हे गमक लक्षात आले.

महानुभाव वाचकहो, तुकाराम नीती हे साप्ताहिक सदर नियमितपणे आपणास वाचन-चिंतनासाठी देतांना आपल्यासोबत मी ही हे विचार माझ्या जीवनात उतरविण्याचा, अंगीकार करण्याचा प्रयत्न करत असतो. लिहितांना सर्वच विचार जीवनात लगेच उतरत जरी नसले तरी त्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करून तिथे पोहचावे ही तळमळ! त्यासाठी अनेक वाचक वाचून प्रतिक्रिया देतात. तसे पहिले तर इथे माझे पदरचे कांहींच नाही, मी केवळ हमाल आहे. तुकोबांची अमृतवाणी आणि त्यावर तत्कालीन तसेच वर्तमान परीपेक्षातून चिंतन सुरु आहे. असे असतांना आपण हा अनमोल, कालातीत विचार अनेकांपर्यंत पोहोचवून जगद्गुरू तुकोबांप्रती आणि तदनुषंगाने वारकरी सांप्रदायाशी वैश्विक विचारांची नाळ घट्ट करून जीवन आनंदी विचारांनी ओतप्रोत भरुया! जय तुकोबाराय!

# कौटुंबिक स्थिती काल आणि आज

आधुनिक केसरी



कल्पना मापूसकर
90826 46494

पूर्वीच्या सुना सर्वसाधारण गृहिणी असायच्या. संयुक्त कुटुंब असायचे. सर्व आर्थिक कारभार हा सासरे व घरचा कारभार सासूच्या हाती असायचा. घरात जेवण, न्यहारी, रात्रीचे जेवण इ. मूलभूत गोष्टी सुद्धा सासूच्या सांगण्यावरून चालायच्या. काळ हळूहळू बदलत चालला. मुली शिकू लागल्या. शिकलेल्या मुली नोकरी करू लागल्या अर्थात त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. कुटुंबाला आर्थिक मदत होऊ लागली. सासू घर सांभाळते व सून नोकरी करते. थोडफार स्वयंपाकघर सांभाळते. सासू-सून गुण्यागोविंदाने नांदत असत. सून सासुच्याच सल्ल्याने सर्व करत असे. असं काहीसं चित्र नोकरी करणाऱ्या सुनेच्या घरात माझ्या पिढीत दिसत होतं.

आता पुढची पिढी अती, फाजील आत्मविश्वास बाळगणारी निर्माण होत गेली. पालक मुलींच्या शिक्षणाकडे इतक्या गांभीर्याने पाहू लागले आणि मुलीही शिक्षणाकडे गांभीर्याने पाहू लागल्या. प्रत्येक क्षेत्रात अव्वल येऊ लागल्या. कौतुक कोण म्हणून....!! अश्या परिस्तितीत त्या स्वयंपाकघरापासून आपोआपच परावृत्त होत गेल्या. आता सून घरी आली खरी पण नोकरी एके नोकरी....व पोटापाण्याची म्हणाल तर आहेच झोमॅटो, स्वीग्गी ई. ह्या गोष्टी काही मागच्या पिढीला म्हणजे सासूला पचनी पडायला फारच अवघड होते. ही आजची सून म्हणजे भारीच प्रॅक्टिकल. तिच्याकडे सर्वच अडचणींवर उपाय आहे. बाळ झालं टाकलं बेबी सीटर मध्ये. सासू-सासरे हतबल झाले टाकले वृध्दाश्रमात. जेवण हवंय तर ऑर्डर करून मोकळं व्हायचं. फक्त पैसे हवेत आणि ते कमवायला ती शंभर टक्के समर्थ.

मुलं घरी असली तरी शाळा, क्लास, गाणं-डान्स-खेळ ई कुठल्याही विषयात पारंगत होण्यासाठी क्लास यात व्यस्त. आजी-आजोबा-नातवंड एका घरात राहून एकमेकांना भेटणं दुरापास्त. सूनही कामावरून आली की दमलेली असते. परस्पर बेडरूममध्ये जाऊन विश्रांती वजा मोबाईलमध्ये दंग. साधा संवादच नाही तर वादाचं काय घेऊन बसलात....हल्ली सासू वर्गालाच सुनेपुढे मूग गिळून गप्प रहायची वेळ आली आहे. बरं त्यातूनही काही कमी जास्त बोलणं झालं तर सुनबाई नातवाला घेऊन माहेरीही जाऊ शकते कायमची. म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार... इथे आड नि तिथे विहीर अशी काहीशी गत.



# माणूस हो...



सौ. दुर्गा देशमाने
माजलगाव, जि. बीड

आधुनिक केसरी

**आताशा मानवाच्या बुद्धीवर टक्केवारीचे घोडे स्वार झाले आहेत, आपल्या पाल्यास ९९% गुण असावे असे प्रत्येक पालकास वाटते. त्यासाठी ते कोणत्याही अग्नी दिव्यातून जाण्यास तयार असतात. परीक्षा शैक्षणिक नसून प्रतिष्ठेचीच आहे, अशी त्यांची मानसिकता झालेली दिसून येते. सर्व सुख सुविधा देऊन वाटेल ती मुलाची इच्छा पूर्ण करून स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैराचारात घडवून टक्केवारी किंवा बौद्धिक क्षमता वाढवता येत नाही.**

हा विचार त्यांच्या बालिश बुद्धीला स्पर्शला नाही, याचे मनोमन वाईट वाटते. आपल्या आडमाप अपेक्षांच्या ओझाखाली ही खुलणारी कमळे निर्दयीपणे तुडवली जात आहेत याचं मात्र तीळ मात्र हे भान त्यांना नाही ही बाब चिंतेची आहे. जिकडे तिकडे प्रतिष्ठेचा बँड बाजा वाजत आहे.

टक्केवारी कमी असलेल्या मुलांचे मानसिक खच्चीकरण होऊन न देता हार पचवण्याची शक्ती, क्षमता, ताकद सकारात्मकता ही संस्कारबीज त्यांच्यात जर बालवयापासूनच रुजवली गेली तर हीच मुले जीवनाचा हिरवागार मळा माळ रानातही फुलवतील यात दुमत नाही. अपेक्षांच्या ओझ्याखाली वाढणारी मुले भावनाशून्य समाज घातक बनतात. मायेचा ओलावा हळवा स्पर्श प्रेमाची हिरवळ या मुलांना माहीत नसते. रेसमधील घोड्याप्रमाणे फक्त धावत राहणे अपेक्षांचा चाबूक त्यांच्या अंतर्मनावर क्षणक्षण फटका रे मारून घायाळ करत असतो. दरवर्षीप्रमाणे यंदाही बारावीचा निकाल जाहीर झाला मुले आपल्या परिश्रमाप्रमाणे उत्तीर्ण झाली तेव्हा डोळ्यात पाणी आणणारी एक घटना दृष्टीस पडली. जाहीर झालेल्या निकालावर चर्चा करण्यास मंडळी पारावर जमली. त्यात सरपंचाचा मुलाचाही समावेश होता.आपल्या मुलाला आपल्या मनाप्रमाणे टक्केवारी आली नाही म्हणून सरपंच नाराज होऊन बसलेले होते. बोलण्याचं सोंग करत होते. पण मनातून काही बोलण्यास त्यांना सुचत नव्हते. आपल्या मुलानं आपली मान खाली घातली असं त्यांना त्यांचं मन सांगत होतं. त्यांचं अंतकरण त्यांना नकळत जाळत होतं. त्यांच्या मुलालाही त्यांच्याशी नजर मिळवण्याची देखील भीती वाटत होती. बाप व मुलगा दोघेही एकमेकांवर नाराज होते, दूर होते. सरपंचांच्या शेतात शेतमजूर म्हणून काम करणारे रामभाऊ त्यांचा मुलगा बंडू तेवढ्यात म्हणाला बाबा मला तुम्ही शेतात काम करून शिकवले पण मला



देखील काही जास्त टक्के घेता आले नाही मला माफ करा मी काही आता पुढे शिक्षण घेणार नाही. तुम्हालाच शेतात मदत करेल, त्याचं हे बोलणं ऐकून बंड्याच्या बापाने त्याला हृदयाला कवटाळून मिठी मारली आणि अश्रूंच्या अभिषेकात बंड्या न्हाऊन निघाला हे अश्रूंचे मेघ ओसरल्यानंतर बंड्याचे बाबा त्याला म्हणाले "हे बघ पोरा मला काय लिव्हता वाचविता येत नायं बघ. म्या काय साळंत गेलो नायं. आडवी रेग पणं कवा मारली नायं. जन्मल्यापासून या काळ्या मातीतच साळा शिकलो. या मातीतून मोती पिकवून माणसं जगवली अन् माणसाला माणसं जोडून ठेवली झाड जसं परोपकारानं सजलेलं असतं, नम्रतेनं झुकलेलं असतं तसा झुकून राहिलो अन् सुखात आनंदात तुला साळला धाडलं पोरा मला काय या टक्केवारीचं सुदीक समजत नाही. पण बघ एकच सांगतो तुला जमल ते चांगलंच कर तुला डॉक्टर, इंजिनिअर होता नाय आलं तरी बी चाललं पण माणूस होता आलं पाहिजे, माणूस म्हणून जगता आलं पाहिजे महात्मा फुलेंसारखं, राजा शिवाजीसारखं, दुसऱ्यांच्या जीवनात आनंद पेरायला शिक पोरा जीवनाची कोणतीच परीक्षा नापास होणार नायसं बघ... बंड्याच्या बापाचे हे शब्द ऐकून सरपंचालाबी आपल्या चुकीच्या वागण्याची जाणीव झाली त्यांनीही त्यांच्या मुलाला आपल्या हृदयाशी कवटाळले आणि खऱ्या शिक्षणाची सुरुवात झाली. मानवाचे जीवन प्रतिष्ठा फक्त टक्केवारीवर कागदपत्रांवर अवलंबून नसून ती त्यांच्या जगण्यातल्या वागणुकीतल्या प्रेम, माया, आपुलकी, नम्रता, सहनशीलता, अशा अनेक चमचमत्या सदगुणांवर अवलंबून असते हेच त्रिवार सत्य...

**ढीगभर कागदपत्रांपेक्षा**
**एकच सद्गुण बरा...**
**माणूस होऊन जगण्याचा**
**हाच नवा मार्ग खरा...**

# पंढरीची वारी



मधुकर ए. निलेगावकर
संपर्क क्र. : ९४२१३७५६९१

आधुनिक केसरी

**माणसाच्या पूर्वसंचित सत्कर्मांच्या पुण्यामुळे माणसाला माणसाचा जन्म मिळतो. त्यानंतर, माणूस मोठा झाल्यावर जीवनी सन्मार्गाने चालू लागल्यानंतर त्याचं जीवन सुखसमाधानाचं होत राहतं. परंतु, त्यास स्वार्थ आणि मोहाचा लोभ सुटल्यास त्याच्या चित्तवृत्तीत बदल होऊ लागतो. मग, तो माणूस बहकल्यासारखा वागू लागतो. तो अधिकाधिक मोहाच्या आहारी जाऊ लागतो. व्यसन लागल्यासारखा तो वित्त, धन, सोने, दागिने, जडजवाहीर, इस्टेट इत्यादी गोष्टींच्या आहारी जातो. तसेच, सत्तेच्याही मोहाचा रोग त्याला जडतो, आणि इथेच, माणूस सत्कर्मे सोडून दूष्कर्माच्या मार्गाला लागतो.**

इथपासूनच त्याच्या अध:पतनाला सुरुवात होते. तसेच, त्याचे हे प्रमाण इतके वाढते की, माणसातील माणुसकी नष्ट होवून त्याच्यात राक्षसी वृत्तीचे प्रमाण वाढू लागते. माणसाच्या ह्या वृत्तीला लगाम हा घातला गेलाच पाहिजे. ख-या अर्थाने माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. माणूस म्हणून जगण्यासाठी माणसाने धार्मिक सात्विक वृत्ती अंगिकारली पाहिजे.त्यासाठी, प्रत्येक शतकातील संतांनी, महात्म्यांनी अशा दूष्ट माणसांना सन्मार्गावर आणण्यासाठी शर्थीचे खूप प्रयत्न केले आहेत. त्यासाठी, थोर अशा संतांनाही खूप,अतोनात असा त्रास, हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. थोर संत ज्या ज्ञानेश्वर महाराजांनी पंढरीची वारी सातशे वर्षांपूर्वी सुरु केली त्यांनाच त्या काळातील दूष्ट लोकांनी त्यांचा व त्यांच्या भावंडांचा छळ केला. त्यांना खूप त्रास दिला. पण, त्याच ज्ञानेश्वर महाराजांनी अखंड विश्वाचे कल्याण व्हावे आणि संपूर्ण विश्वाच्यासुखासाठी परमात्म्याकडे "पसायदान" मागितले. तसाच संत श्री तुकाराम महाराज, संत श्री नामदेव महाराज, संत श्री गोरा कुंभार, संत जनाबाई अशा सर्व संतांना दृष्ट लोकांकडून खूप त्रास झाला आहे. तरिही सर्व संतांनी सर्व लोकांच्या कल्याणासाठीच आयुष्यभर सत्कार्य केले आहे. सर्व संतांची मांदियाळी श्री ज्ञानेश्वर माऊलींसोबत विठूरायाच्या पालखीसोबत विठ्ठलाचा नामघोष करीत पंढरीची वारी करीत असे. ही सर्व संतमंडळी जशी विठ्ठल देवाला अनन्य भावाने शरण जात असे, तसे, सर्वांनी अंतःकरणातून त्या पांडुरंगाला शरण गेलं पाहिजे. जसे, विठ्ठल देवाचे खरे भक्त कायिक, वाचिक व मानसिक भावनेने पांडुरंगाला शरण जातात. संतश्री थोर संत श्री ज्ञानेश्वर माऊलींनी आळंदी ते पंढरपूर अशी विठूमाऊलीच्या दर्शनासाठी पायी वारी सुरु केली. ती परंपरा आजतागायत सातशे वर्षांनंतरही अखंडपणे, अविरतपणे चालू आहे. हे पंढरीच्या वारीचं वैशिष्ट्य आहे. पंढरीच्या वारीत अठरापगड जातीचे लोक अत्यंत धार्मिक भावनेने सहभागी झालेले असतात. त्यात आठ वर्षांच्या मुलामुलींपासून सत्तर पंचाहत्तर वर्षांचे आजीआजोबाही यात आनंदाने सहभागी झालेले असतात. आळंदीतून निघालेल्या पालखीसोबत तरुण माणसे, आणि विशेष म्हणजे, लहान मुले व सत्तरीच्या पुढील वयाचे वृध्द बायका माणसे हे विठ्ठलदेवाचे वारकरी टाळ, मृदंगाच्या व विठ्ठलनामाच्या जयघोषात पंढरीची वाट चालत असतात. विशेष म्हणजे, सासवडचा अवघड घाट लहान मुले व हे वृध्द वारकरी विठ्ठलाच्या कृपेने लिलया पार करीत पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतात. महाराष्ट्रातून शेकडो संतमहंताच्या पालख्या त्यांच्या धार्मिक ठिकाणावरुन पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. या वारीत वारक-यांच्या सेवेसाठी त्यांच्या औषधोपचारासाठी अनेक डॉक्टर्स व नर्सेस, कंपाऊंडरची टीम सोबत असते. अनेक मोठे निष्णात डॉक्टर्स, मोठे उद्योगपती करोडो इस्टेटीचे मालक या वारक-यासोबत एकत्र जेवण, खात तसेच, गप्पा मारत, मदत करीत, विठ्ठलाचं नामस्मरण करीत वारीसोबत चालत असतात. तेथे ते आपला सगळा अहंकार, "मी"पणा विसरुन वारीत सहभागी झालेले असतात. पंढरीची वारी माणसाला माणूस म्हणून जगायला, माणुसकीनं वागायला शिकवते. इथे माणसाचा अहंकार गळून जातो. थोर संत ज्ञानेश्वर महाराज जेव्हा प्रथम आपल्या भावंडांबरोबर आळंदीला गेले होते तेव्हा, तेथे विठ्ठल देवाचं दर्शन घेतल्यावर श्रीज्ञानेश्वरांना खूप आनंद झाला तेव्हा, सहजच शेजारी उभ्या असलेल्या मुक्ताईला ते म्हणाले "रुप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी! मुक्ताईला ज्ञान देव कौतुकाने साजणी म्हणतात! तेव्हा, मुक्ताई म्हणाली, ज्ञानदादा, तुम्हाला विठ्ठलाला पाहून सुख झाले. पण, इतर सर्व जनांना विठ्ठलाचं दर्शन घेतल्यावर सुख का बरे मिळत नाही ? तुम्ही म्हणता, तो हा विठ्ठल बरवा!तो हा माधव बरवा! तसं इतर लोकांना का बरे वाटत नाही. त्यावर ज्ञानोबा म्हणाले, अगं मुक्ते! "बहूत सुकृतांची जोडी म्हणूनी विठ्ठले आवडी" म्हणजे, मुक्ता, पूर्वजन्माची काही पुण्याई असेल तरच, ईश्वराबद्दल आवड निर्माण होते. म्हणजे, नीती, धर्माचे आचरण आणि ईश्वराची उपासना मनापासून केली तरच, ईश्वराबद्दल आवड निर्माण होते. श्रीज्ञानदेव म्हणतात, सर्व सुखाचे आगर विठोबाच आहे. तोच सर्व चराचरात भरलेला आहे. हा अनुभव ज्ञानेश्वरांनी घेतला तेव्हा, ते म्हणतात, "अजी सोनियाचा दिनू वर्षे अमृताचा घनू। हरी पाहिला रे! हरी पाहिला रे!" हे सुख काय आहे याची आपल्याला कल्पना नसते. संत तुकारामांना हा अनुभव आला तेव्हा, त्यांनी अभंग लिहिला "आनंदाचे डोही आनंद तरंग"! संत श्री नामदेव महाराजांना अनुभव आला तेव्हा, त्यांनी अभंग लिहिला, सुखाचे हे सुख श्रीहरी मुख। पाहता भूक तहान गेली। विठ्ठलाच्या दर्शनाचा असा अनुभव सर्व संतांना आला, तो त्यांनी त्यांच्या अभंगांतून व्यक्त केला आहे. विठ्ठलाच्या दर्शनानंतर



काय स्थिती असेल या संतांची! असं म्हणतात "ब्रम्हानंदी जीव होई वेडा की पिसा" अशी अवस्था संतांची झालेली असते. सर्व देहभान विसरून काया, मने, वाचे ते विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन झालेले असतात. ही खरी भक्ती आहे. अशा विठूरायाच्या दर्शनासाठी सर्व पालख्या आषाढी एकादशीला पंढरपूरला येऊन एकत्र मिळतात. विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर " सावळे सुंदर रूप मनोहर। राहो निरंतर हृदयी माझे " अशी भावना सर्व वारक-यांची असते. ते तेथील दृश्य, तो आनंद अवर्णनीय असतो. वारक-यांच्या चेह-यावरील आनंद आणि समाधान ओसंडून वाहत असते. असा हा अलौकिक सोहळा असतो. आषाढी एकादशीला लाखोंच्या संख्येने वारकरी पंढरपूरला एकत्र जमतात. पंढरपूरला आषाढी एकादशीला लाखोंच्या संख्येने वारकरी येतात त्यामुळे, विठ्ठलाचं दर्शन होण्यास त्यांना त्यादिवशी पंधरा ते वीस तास लागतात. म्हणून, त्यामुळे, बहुतांश वारकरी त्यादिवशी विठ्ठल माऊलीच्या मंदिराच्या कळसाचे, आणि नामदेव पायरीचं दर्शन घेऊन विठ्ठलाचं नामस्मरण करीत स्वग्रामी मार्गस्थ होतात. देवाचं दर्शन जरी झालं नाही तरी त्यांच्या तनात व मनात विठ्ठल देव असतो. पंढरपूरला आषाढी एकादशीला लाखोंच्या संख्येने वारकरी येतात त्यामुळे, त्यांना विठ्ठलाचं दर्शन होण्यास त्यादिवशी पंधरा ते वीस तास लागतात. म्हणून ते दूरुनच विठ्ठलदेवाचं दर्शन घेतात,ही खरी महाराष्ट्राची संस्कृती आहे. सातशे वर्षांपासून ही वारीची परंपरा आजतागायत चालू आहे. या चिरंतन संस्कृतीचेच दर्शन घडविण्याचा प्रयत्न मी खालील कवितेतून केला आहे.

" पंढरीची वारी "

अमृताचे सुख लाभते पंढरीच्या वारीत
नामाचा महिमा कळतो विठू नामगजरात
वारीत नसे कुणी लहान नसे कुणी थोर
अवघ्यांच्या मुखी असतो नामाचा गजर
उच्च,नीच भाव नसतो कदापिही या वारीत
पांडुरंग नाम असते मुखात, विठ्ठल हृदयात
चालो किती चाले वारीत कधी ना थकती भक्त
कृपादृष्टी चालवे भक्तांसी विठूमाऊली वारीत
नसे भेदभाव माऊलीच्यावारीतकुणाचा कुणाला
ज्याच्या त्याच्या मुखी असे गजर विठूमाऊलीचा
वर्षानुवर्षे करिती भक्त पंढरीवारीचा हा प्रवास
दूरदूरच्या भक्तांना लाभतो एकमेकांचा सहवास
असता पुण्य पदरी भक्तांच्या निज जीवनात
देते दर्शन विठूमाऊलीभक्तांसी मंदिरी पंढरपूरात
सोहळा पुर्ण होतो वारीचा आषाढी एकादशीला
दर्शन घेता गावोगावीचेभक्त जाती निज गावाला
जय जय विठ्ठल! जय हरी विठ्ठल! जय जय
विठ्ठल!जय हरी विठ्ठल! विठ्ठला मायबापा!
तुज नमो! तुज नमो! तुज नमो! तुज नमो!तुज नमो!

# धोंडी धोंडी पावशा



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**दोन तीन दिवसांपूर्वी सहज शाळेतून पायी पायी घरी येताना, चाफेकळी चे बोटं दाबता दाबता बाळाने एक गीत गायला सुरवात केली. ये आई ! बघ ना ग! ये आई, बघ ना गं,हे ऊन गं, कित्ती कित्ती दमवतयं. बघ ना ग, या या घामाच्या थेंब थेंबातून ठिपकतयं. ये आई ! आम्हा मैत्रिणींचा एकच हशा पिकला. थोडे दिवस बाळा, आता पावसाळा चालू झाला की, नाही होणार त्रास. मग कधी पावसाळा चालू होईल.**

होईल थोडया दिवसांत. थोड्या दिवसांत म्हणजे केव्हा ? अरे थोड्या म्हणजे थोड्या..

जाऊ दे बाबा आल्यावर मी बाबंनाच विचारतो. कधी कधी वेळ मारून नेण्याशिवाय पर्यायच नसतो. जोक सपाट पण एका क्षणाला वाटले, खरचं केव्हा येणारं पाऊस.नको झालाय हा उन्हाळा आता. सारा सार विचार करता लवकरच पाऊस यावा असा विचार डोक्यात आला. बाबा घरी येत नाही तोवर याचं झालच सुरू. थोड्या दिवसांत म्हणजे केव्हा हो बाबा. बाबा ही मग थोड्या दिवसांत म्हणजे काही दिवसांत, काही दिवस का ? मग ऊद्या का नाही ? वगैरे वगैरे सात साडे सात वर्षाच्या मनाच्या त्या कल्पना , बाबा उद्या का नाही पाऊस पडत. अरे! बस झाले की आता, सारखे सारखे आपले पाऊस पाऊस लावलेय. पाऊस पाहिजे तर जा माग जा मग त्या धोंडीला. डोक्यात चाललेल्या विचारावरून सहज बोलून गेले.तोवर याचं आता हा धोंडी कोण ? बाल मनच ते कधी कधी एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणे किती अवघड होऊन जाते नं! ये आई सांग ना हा धोंडी कोण ? त्याला मागितल्यावर पाऊस येतो. धोंडी हे एक पात्र आहे. मला थोडी फार माहिती आहे ती मी तुला सांगते. बाळा... आम्ही लहान असताना तुला माहिती आहे का ,जून महिन्यात जशी शाळा सुरू होते, तसाच जून महिना सुरू झाला की शेतीच्या कामांना ही सुरुवात व्हायची. पहिल्या आठवडयात म्हणजे ७ जून ला मृग नक्षत्र निघते.आणि मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर पाऊस सुरू होतो.असे मोठी माणसे आम्हाला सांगायची. आणि पाऊस सुरू ही व्हायचा. अर्थात कधी तो मागे पुढे व्हायचा किंवा आजही होतो. पूर्वीच्या लोकांचे काही तर्क किंवा आराखडे असायचे. पूर्वी प्रसारमाध्यमे खूप कमी असल्यामुळे असेल कदाचित म्हणजे रेडिओ, पत्र, दूरदर्शन अशी काही साधने होती. हे ही जास्त नव्हते. पाण्याचे घटिका पात्र वाळूचे घटिका पात्र इत्यादी पूर्वीचे लोक काही पक्षांच्या येण्याने त्यांच्या आवाजावरून अनेक पक्षांचे आवाज ध्वनी वरून म्हणजे जसे पावशा पक्षी ओरडतो , त्याच्या ओरडण्याची ती एक विशिष्ठ धून ती म्हणजे 'पेरते व्हा' त्याला स्थलांतरसारखे शास्त्रीय कारण



असावे. पण तरी असा आवाज म्हणजे 'पेरते व्हा ' 'पेरते व्हा' आला की शेतीच्या कामांना सुरुवात व्हायची. हे एक उदाहरण बर का! शेतकर्यांचे जीवन पावसावर अवलंबून असते. आणि एखाद्या वर्षी पाऊस पडायला उशीर झाला की पाऊस पडावा म्हणून वरुण राजाला विनंती करण्यासाठी शेवटी प्रयत्न करणे हेच त्यांच्या हातात असायचे. आणि त्याच विचार धारेतून तयार झालेले एक पात्र म्हणजेच हा धोंडी तर हा धोंडी म्हणजे फार पूर्वी जुन्या काळी जून महिना उलटून खूप दिवस झाले तरी पाऊस पडला नाही तर एक धोंड्या नामक पात्र तयार करून म्हणजेच कुमार वयोगटातील एक मुलगा त्याच्या कमरेला लिंबाच्या झाडाच्या छोट्या छोट्या फांद्यांच्या साहाय्याने कमरेभोवती वस्त्रा प्रमाणे गुंडाळून डोक्यावर एक पाट आणि आजूबाजूला काही त्याच वयोगटातील मुले अशी ती संकल्पना. सुरुवातीला एका ठिकाणी जमून एक धोंडा ( दगड ) घेऊन त्याची पूजा केली जाते. अर्थात प्रत्येक ठिकाणी अशीच पद्धती असे काही अपेक्षित नाही. वेगवेगळ्या पद्धती असू शकतात . याच्यात काही त्रुटी उणीवा असू शकतात. जी थोडी फार माहिती आहे त्याच्यावरून लिखाणाचा एक छोटासा प्रयत्न. तर त्याची पूजा करायची. काही मुलांनी छोटया ताटावरती चमचा वाजवत पुढे पुढे चालायचे . काही मुले 'धोंडी धोंडी पाणी दे रे, पावशा पावशा घुमू दे.' थोडक्यात काय तर पावशा पक्षी रान माळ तून घुमायला लागला की पाऊस येणार ही धारणा असावी. तसेच मोठमोठ्याने 'धोंडी धोंडी ' 'पावशा' 'धोंडी धोंडी ' 'पावशा ' धोंडी धोंडी पाणी दे रे, रान माळ पिकू दे. असे गीत गात गात घरोघरी गल्ली बोळातून जायचे, घरातील ही लोकं धोंडीच्या डोक्यावरील पाटावर पाणी ओतून पूजा करायचे. आणि एक घरातील जी भाजी भाकर असेल ती नैवेद्य म्हणून देत असावे कदाचित. आणि पुन्हा एकदा 'धोंडी धोंडी पावशा ' करत पुढच्या घरी निघायचे. डोक्यावरचा पाटाची कल्पकता बहुतेक वरून ओतले जाणारे पाणी बाजूंनी पडावे. जेणेकरून धोंडी होणाऱ्या मुलाचे पाण्यापासून संरक्षण व्हावे यासाठी डोक्यावरच्या पा टा ची संकल्पना आली असावी. आणि लिंबाच्या पाला हा उष्णतेस उपयुक्त तसेच आरोग्यास उपयुक्त आहे. म्हणून कदाचित लिंबाच्या झाडाचा पाल्याचा वापर केला गेला असावा.

एक एक करत गावातून बऱ्यापैकी फिरून येऊन, एकत्र जमून ती भाजी भाकरी काही असेल ते एकत्र जमवून ज्या ठिकाणी धोंड्याची पूजा केली असेल त्या ठिकाणी पुन्हा एकत्र जमून त्याच भाजी भाकरी चा नैवेद्य दाखवून वरुण राजा ला पुन्हा एकदा प्रार्थना करून भाजी भाकरी खाऊन हा कार्यक्रम आटोपत असावा. काही ठिकाणी पाऊस पडला नाही तर महादेव कोंडला जातो. असे ऐकण्यात आले होते. म्हणजे प्रत्येकाची पद्धती वेगवेगळ्या असूचं शकतात. म्हणजे मला याच्याबद्दल जास्त काही माहिती नाही. काही उणीवा असू शकतात. जे माझ्या अल्प बुद्धीतून सुचले ते लिहण्या चा प्रयत्न. काही अयोग्य असल्यास क्षमस्व. माझ्या संकल्पनेतून तयार झालेले धोंडीचे गीत... पाऊस येऊ दे रे धोंडी धोंडी पीक पाण्याची झालीय कोंडी. कोंडी आता ती सुटावी, नभातली घागर फुटावी. गाय न वासरू भेटावी, हात तोंडाची गाठ पडावी. पाऊस येऊ दे रे .... भेगळली भुई रे , कशी आम्ही सांधावी. ओसाड माळाव नक्षी कशी गोंधावी. मातीच्या गंधाची दरवळ वाऱ्यावर दाटावी. गुदमरल्या श्वसाची त्या कोंडी रे फुटावी. पाऊस येऊ दे रे धोंडी...




# ज्येष्ठ अभिनेत्री आशाताई काळे यांना जीवनगौरव पुरस्कार

आधुनिक केसरी

मराठी मनोरंजन विश्वातील ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाचा जीवनगौरव २०२३ बालगंधर्व पुरस्कार जाहीर झाला आहे. बालगंधर्व रंगमंदिराच्या ५५ व्या. वर्धापन दिनानिमित्तानं ज्येष्ठ अभिनेत्री अशा काळे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.आशा काळे या मराठी नाट्यसृष्टीतल्या एक आघाडीच्या अभिनेत्री आहेत. लग्नानंतर त्यांचे नाव गौरी माधव नाईक असे झाले असले तरी त्या आशा काळे या नावानेच प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म २३ नोव्हेंबर १९४८ रोजी गडहिंग्लज येथे झाला. शालेय शिक्षण कोल्हापूर अणि पुणे येथे झाले. वयाच्या १४ व्या वर्षी नाटकांत कामे करावयास सुरुवात केल्याने त्यांना कॉलेजचे शिक्षण मिळाले नाही. कथ्थक नृत्याचे त्यांनी शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले असून त्या सुरुवातीला नृत्याचे कार्यक्रमही करीत. आशा काळे यांचे पहिले व्यावसायिक नाटक, 'सीमेवरून परत जा' हे, आणि पहिला चित्रपट 'तांबडी माती'. त्यांच्या अभिनय कारकिर्दीला २०१५ साली ५० वर्षे पूर्ण झाली.मराठी सिनेमांत आपल्या अभिनयाननं चार दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत आशा काळे यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत मराठी चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.बाळा गाऊ कशी अंगाई, अर्धांगी,अशी रंगली रात्र, बंधन, कुलस्वामिनी अंबाबाई, कैवारी, तांबडी माती, थोरली जाऊ, चांदणे शिंपीत जा, चुडा तुझा सावित्रीचा, गनिमी कावा,गणाने घुंगरू हरवले, घर गंगेच्या काठी, देवता, पुत्रवती, बंदिवान मी या संसारी, ज्योतिबाचा नवस, चोराच्या मनात चांदणे, माहेरची माणसे,सतीची पुण्याई, सासुरवाशीण, हा खेळ सावल्यांचा, संसार, सतीची पुण्याई, सतीचे वाण, हीच खरी दौलत, बायकोचा भाऊ, नशिबवान.मराठी सिनेमांबरोबर आशा काळे यांनी मराठी नाटकांतही काम केलं आहे. त्यांनी गहिरे रंग, एखादी तरी स्मितरेषा, गुंतता हृदय हे, एक रूप अनेक रंग, घर श्रीमंताचं, नल दमयंती, पाऊलखुणा, फक्त एकच कारण, बेईमान, देव दिनाघरी धावला, मुंबईची माणसं, लहानपण देगा देवा, वर्षाव, वाहतो ही दुर्वांची जुडी, महाराणी पद्मनी, वाऱ्यात मिसळले पाणी, विषवृक्षाची छाया, सीमेवरून परत जा, संगीत सौभद्र, वेगळं व्हायचंय मला, साटं लोटं या नाटकांत काम केलं होतं त्यांना हा पुरस्कार जाहिर झाल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे !

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# परदेशी विद्यापीठ : उड्डाणाची घाई नको



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**काही महिन्यापूर्वी परदेशी विद्यापीठा साठी भारताने दारे उघडली होती. आता बातमी आहे की आपली विद्यापीठे परदेशात क्यामपस उघडणार!! इथे घरातच दर्जा, गुणवत्ता सांभाळणे कठीण होत असताना बाहेर जाऊन आपण काय दिवे लावणार अन् अशा परदेशात स्थापन होऊ पाहणाऱ्या भारतीय विद्यापीठांना कोण प्रतिसाद देणार हा गहन प्रश्न आहे. परदेशात येथील विद्यापीठांनी शाखा, परिसर उघडण्याचे कारण काय? याचे एक उत्तर भारतातून तिथे गेलेल्या नागरिकाच्या मुलाची कमी खर्चात सोय करणे! पण कमी खर्चात परदेशात जाऊन, व्यवस्था उभी करून ज्ञानदान करणे शक्य आहे का? मुळीच नाही. कारण तिथला सर्व खर्च (पगारासह) हा तिथल्या चलनात म्हणजे डॉलर, युरो, पौंडमध्ये असणार.**

ते बजेट सांभाळणे तसे कठीण. अन् तिकडे कोण जाणार ? खाजगी विद्यापीठे की सरकारी संस्था ?सरकारी संस्थांना इथे भारतातच दिलेल्या बजेट मध्ये दर्जा सांभाळताना नाकी नऊ येते!तिथले बजेट कसे सांभाळणार ?खाजगी विद्यापीठांनी तर बाजार पेठा उघडल्या आहेत. काही मोजके अपवाद सोडले तर पैशाच्या( आजच्या भाषेत खोक्याच्या )बदल्यात ते ज्ञान दान नव्हे तर पदवी ' दान 'करतात! परदेशात जाऊन ते उत्तम शिक्षण देण्याचे पुण्यउदात्त कार्य करतील ही शक्यता कमीच. इथे भारतातच उत्तम शिक्षकाची वानवा आहे.निकृष्ट दर्जाची कशीतरी पी एच डी मिळवून ,काहीतरी सेटिंग करून प्राध्यापक होणाऱ्यांची संख्या वाढते आहे. परदेशात तेथील चलनात पगार द्यावा लागणार. तिथे परिसर,प्रयोग शाळा, उभाराव्या लागणार. यात प्रचंड आर्थिक गुंतवणूक लागणार. हे गणित कुणी सोडवून पाहिले का ? दुसरा उद्देश परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करून भरपूर फी आकारून पैसे कमावणे!पण परदेशात एका पेक्षा एक चांगल्या दर्जाची विद्यापीठे असताना आपल्या विद्यापीठात कोण प्रवेश घेणार ?आय आय टी चा दर्जा तेव्हढा जग मान्य आहे. पण त्याच्या भारतातील क्यांपसमध्येच प्राध्यापका च्या जागा रिकाम्या आहेत. मग परदेशा साठी उत्तम अनुभवी शिक्षक कुठून आणणार ? तेही परदेशी चलनात पगार घेणारे ? एकूणच हे प्रपोजल अव्यवहार्य वाटते!

आज आपल्याकडे खाजगी, अभिमत, स्वायत्त विद्यापीठाची संख्या वाढली आहे. आय आय टी, एन आय टी या सरकारी संस्थांची संख्या देखील गेल्या काही दशकात किती तरी पटीने वाढली. पण दर्जा वाढला का ? गुणवत्ता आहे का ? या शिक्षण संस्थातून पी एच डी च्या माध्यमातून जागतिक दर्जाचे संशोधन होते का ?याचे आधी परखड ऑडिट करा.मग आपल्या विद्यापीठांना बाहेर जायची परवानगी द्या.

आपणच मानांकन केलेल्या शिक्षण संस्थांचे रँकिंग, मार्किंग नीट तपासले तर लक्षात येईल काही हाताच्या बोटावर मोजण्या इतकी निवडक विद्यापीठे,अन् निवडक आय आय टी सोडल्या तर अध्यापन,संशोधन, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,कौशल्य या सर्वच बाबतीत आनंदी आनंद आहे.आपल्याच नेशनल रँकिंगचे १ल्या अन् शंभराव्या शिक्षण संस्थेचे गुण तपासले तर मी काय म्हणतो ते सहज लक्षात येईल. एकीकडे नोकऱ्या नाहीत ही ओरड अन् दुसरी कडेसर्व कॉलेजेस मध्ये अर्ध्या अधिक जागा रिक्त! एकीकडे संस्था,त्यातील प्रवेश संख्या वाढतेच आहे दरवर्षी.( इंजिनियरिंग



चे प्रवेश सुरू झाले नाहीत कारण वाढलेली प्रवेश संख्या दिल्ली हून अप डेट झाली नाहीअजून! ). दुसरीकडे अनेक जागा दर वर्षी रिक्त राहताहेत! हे काय गौडबंगाल आहे ? सिव्हिल, मेक्यानिकल अशा शाखांचेमहत्वकायम असूनहीसगळीरांग आय टी संगणकअन् आता एआयकडे! या आपल्याच घरातील, गल्ली बोळातील मूर्ख पणाला आळा घालण्या ऐवजी आपण परदेशात विद्यापीठे स्थापन करायला निघालोय! सर्व विज्ञान शाखांचे महत्व मुळीच कमी झालेले नाही.पण डोक्यात इंजिनिअरिंग,मेडिकल चे भूत सवार झाल्या मुळे या शाखा कडे हुशार विद्यार्थी जातच नाहीत. कलर,वाणिज्य बाबत तीच स्थिती आहे. जी पुढच्या दृष्टीने चिंतनीय आहे.परदेशात कुठेही असा दूजाभाव दिसणार नाही. कलेला देखील तितकेच महत्त्व दिले जाते. शिक्षणा विषयीचा आपला मूलभूत दृष्टिकोन बदलणे आता फार गरजेचे आहे. एन ई पी ,राष्ट्रीय शिक्षण धोरणा च्या अम्मल बजावणी विषयी जो गोंधळ,खेळ खंडोबा चालू आहे बोलका आहे.शिक्षणाच्या बाबतीत थोडे नाक वर असलेली दक्षिणेकडील राज्ये तर या शिक्षण धोरणाकडे चक्क काणा डोळा करतांना दिसताहेत! जिथे आपल्याच देशात आपल्याला शिक्षणा च्या क्षेत्रात नेमके काय हवे, ध्येय, उद्दिष्ट काय, कुठे कसे जायचे याबाबत एक वाक्यता नाही, तिथे परदेशात आपली विद्यापीठे स्थापन करणे, हास्यास्पदच वाटते.

त्या ऐवजी देशातल्या संस्थाचा दर्जा कसा सुधारेल याकडे लक्ष द्यायला हवे. दर्जेदार संशोधन करण्या साठी सोयी सुविधा, पैसा उपलब्ध करायला हवा. खाजगी विद्यापीठात नेमके काय चालते,त्याच्या अध्ययन,अध्यापन, संशोधन याचा दर्जा तपासायला हवा. सध्या नॅक, एन बी ए,एन आय आर एफ हेच काम करते आहे. पण ती एकूणच पद्धत, ते गुण दान संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. तिथे काय सुधार करता येईल हे आधीबघा.मग परदेशात उड्डाण करण्याचे स्वप्न बघा.. प्रायोरिटी कशाला द्यायची हे महत्वाचे!

# भारत अमेरिका संबंध : आलेखातील उच्चांक बिंदू



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**प्रस्तावना : स्वातंत्र्याच्या आमृत महोत्सवाच्या निमित्ताने भारत-अमेरिका संबध नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखली एक नवे वळण घेत आहेत. विशेषत: नेहरू युगातील आलिप्ततावादाचे एक नवे रूप या काळात प्रकट झाले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीमध्ये भारत अमेरिका संबंधाचा हा सुर्वण काळ म्हणावा लागेल, कारण राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संबंधाच्या क्षेत्रात एक नवे ऐतिहासिक पर्व उदयास आले आहे. या संबंधाचे स्वरूप हे प्रामुख्याने ऐतिहासिक व सांस्कृतिक आहे असे होलन फर्बर यांनी म्हटले यांनी म्हटले आहे. जे. बी. यु. (खंड-34:68 पृष्ठ 95-116) या भेटीच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्य अतिथी असा विशेष दर्जा देण्यात आला आहे. प्रे. जो. बिडेन यांच्या काळातील ही आजवरची विदेशी पाहूण्यांची तिसरी स्टेट व्हिजीट होय. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी दुसऱ्या वेळा अमेरिकेतील कॉग्रेस या संयुक्त सभागृहात विशेष पाहूणे म्हणून उद्बोदन करणार आहेत. अमेरिकेतील 42 लाख भारतीयामध्ये उत्साहाची लाट संचारली आहे. भारत आणि अमेरिका ही जगातील दोन महान लोकशाही राष्ट्रे आहेत. अमेरिकन लोकशाहीला सुमारे 250 वर्षांचा इतिहास आहे. तर भारत एक जिवंत (व्हायब्रंट) लोकशाही राष्ट्र आहे. त्यामुळे चीनपेक्षा भारतावर अमेरिकेचा अधिक विश्वास आहे. युक्रेन युद्धानंतर येऊ घातलेले मंदिचे संकट, हिंद प्रशांत क्षेत्रातील चीनच्या कारवाया आणि करोना संकटाशी यशस्वी झुंज देऊन भारताची अर्थ व्यवस्था 7.2% विकास दराच्या दिशेने झेपावत असतांना, अमेरिकेने भारताच्या जगातील वाढत्या प्रभावात मान्यता देण्याचा हा एक मौलिक क्षण होय.**

**ऐतिहासिक संदर्भांची नोंद :** प्रा. हेन्द्रि पार्क यांनी म्हटल्या प्रमाणे 1776 साली जन्मलेले अमेरिका हे जगातील सर्वात तरूण राष्ट्र आहे. अमेरिकेचे वर्णन अनेक देशांचा देश आणि अनेक लोक मिळून तयार झालेला लोक समुदाय असे केले आहे. ( प्रस्तावना पृष्ठ-2 )1893 साली स्वामी विवेकानंदानी शिकागो धम्म परिषदेत 17 व्याख्याने दिली आणि तेथे योग आणि वेदांगाचा पसार केला. त्यानंतर मार्कट्वेन यांनी 1796 साली भारताला भेट दिली. त्यानी लिहिलेल्या प्रवास वर्णनामध्ये असे म्हटले की, जगातील अनेक देशांना मी भेटी दिल्या परंतु दुसऱ्यांदा भेट द्यावी असे वाटणारा एकमेव देश म्हणजे भारत होय. यावरून भारतीय संस्कृतिचे अमेरिकन लोकांना पूर्वीपासून अकर्षन असल्याचे सिद्ध होते. मार्कट्वेन यांच्या 'फॉलोइंग द इक्वेंटर विथः रिव्हीलेशन' या ग्रंथात त्यांनी भारताविषयी 'स्वप्न भूमि' अशी नोंद केली आहे. भारतीय स्वांतत्र्य युद्धात तेंव्हाचे अध्यक्ष ट्रँकलिन डी रूझवेल्ट यांच्या काळात अमेरिकेने भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे जबरदस्त समर्थन केले, तसेच अमेरिकन स्वातंत्र युद्धात भारतीयांनी पुरक भूमिका पार पाडली. अमेरिकन स्वातंत्र युद्धात बाल्टीमोर च्या लढाईत अमेरिकन स्वातंत्र्य विरांनी वापरलेले देशी रॉकेट भारतातील फ्रेंच वसाहती मध्ये बनवण्यात आले होते. इंग्रजाविरूद्ध क्रांतीचे संघटन करणाऱ्या लाला हरदयाल अनेक विरांनी अमेरिकेत अश्रय घेतला होता. अमेरिकेच्या राष्ट्रगीतामध्ये सुद्धा अप्रत्यक्ष पणे भारताच्या सहकार्याचा उल्लेख आहे. भारत आणि अमेरिका या दोन्ही राष्ट्रांनी मानवी मूल्यावर श्रद्धा ठेवून वाटचाल केली आहे, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्या या भेटीला विशेष महत्व दिले जात आहे. गॅलप ( गॅलप. कॉम ) सर्वेक्षणामध्ये नरेंद्र मोदी हे 76 % गुण घेऊन जगात सर्वात लोकप्रिय नेते असल्याचे सिद्ध केले आहे. त्यांच्या रॉक स्टार नेतृत्वामुळे अमेरिकन जनतेच लक्ष वेधले गेले आहे. तसेच 2022 मध्ये केलेल्या पाहिणीनुसार 77 % अमेरिकन जनतेन भारता विषयी सकारात्मक अनुकूलता दर्शविली आहे, असे मॉर्निंग कन्सल्टच्या सर्वेक्षणात आढळून आले आहे. भारत जी-वीस देशाचा अध्यक्ष आहे. तसेच स्कॉड ब्रिक्स इत्यादी शिखर परिषदामध्ये महत्वाची भूमिका पार पडत आहे. 1991 साली सोव्हिएट रशिया कोसळल्यानंतर एक ध्रुवी जगात अमेरिकेचे महत्व वाढले. त्यास चीन आव्हान देऊ लागला आहे त्यामुळे शीत युद्धानंतर आता अमेरिकेला जागतिक सत्ता समतोलाच्या राजकारणात भारताचे साहाय्य घेण्याशीवाय पर्याय उरलेला नाही.

**चित्र कसे बदलले ?** भारतीय स्वातंत्र्यानंतर लगेच प्रे. आयसेनहोवर आणि प्रे. जॉन एस्. कॅनडी जगातील उगवते लोकशाही राष्ट्र म्हणून भारतालाकृषी विकास आणि विज्ञान तत्रज्ञान या क्षेत्रात भारताला मदतीचा हात दिला म्हणून भारताला विशेष सहाय्य केले. 1962 साली साम्यवादी चीनने भारतावर आक्रकण केल्यानंतर अमेरिकेने भारताला मदतीचा हात दिला. कारण त्यावेळी कोवियट रशियाने भारत आमचा मित्र असला तरी चीन आमचा भाऊ आहे अशी भूमिका घेतली होती. परंतु प्रे. रिचर्ट यांनी पाकिस्तानची बाजू घेतल्यामुळे एक विश्वासू मित्र म्हणून भारताला रशियाचे सहकार्य



घेणे भाग पडले. आयर्न लेडी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या समर्थ नेतृत्वामुळे भारताने बाग्लांदेश मुक्तीचा लढा यशस्वीपणे पूर्ण केला. अमेरिकेचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात आले असता रशियाने भारताच्या पाटिशी सामरिक सामर्थ उभे केले. साम्यवादाच्या विरोधात अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या मदतीचा उपयोग त्यांनी भारत विरोधासाठी केला. या दोन दशकाच्या काळात भारत अमेरिका संबंध ताणले गेले परंतु पंतप्रधान नरसिंह राव यांनी उदार आर्थिक धोरण स्विकारले. पुढे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात भारत अमेरिका दरम्यान अन्विक सहकार्याचा करार झाला. आटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना कार्गिल युद्धांत प्रे. बिल क्विंटन यांनी भारताचे समर्थ केले दरम्यान ओसामा बी लादेन यांनी अमेरिकेवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेचे डोळे उघडले आणि त्यांना दहशतवाद विरोधात स्पष्ट भूमिका घेणे भाग पडले. प्रे. बराक ओबामा आणि ट्रंप प्रशासनाला जगातील भारताच वाढते राजकीय महत्व पाहून भारताचे समर्पण करावे लागले.

**काही सकारात्मक पैलू :** भारत व अमेरिका या दोन्ही राष्ट्रातील व्यापार 140 बिलीयन डॉलर वर पोहचला आहे. तो पुढील काळात 500 बिलीयन डॉलर पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. आरंभिच्या काळात 1960 च्या दशकात खरजपूर व कांनपूर येथे आय. आय. टी. म्हणजे भारतीय प्रोद्योतगिकी संस्था उभारण्यास अमेरिकेने सहकार्य केले हाते. आता कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्रिटीकल अभियांत्रिकी तंत्रज्ञान संशोधन तसेच अंतराळ तंत्रज्ञान संशोधनात परस्पर सहकार्याचे सामंजस्य करार संपन्न होणार आहेत. उभय राष्ट्रामध्ये व्यापार उद्योग तसेच उच्च शिक्षण, तंत्रज्ञान, पर्यटन या क्षेत्रातील महत्वकांक्षी प्रकल्पांना विशेष महत्व आहे. असे असले तरी भारत रशिया मैत्री तसेच रशियाकडून क्षेपन अस्त्राची खरेदी यामुळे अमेरिकेला समजस भूमिका घ्यावी लागेल. भारताच्या संयुक्त राष्ट्र संघातील सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्यत्वासाठी, अमेरिका भारताची बाजू घेत आहे. तसेच दहशतवाधाच्या विरोधात समान पवित्रा हा सहकार्याचा भक्कम धागा आहे. काश्मिर प्रश्नावर भारताची वस्तुनिष्ठ भूमिका अमेरिकेला समजून घ्यावी लागणार आहे. एका वळणानंतर अफगानिस्थान पश्नानावर दोन्ही राष्ट्रांना समान भूमिका घ्यावी लागणार आहे.

**सहकार्याची नवी क्षितीजे :** भारत आणि अमेरिका यांच्या संबंधातील आलेखाचा हा श्रेष्ठ बिंदू आहे. कारण थोडेसे मतभेद असले तरी अनेक प्रश्नावरील सहमती ही स्वागतार्ह बाब आहे. अमेरिकेतील जन समुदायाची वाढती शक्ती आणि तेथील उपध्याक्ष पदी कमला हॅरिस या भारतीय महिलेची निवड झाल्यामुळे भारताला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. अमेरिकेतील अनेक प्रथम श्रेणीच्या संस्थामध्ये भारतीय वंशाच्या प्रतिभाषाली व्यक्ती उच्च पदावर कार्यरत आहेत. आता भारत आणि अमेरिका एका नव्या वळणावर उभे आहेत, त्यामुळे माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ संशोधन तसेच प्रगत सामरीक उपकरणांची निर्मिती या क्षेत्रात उभय राष्टांमध्ये परस्पर सहकार्याचे नवे मजबूत पर्व उदयास येत आहे. व्यापर व उद्योगातील वाढीचा रेटा ही मोठा आहे. एन.डी.ए 1,2,व 3 सरकारच्या काळात सुधारलेल्या भारत अमेरिका संबंधातून परस्परातील विकास प्रकल्पाना गती देतांना शिक्षण, कृषी व व्यापारापेक्षा आता स्वच्छ ऊर्जा अंतराळ संशोधन, क्रिटीकल या क्षेत्रात महत्व येत आहे. द्विपक्षीय सुरक्षा सहाकार्य प्रशिक्षण व विस्तारावर भर दिला जात आहे. अमेरिकेत शिकणारी लाखो भारतीय विद्यार्थी ही एक प्रभावि शक्ती आहे. व्यूह रचनात्मक डावपेच, धोरणात्मक व लष्करी सामर्थ्यांचे आदान-प्रधान यामुळे हिंद प्रशांत क्षेत्रात चीनी कारवायांना लगाम बसणार आहे. तसेच जगभर डोके वर काढणाऱ्या दहशतवादाला नियंत्रित ठेवण्यासाठी दोन्ही राष्ट्रे मित्र म्हणून ऐतिहासिक जबाबदारी पार पाडत आहेत. भारताचे आर्थिक व राजकीय सामर्थ ब्रिटन पेक्षा वाढले आहे आणि भारत जगातील तिसरी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. भारताने करोनाशी केलेला मुकाबला जगाने पाहिला आहे त्यामुहे आरोग्य क्षेत्रात भारत अमेरिके दरम्यान नव्या सहकार्य प्रकल्पावर भर देण्यात येईल. द्रोण तंत्राचा विकास आणि कृषी आद्योगिक स्टाट्र-अप क्षेत्रातील भारताचा प्रभावि उदय यामुळे अमेरिकेला भारताचे सामर्थ नजरे आड करता येणार नाही. **समारोप :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अमेरिकलेला ही 6 वी भेट आहे. गेल्या 75 वर्षात प्रथमच अमेरिकेने भारता विषयी सकारात्मक भूमिका घेतली आहे. चीन व रशिया हे दोघे युक्रेन युद्धानंतर जवळ येत असतांना युरेशियातील सत्ता समतोलासाठी भारताचे सहकार्य घेण अमेरिकेला अपरिहार्य झाले आहे. आपल्या अलिप्त व स्वतंत्र भूमिका कायम ठेवून विकासातील भागीदार म्हणून दोन्ही राष्ट्रांना समान भूमिका घेणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे उभय राष्ट्रातील विकासाचे नवे प्रकल्प जनतेच्या आशा आकांक्षा पल्लवित करणारे ठरू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नियोजीत अमेरिका दौरा लष्करी संरक्षण क्षेत्रातील सहकार्य, आण्विक सहकार्य तसेच, आर्थिक व आद्योगिक सहकार्य यापैक्षाही सांस्कृतिक सहकार्य, प्रगत तंत्रज्ञान वैज्ञानक प्रतिभा शक्ती आधान प्रदानाचे विशेष महत्वाचे ठरणार आहे. मागील ताण-तणाव आणि संघर्षाच्या पार्श्वभूमिवर मजबूत मैत्री व उबदार सदभावनाचे एक नवे युग यामुळे अवतरणार आहे. त्यामुळे जगातील लोकशाही तसेच सामाजिक व आर्थिक न्यायाच्या क्षेत्रात एक पाऊल पुढे पडावे अशी अपेक्षा आहे.

# जनतेची बेजारी अन् शासन आपल्या दारी



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मोदी पर्वाला नऊ वर्षे पूर्ण झाल्यामूळे व २०२४ चा लोकसभा निवडणूक महासंग्राम वर्षभरावर येवून ठेपल्यामूळे केंद्रातील भाजपा सरकार आपल्या नऊ वर्षांच्या कारकर्दीचा लेखाजोखा आम जनतेच्या मनी उतरवून परत केंद्र व राज्यस्थानी आपली सत्ता यावी म्हणून सध्या भारत भ्रमणावर आहे. त्यातलाच एक भाग व सुदैवाने फोडजोड करून देवेंद्र फडणवीस सारख्या राजकारणातील चाणक्याने वर्षभरापूर्वी शिवसेनेत बंडघडवून महाराष्ट्रात भाजपाने शिंदे सेनेला घेवून मी पुन्हा येणार म्हणत सत्तेत पदार्पर्णन केले. सत्ता आल्यानंतर विविध राजकीयपक्षांच्या चढाओढीमूळे महाराष्ट्रातील जनतेवर घोषणांचा वर्षाव करत गल्लीबोळातून वेगवेगळ्या प्रकल्पांचे भूमीपूजन सोहळे संपन्न करत आहेत.**

प्रकल्प भूमिपूजनामूळे प्रत्येक आमदार, खासदारांना निधीची खिरापत खाऊ सारखी वाटप होत आहे. त्याचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातही शिंदे-फडणवीस सरकारचे भरघोस निधी वाटप चालू आहे. एका अहवाल वाचन परिक्षणावरून निर्दशनास आले की, असे प्रकल्प सिद्धीसाठी परदेशातून व राष्ट्रीयकृत बँकडून अब्जावधी रुपायांचे कर्ज काढून निधीची तरतूद करण्यात येत आहे. असे खात्रीलायक ऐकवी आहे की, केंद्र व महाराष्ट्र सरकारने मागील चाळीस वर्षांच्या काळापेक्षा कैकपटीन कर्ज घेवून तुम्हा-आम्हां सर्वास कर्जबारी केले आहे. मान्य आहे, मोठ्या प्रकल्प योजनेसाठी पैसाही भरपूर उभारावा लागतो, पण खर्च होणारा पैसा हा किती प्रमाणात प्रकल्पावर योग्यरित्या खर्च होतो की नाही, का वेळकाढूपणाचे धोरण अवलंबून प्राप्त निधी कोठेकोठे जिरविल्या जातो याची मूल्यमापन परिक्षण जनतेसमोर येणेही गरजे आहे. पण नेमके असे होताना दिसत नाही. कालाओघात जनतेलाही याचा विसर पडतो. लोकप्रतिनिधींना अशीच नामी संधी आवडते. येवढे सगळे करूनही जनता आपल्या दैनंदिन प्रश्नापासून वंचित का बरे राहते याचे तंतोतंत मूल्यमापन नेते मंडळीकडून खुलासेवार होण्या ऐवजी आपापसावर ही मंडळी चिखलफेक व कुरघोडी करण्यातच व्यस्त असते ही अतिशय लाजीरवाणी बाब आहे.

रविवार दि.२५ जून रोजी महाराष्ट्राचे विद्यमान लाकडके मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालक मंत्र्यासह मंत्रीमंडळातील त्यांचे सहकारी महाराष्ट्रासह नांदेड जिल्ह्या दौज्यावर असून "शासन आपल्या म्हणजे जनतेच्या दारी" हि संकल्पना समोर ठेवून नांदेडकरांचे अश्रू पुसणार की काय असे वाटते. शासन आपल्यादारी ही अनंददायी संकल्पना आसून बहुतांश स्तरावरील जनतेकडून त्याचे स्वागतच होईल त्यात आम्ही आहोत. यापूर्वी गेल्यावर्षी याच दिवसात मा. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यावर नांदेडकरांची म्हणजे त्यांच्या हितचिंतकांची धावती भेट घेतली होती. परत जवळपास त्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ संपत असतानाही ते नांदेडकरांना पुन्हा भेटण्यासाठी धावता



दौराच करणार की काय किंवा जनतेची बेजारी व शासन आपल्या दारी म्हणून 2024 च्या निवडणूकीची पूर्वतयारी करण्यासाठी येणार हे जाणून घेण्याचे औत्सुक्य मात्र नांदेडकरांना लागून आहे. कदाचित त्यांच्या हितचिंतकांना मी नकारार्थी बोलत असेल असा भास होणे शक्य आहे पण असे नक्किच नाही. कारण आपणास सत्तेत येवून जवळपास वर्षपूर्ण होत आहे. मागील सत्ताधाऱ्यांनी नांदेडचा सर्वांगिण विकास व मध्यमवर्गीयांसह जनसामान्यांला काय दिले व नांदेडचा कसा विकास केला हे सर्वज्ञात आहे. या प्रसंगी नांदेडकरांचे व नांदेडच्या मूलभुत विकासाचे अनेक प्रश्न जैसे थेच आहेत. त्यामूळे विद्यमान शिंदे-फडणवीस सरकारने शासन आपल्या दारी या संकल्पनेच्या माध्यमातून व प्रसंगानुरूप किमान गरजा तरी पूर्ण कराव्यात असे अपेक्षित आहे.

भूतकाळातील शासनकर्त्यांच्या विकासात्मक अभावामूळे नांदेड व नांदेडकरांची अवस्था एखाद्या पडक्या वाड्यासारखची आहे. शहर, नांदेड जिल्हा विकासाचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबीत आहेत त्याचाही वर्तमान सरकारने प्राधान्याने विचार करून अंमलबजावणी करणे गरजे आहे. उदा. विष्णुपूरी उशाला व आसना पायथ्याला असून देखील दोन्ही तरोड्यासह नांदेड महापालिकेच्या कर्तृत्वशुन्यतेमूळे बऱ्याच प्रभागात देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली नागरीकांना आठ-आठ दिवस निर्जळीचा फटका सहन करावा लागतो. कामगार कष्टकऱ्यांना पुरक रोजगार उपलब्ध करून देऊन हाताला काम मिळण्यासाठी विकासीत औद्यागिकक्षेत्र अथवा मोठे कारखाने नाहीत, होते ते थोडेबहूत कारखाने स्थानिक नेतृत्त्वाच्या विचार षंढत्व व स्वार्थिवृत्तीमूळे स्वाहा करून टाकले. त्यामूळे जिल्ह्यातील व स्थानिक बेरोजगार भूमिपुत्रांना हातला काम नसल्यामूळे नको ते धंदे करण्यासाठी इतत्र स्थलांतर करीत होऊन आपल्या गरजा भागवाव्या लागतात. हि नांदेड जिल्ह्यासह स्थानिकांची मोठी व्यथा आहे. शिक्षणक्षेत्राला स्थानिक नेत्यांच्या आशीर्वादामूळे खाजगी करणाची प्रक्रिया अवलंबीत असल्यामूळे जिल्ह्यातील राजकीय पुढाऱ्यांनी जवळपास तमाम शिक्षणक्षेत्र गिळंगकृत केले आहे. त्यामूळे सर्वसामान्य व गोरगरीबांची मुले साध्या व उच्च शिक्षणापासून वंचित आहेत. शासनातर्फे माफक दरात वैद्यकीय सोई सुविधा मिळत नसल्यामूळे खाजगी दवाखाने व डॉक्टरमंडळी सर्वसामान्य जनतेची खुलेआम लुट करून कसायाप्रमाणे कत्तली करत आहेत. कुठल्याही शासकीय कार्यालयात सामान्याला आपले काम करून घेण्यासाठी नाईलाजास्तव चिरमिरीचा किंवा खाजगी एजंटाचा मार्ग अवलंबावा लागतो. अशी भ्रष्टाचाराची किड आमजनतेला किती दिवस पोखरून खाणार हा आमचा प्राधान्याचा प्रश्न आहे. बळीराजाच्या शेतमालाला हमीभाव नसल्यामूळे आत्महत्तेचे प्रमाण वाढले आहे. मराठवाडा जनता विकास परिषदेला मागच्या तीन वर्षापासून मुदतवाढ नसल्यामूळे व शासनकर्त्याच्या वैफल्यग्रस्त विचार अवस्थेमूळे मुदत वाढीचा प्रस्ताव शासन दरबारी धूळखात पडून आहे. स्थानिक विकासाबद्दल तळमळ असणाऱ्या नेत्यांना अडसर निर्माण होत आहे. भल्यापहाटे सायकलवर वृत्तपत्र वाटप करणारे वितरक व कर्मचारी तसेच विविध मिडीयाक्षेत्रात अल्प वेतनावर काम करणारे प्रसार माध्यमातील कामगार कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू नसल्यामूळे दैनंदिन प्रपंच भागविता येत नाही. यासाठी विकास मंडळे कार्यान्वित करून या क्षेत्राला विद्यमान सरकार न्याय देईल काय ? नांदेडच्या वाढत्या लोकसंखेचा व रहादरीचा व्याप लक्षात घेता नांदेडची रहदारी केव्हा सुरळीत होणार त्यासाठी विद्यमान सरकारने शहरातील रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून उड्डणपुलासह रस्ते प्रशस्त करावेत. रेशनिंग व्यवस्था व प्रशासनातील वाढत्या भ्रष्टाचाराला आळा घालावा. नांदेड हे श्री गुरुगोविंदसिंघाची व संताची भूमी असल्यामूळे नांदेडची विमानसेवा पूर्वव्रत नियमित चालू ठेवावी अशा अनेक प्रश्नी विद्यमान महाराष्ट्र सरकारचे शासन आपल्या दारी निमित्त्याने सहर्ष स्वागत.

मित्रहो, राजकारणी कुणीही अथवा कुठल्याही पक्षाचे असोत कुणालाही जनतेच्या शाश्वत विकास व भल्याबुज्याचे कांही देणेघेणे उरले नाही. "कुणीही यावे टिकली मारूनी जावे" आणि निवडणूका आल्या की, शासन आपल्या दारी बाकी चार वर्षे जनतेची बेजारी अशीच अवस्था राज्यकर्त्यासह विरोधक व जनपुढाऱ्यांची गल्ली ते दिल्ली पर्यंत झाली आहे. म्हणून वर्तमानातील सर्वच नेतेमंडळी जनतेसोबत फसवेगिरी तर करत नाहीत ना. असे सर्वसामान्यांना वाटत आहे. एक सामान्य कार्यकर्ता पैशाच्या जोरावर मते खरेदी करून पाच वर्षात कुठल्याकुठे जातो हे चित्र आता सर्वज्ञात आहे. कुठलेही राजकारणी पुढारी असोत ते सर्वजण अशाच फसव्या संकल्पना जनतेसमोर ठेवून आपले पाय घट्ट करतात हे तुम्हा आम्हाला आता विसरून चालणार नाही. प्रामाणिक राजकारण व राज्यकर्ते ही व्याख्या आता राजकारण समाजकारणातून बाद झालेली आहे. त्यामूळेच तुम्हा-आम्हा आम जनतेला नेहमीच न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून शासन व प्रशासनकर्त्याला जाब विचारावा लागेल तो असा की, नेता जनतेसाठी की जनता नेत्यासाठी ?


महाराष्ट्राचे मा.विद्यमान मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, व उपमुख्यमंत्री आषाढी एकादशीपूर्व नांदेड भेटीवर आहेत तेव्हा हा अनाथचा नाथ "एकनाथ" नांदेडच्या शाश्वात विकासाबाबत जनतेला काय प्रसाद देणार याकडेच सर्वजण डोळेफाडून बघणार आहोत. अन्यथा "जनतेची बेजारी आणं म्हणे शासन आपल्या दारी" असे होता कामा नये ही नांदेडकरांची कळकळीचे विनंती व आपल्या भावी वाटचालीस मनपुर्वक शुभेच्छा ......

जय हिन्द । इन्कलाब जिंदाबाद । लाल सलाम

# शिक्षणाचे माध्यम कोणते असावे ?

आधुनिक केसरी

आज शिक्षणाला कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणातूनच आपल्या पाल्याचे भवितव्य घडत असते. त्यामुळे पाल्याला कोणत्या



माध्यमातून शिक्षण द्यावे असा प्रश्न पालकांसमोर उभा राहतो. मराठी, सेमी की इंग्रजी माध्यम निवडावे याविषयी मनात गोंधळ किंवा संभ्रमावस्था निर्माण होते आणि आजूबाजूची मुले जर इंग्रजी माध्यमात शिकत असतील तर निर्णय घेणे जास्तच अवघड बनते. कोणत्या माध्यमातून शिकावे हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे.कोणतेही माध्यम निवडण्यापूर्वी आपल्या पाल्याची नैसर्गिक क्षमता, बुद्धिमत्ता आणि कुवत अजमावून बघणे गरजेचे असते. पाल्य शाळेत जाण्यापूर्वी घरीदारी सतत आपल्या सोबत असतो. त्यामुळे त्याच्या आवडी निवडी, स्वभाववैशिष्ट्ये, चांगल्या बाबी अथवा कमकुवतपणा पालक म्हणून आपल्याला ज्ञात असतो. शाळा किंवा माध्यम निवडताना याचा चांगला उपयोग होऊ शकतो. आपला पाल्य कोणत्या माध्यमात चांगला शिकू शकेल हे आईवडील म्हणून पालकांना समजले तर पुढील अनेक समस्या टाळल्या जातात. शेजारचा मुलगा अमुक माध्यमात शिकतोय म्हणून आपल्या पाल्याला त्याच माध्यमात शिकविण्याचा अट्टाहास करु नये. प्रत्येक मूल हे वेगळे असतो.प्रत्येकाच्या क्षमता भिन्न असतात. त्यामुळे इतर मुलांबरोबर आपल्या पाल्याची तुलना करु नये. काळानरुप शिक्षणात नवनवीन बदल होत आहेत.जागतिकीकरणाच्या रेट्यात इंग्रजीचे महत्त्व वाढले आहे. प्रत्येक पालकाला वाटते माझा पाल्य इंग्रजी माध्यमातून शिकला पाहिजे.अशी इच्छा बाळगणे काही चुकीचे नाही. त्याचबरोबर आपल्या पाल्याची बौद्धिक क्षमता ,त्याच्या अभ्यासासाठी घरातील व परिसरातील लागणारे पूरक वातावरण पाहणे गरजेचे आहे. माध्यम कोणतेही निवडा पण आपला पाल्य, त्याच्या क्षमता याचा विचार जरुर करा. शिक्षणतज्ज्ञ व शिक्षण क्षेत्रातील जाणकारांच्या मते मातृभाषा हे शिक्षणाचे उत्तम माध्यम आहे. मातृभाषेतून शिकल्याने अनेक मूलभूत संबोध, संकल्पना व आशयज्ञान याचे आकलन लवकर होते. चर्चेतून व एकमेकांच्या सहकार्याने मुले आनंदाने शिकतात. स्वयंअध्ययन करतात. कोणतेही माध्यम चांगले अथवा वाईट नसते. आपला पाल्य त्या माध्यमात स्वतः ला कसा सिद्ध करतो यावर माध्यमाचे यश अवलंबून असते. शिक्षणासाठी माध्यम निवडताना आपल्या पाल्याची इतरांबरोबर तुलना न करता त्याला कोणत्या माध्यमात शिकवावे हे आपण विचार करुन ठरवावे. जेणेकरुन त्याची शैक्षणिक जडणघडण उत्तम होईल.

**लक्ष्मण जगताप, लेखक शिक्षक आहेत.**

# बेदखलपणाची खदखद व्यक्त करणारी कादंबरी



अरविंद भराडे


आधुनिक केसरी

**आपल्या अस्तित्वाची दखल कुणीतरी घेतली पाहिजे, हे कोणत्याही जिवंत माणसाचे स्वाभाविक लक्षण म्हटले पाहिजे. मग तो माणूस कोणत्याही जाती-धर्माचा असो. स्त्री असो की पुरुष असो. गे असो की लेसबियन असो, काळा असो गोरा असो, गरीब असो श्रीमंत असो. साक्षर असो की निरक्षर असो. आपण या जीवसृष्टीचा, या समाजाचा एक घटक आहोत याची नोंद आपल्या अवती भवती वावरणाऱ्या माणसांनी घेतली पाहिजे असे त्याला तीव्रतेने वाटत असते. त्यातही एखाद्या उच्चविद्याविभूषित, शिक्षणासारख्या ज्ञानदानाच्या पवित्र क्षेत्रात कार्यरत असलेल्या माणसाचे अस्तित्वच नाकारले जात असेल, त्याला सतत अपमानित केले जात असेल, त्याच्या स्वाभिमानाला ठेचण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत असेल तर त्या माणसाला होणाऱ्या वेदना आणि दुःख याला कोणतेही सीमा नसते.**

मुळात हे सगळे खूप अमानुषपणे, क्रूरपणे चाललेले असते. एखाद्या मानवी घटकाला ठरवून बेदखल करण्याचा इतिहास भारताला नवीन नाही. अशा प्रकारच्या बेदखलपणाचे कटकारस्थान निश्चितच समाजद्रोही, राष्ट्रद्रोही म्हटले गेले पाहिजे. काहीशा अशाच बेदखलपणाची खदखद व्यक्त करणारी एक नवी कोरी कादंबरी मराठी साहित्यविश्वात नुकतीच दाखल झाली आहे. डॉ. कोंडबा हटकर या नव्या दमाच्या साहित्यिकाची 'बेदखल' ही पहिली वहिली कादंबरी होय. साधारण पंचवीस-तीस वर्षांपूर्वी आलेल्या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळा-महाविद्यालयाच्या धोरणाचे दुष्परिणाम भोगणाऱ्या पिढीचा अंतःस्फोट व्यक्त करणारी ही कादंबरी आहे. सीएचबी तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकाची घुसमट 'बेदखल' मध्ये व्यक्त झाली आहे. ती रमेश वाघमारेची खदखद असली तरी समस्त सीएचबी, कंत्राटी प्राध्यापकांची ही प्रातिनिधिक कहानी आहे. पूर्णवेळ प्राध्यापकासाठी आवश्यक असलेली पात्रता असूनही आपल्याला सातत्याने डावलेले जातंय हे खदखद व्यक्त करणाऱ्या प्रा. रमेश वाघमारेचं अस्वस्थ मन कादंबरीभर वाचकांना खिळवून ठेवतं.

एम.ए., बी.एड्., एम.फिल., पीएच.डी., नेट, सेट होऊनही पूर्णवेळ प्राध्यापकाची नोकरी नाही. वर्षानुवर्षे सीएचबीच्या विळख्यातून सुटका नाही. मागील दोन-अडीच दशकांत प्राध्यापकांचे त्यातल्या त्यात कला शाखेतल्या सीएचबी प्राध्यापकांचे भवितव्याची धुळधाण झाली. सीएचबी ही अक्षरशः शिवी असावी इतकं अपमानास्पद, लाजिरवाणं जगणं या प्राध्यापकांच्या वाट्याला येत आहे. सीएचबी म्हणजे आजचा दिवस उद्यावर ढकलण्याची गुलामी.

सीएचबी, कंत्राटी प्राध्यापक भरती बंद करून पूर्णवेळ प्राध्यापक भरती एमपीएससी मार्फत झाली पाहिजे. डोनेशनची पद्धत गाडली जावी. हे मुद्दे जोरदार आंदोलनाच्या माध्यमातून मांडले जातात. पण आजघडीला तरी मुद्दे हे प्रत्यक्षात उतरणे स्वप्नवत वाटेल अशी परिस्थिती आहे. त्यामुळेच की काय प्रस्तुत कादंबरीतही या मुद्द्यांचा आग्रह धरला गेला असला तरी त्या मागण्या पूर्ण होतात त्या प्रा. रमेश वाघमारेच्या स्वप्नात! कादंबरी लेखन हा चिंतनशील साहित्य प्रकार होय. त्यासाठी जीवनाचं आणि भोवतालाचं उत्तम आकलन असणं खूप महत्वाचे असतं. या कादंबरीत नवखेपणाच्या काही खुणा सापडत असल्या तरी काही आश्वासक शक्तीस्थळेही आढळतात. लेखक हिंगोली जिल्ह्यातील आहेत. या परिसरातील मराठी बोली भाषेचा एक वेगळा लहेजा आहे. पण कादंबरीतील घटना प्रसंग




प्रामुख्याने औरंगाबादेतील असल्यामुळे या बोलीभाषेच्या वापराला फारसा वाव नाही. कादंबरीतील मुद्रणदोषामुळे काही ठिकाणी दोन व्यक्तीरेखांमधील संवाद वाचताना अडचण येते. कादंबरीतील वर्णनामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद शहरातील काही स्थळे जिवंत झाली आहेत. त्याचबरोबर कॅम्पसमधील विद्यार्थी संघटनांचे आंदोलन, प्राध्यापक होऊ या आशेवर जगत अनेकांच्या आयुष्याची झालेली धूळधान, जुळणारे नाजूक प्रेमबंध याचंही वर्णन आलं आहे. कादंबरीचा विषय तसा अगदीच नवीन नसला आणि यापूर्वीदेखील या विषयावर साहित्य लेखन झालेले असले तरी या विषयाची तीव्रता आणि महत्व कमी झालेले नाही हे 'बेदखल' वाचताना निश्चितपणे जाणवते, हे लेखकाचे यश म्हणावे लागेल.

**बेदखल : डॉ. कोंडबा हटकर**
**प्रकाशक : कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद**
**मुखपृष्ठ : सरदार जाधव**
**पहिली आवृत्ती १४ एप्रिल २०२३**
**पृष्ठे-१५५, मूल्य : २३५/-**

# प्रतिगामी विचारांची चिकित्सा : बा, तथागता !



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**आंबेडकरी साहित्य क्षेत्रातील एक दमदार आणि कसदार नाव म्हणजे डॉ. म. सु. पगारे हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने त्यांनी साहित्य,समीक्षा, वैचारिक,काव्य व इतर क्षेत्रातही आपल्या अभ्यासू मांडणीने स्वतःचं अस्तित्व आणि दबदबा निर्माण केला आहे. साहित्य हे मानवतेशी निगडित असायला हवे या विचाराशी बांधील राहूनच त्यांनी त्यांच्या साहित्यातून आणि वाणीतुन स्वातंत्र्य,समता,बंधुता, न्याय बुद्धीप्रामाण्य, वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्याची पेरणी अगदी तटस्थपणे,निर्भीडपणे आणि वास्तविकपणे उजागर केलेली दिसून येते. त्यांनी अनेक वृत्तपत्राच्या स्तंभ लेखनातून व विविध ग्रंथाच्या माध्यमातून पुरोगामी म्हणजेच फुले,शाहू ,आंबेडकरी विचारांची पेरणी अगदी शिस्तबद्ध पद्धतीने केली आहे.**

ही मांडणी करताना ते मात्र कधीही कचरताना, दबकताना दिसत नाहीत.समाजप्रबोधन,लोकप्रबोधन,जाणीवजागृती, सत्यता त्याचबरोबर मानवीमूल्य आणि जीवनमूल्य त्यांनी आपल्या साहित्यातून मांडले आहेत. त्याच्याशी ते कधीही प्रतारणा करताना दिसत नाहीत. आपली भूमिका ते ठामपणे मांडताना दिसतात. डॉ. म. सु. पगारे यांनी एकूण 33 ग्रंथाचे लेखन केले आहे. त्यांच्या जवळ जवळ बहुतांशी ग्रंथातून इहवाद ही संकल्पना त्यांनी मांडलेली दिसून येते.इहवाद, बुद्धीप्रामाण्यवाद, धर्मातील मानवतावाद,स्वातंत्र्य,समता,बंधुता व सामाजिक न्याय ही जीवनमूल्य त्यांनी आपल्या साहित्यातून फुलवली. आंबेडकरवादाला मनोरंजनवादी साहित्य मान्यच नाही.अगदी तीच भूमिका डॉ. म. सु. पगारे यांनी विविध ग्रंथातून मांडलेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, साहित्याने गहन जीवनार्थ सांगावा. त्याने वाचकाला अंतर्मुख करावे. आस्वादकाच्या मनाच्या कक्षा विस्तृत कराव्यात. माणुसकीला अधिक डोळस, अधिक समंजस आणि अधिक परिवर्तनदर्शी करावे. माणसाचे मन उन्नत करणारे साहित्य असावे. नवजीवन निर्माण करण्याची शक्ती साहित्यात आहे. अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी डॉक्टर्स, इंजिनीअर्स यांच्यापेक्षाही साहित्यिकांची मोठी गरज आहे असे म्हटले आहे. अगदी त्याच न्याय भूमिकेतून डॉ.म.सु. पगारे यांचे साहित्य आपणाला वाचावयास मिळते. त्या साहित्यातून माणूस बदलायला हवा असेही दिसते. माणसाने जुने टाकून देऊन नवीन जीवनमूल्य स्वीकारायला हवीत असेच त्यांच्या साहित्यात वाटायला लागते. त्यांच्या साहित्यात कधी रंजनवाद किंवा निराशावाद दिसत नाही. माणसाची झोप उडवणे, तंद्री लागणे, विचारशक्ती जागी होणे हा साहित्याचा हेतू डॉ.म.सु. पगारे आपल्या साहित्यातून विस्तृत करताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 साली नागपूर या ठिकाणी लाखो अनुयायासोबत बौद्ध धम्म स्वीकारला आहे. जगातील सर्वात महान आणि प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणजे तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध हे होय. जगभरात बुद्धांचे कोटीवर अनुयायी आहेत. बुद्धपूर्व काळातील परिस्थिती ही चातुर्वर्ण्यव्यवस्था असणारी होती. त्यावेळी ब्राह्मणी वर्चस्वाचा पगडा फार मोठ्या प्रमाणावर होता. त्यांनीच समाजात अनेक विविध व्रतवैकल्ये पाडलेली दिसून येतात.जप,तप, अंधश्रद्धा, कर्मकांड, दैववाद, स्पृश्य अस्पृश्य अशी भेदाभेदही त्यांनीच निर्माण केली होती. त्यामुळेच माणूस गुलाम बनला होता. अशा अनेक दुःखाच्या, संकटाच्या,अमानवतेच्या खाईतून माणसाला बाहेर काढण्याचे कार्य तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाने केले आहे. बुद्धाने कधी चातुर्वर्ण्यव्यवस्था मानली नाही. वेद मानले नाही. ब्राह्मणी वर्चस्वाचा पगडा कधी मानला नाही. आत्मा मानला नाही. अध्यात्म मानले नाही. बुद्धाने मानवी जीवनाची नवी मांडणी केली. मानवी जीवन दुःखमुक्त कसे होईल हे पाहिले. म्हणून बुद्धाचा मार्ग म्हणजे मानवी कल्याणाचा मार्ग आहे असे म्हटले जाऊ लागले. बुद्ध तत्त्वज्ञानात सर्वश्रेष्ठ स्थान समतेला, नितीला,विज्ञाननिष्ठेला, माणसाला आहे. अशा या बुद्धाच्या विचारावर आधारित असणाऱ्या बौद्ध साहित्याला हजारो वर्षाची परंपरा आहे. याच धरतीवर डॉ.म.सु. पगारे यांनी' बा,तथागता!' या खंडकाव्याची निर्मिती केलेली दिसून येते. खंडकाव्यात त्यांनी बुद्धाचा विचार मांडला आहे. तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा मुख्य केंद्रबिंदू 'माणूस' मानलेला आहे. बुद्धाच्या चिंतनाचा आणि निर्मितीचा एकमेव विषयही 'माणूस' हाच आहे. हाच बुद्धाचा विचार मनी बाळगून डॉ. पगारे यांनी' बा, तथागता!'या खंडकाव्याची निर्मिती केलेली दिसून येते. ते आपली भूमिका विशद करताना म्हणतात की, "तीन आविष्करणे असलेल्या या विशाल महाकाव्याचा अनुबंध माणूस,मानवता,संस्कार, संस्कृती अशा विषय घटकांच्या अनुषंगाने आहे. माणूस म्हणजे निव्वळ बाह्यांगाने 'माणूस' नव्हे, शरीराच्या विविध अवयवांचा समुच्चय म्हणजे 'माणूस' नव्हे, तर मानवाचे अस्तित्व त्याच्या बुद्धीवादावरती,बुद्धीप्रामाण्यवादावरती आणि विवेकावर अधिष्ठित असावे. त्यामध्ये कल्पनेचा आणि पर्यायाने कर्मकांडांचा अंश मात्र संबंध नसावा. माणसांचा मेंदू आणि त्यातील विचार हा कोणत्याही कल्पना, दैवभाव, पंथ,धर्मांधता,जातीय गुलामगिरी, विषमता,लिंग व प्रदेश विषमता या आधाराने कार्यप्रवण नसावा, कारण ही सर्वच भेदस्थाने माणसाला गुलाम करणारी ठरली आहेत. डॉ.म.सु. पगारे यांनी 'बा, तथागता!'हे खंडकाव्य 234 पानात लिहिले आहे. या खंडकाव्याला दिलेला शीर्षकही अत्यंत समर्पक असाच आहे.'तथागत'हा शब्द पाली भाषेतला आहे. तसा तो संस्कृत भाषेतही दिसतो. 'तथागत' म्हणजे जसा आहे तसा,वास्तव स्वीकारणारा, कल्पना रम्यापासून दूर असणारा, जे खरे आहे तो स्वीकारणारा, सत्य शोधणारा, सत्य स्वीकारणारा. बुद्ध अगदी त्याप्रमाणेच होते. जसे बोलत तसे आचरणही करत असत. ईश्वर, रूढी, परंपरा, कर्मकांड व अंधश्रद्धा हे सर्व नाकारणारा म्हणजे 'तथागत 'होय. म्हणून हे शीर्षक अगदी बोलके आहे.




डॉ. म.सु. पगारे यांच्या 'बा, तथागता!'या खंडकाव्यात तीन आविष्कारणे लिहिली आहेत. या तीन आविष्करणातच खंड काव्याची विभागणी केली आहे. यामधूनच कवींनी आपली भूमिका मांडलेली दिसते. ते आपल्या या तीन आविष्करणाच्या संदर्भात म्हणतात की,"बुद्धिवादी व विवेकनिष्ठ असणाऱ्या मानवाने आपला प्रवास'सम्यक मार्गाने'निश्चयपूर्वक परिश्रमाने केल्यास त्याचे अंतरंग, त्याचे मन आणि त्याची बुद्धी ही माणसाची आहे, असा निर्देश करता येईल. अशा माणसांचा प्रवास काम, द्वेष, आसक्ती व मोह अशा विकारांना टाळून निग्रह पूर्वक जर होऊ लागला तर माणसाचे अस्तित्व 'मानवतावाद' निर्माण करण्याची क्रांती करते आहे असे निश्चित म्हणता येईल. भौतिक सुखोपभोगामध्ये अडकून हिंसा, मारामाऱ्या, खून, व्याभिचार, भ्रष्टाचार अशा विचारांचा माजलेला हैदोस म्हणजे माणसांच्या मनात भ्रमिष्टपणाचा बोकाळलेला गोंधळ होईल. हा भ्रमिष्टपणाचा गोंधळ धर्मांधतेने, जातीयतेने, विषमतेने आणि वैचारिक गुलामगिरीने बोकाळलेला असतो. असे हजारो वर्षाच्या इतिहासाने पदोपदी सिद्ध केलेले आहे. त्यामुळे या संपूर्ण विश्वात संस्कार पूर्ण माणूस शोधताना आणि मानवतावादी समूहाचा माणूस उभा करताना त्याच्या विचार चिंतनात कोणकोणते प्रश्न असतील ? मानवतेच्या जिज्ञासेकडे प्रवास करणारा त्याचा मार्ग कसा असेल ? माणूस बनण्याचे त्याचे पूर्वसूत्र किंबहुना पूर्वरूप कसे असावे असे बुद्धिवादातील चिंतन मानवाचे स्वतःचे असू शकते. एकंदरीत 'माणसाचे प्रतिबिंब' या विशाल महाकाव्याच्या पहिल्या आविष्करणामध्ये दृश्यमान होते. माणसाच्या संस्कारित होण्याचे केंद्रवर्ती सूत्र घेऊन खऱ्या अर्थाने अस्सल संस्कृतीचे संवर्धन कसे होईल ? या प्रश्नाच्या उत्तरात'बुद्धिस्ट फिलॉसॉफी'ही सर्वार्थाने प्रभावी ठरणारी शिकवण असल्याचे लक्षात येते.'बा, तथागता!'या विशाल महाकाव्याच्या दुसऱ्या आविष्करणामध्ये माणसाला बुद्धीवादी, विवेकनिष्ठ, निर्मळ मनाचा सुखप्राप्ति करणारा'निब्बाण'पदाला पोहोचणारा माणूस कसा निर्माण होऊ शकतो, यासंदर्भात या महाकाव्यातील दुसरे आविष्कारण हे महत्त्वाचे ठरते. तृतीय आविष्करणात कवीची असणारी संवेदनशीलता, चौफेर असणारी निरीक्षण शक्ती, माणूस आणि मानवताविषयीचे चिंतन या संदर्भाची मांडणी केली आहे. माणूस हा सर्वात बुद्धिमान प्राणी आहे. हुशार आहे पण त्याला देव, धर्म, आत्मा, कर्मकांड, रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धा अशा अनेक काल्पनिक गोष्टीत अडकून टाकले आहे. त्यामुळे तो सामर्थ्यशाली असूनही काहीच करू शकत नाही असा हा माणुस कमकुवत झाला आहे. या कर्मकांडाच्या भीतीने तो स्वतःचे अस्तित्व गमावून बसला आहे. बुद्धी, मेंदू असूनही तो गुलाम झालेला दिसतो आहे. हेच चित्र आजही आपल्या देशामध्ये फार मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. सुशिक्षित, नोकरदार वर्गात मोठ्या प्रमाणावर हे चित्र आपण आज पाहतो आहोत. ऑफिसमध्ये, कार्यालयात, घरात, दारात, रस्त्यावर, गाडीत, गळ्यात सगळीकडे दैववाद दिसतो आहे. ही काल्पनिकता माणसाच्या अंगी प्रचंड मोठ्या प्रमाणावर शिरली आहे. त्याचे भय माणसाच्या मनात निर्माण झाले आहे. म्हणूनच माणूस गुलाम बनत चालला आहे. सत्यापासून दूर जात आहे. माणसापासून लांब चालला आहे. सत्याला स्वीकारण्याऐवजी काल्पनिक गोष्टींना मानत चालला आहे. हे बुद्धांना नको होते. त्यामुळे बुद्धाने मानवी जीवनाची नवी मांडणी केली आहे. माणसाला ईश्वर, धर्म, कर्मकांड यापासून भयमुक्त करण्याचा प्रयत्नही बुद्धांनी केला आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था नाकारून माणसाला भयमुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. **क्रमश :**

# शाश्वत शेती काळाची गरज



डॉ. विलास इप्पर
संपर्क क्र. : 9322185214

आधुनिक केसरी

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. नैसर्गिक वातावरण, शुध्द हवा, डोंगर दऱ्या, गुरे वासरे, हिरवी रांन वृक्ष, असे विविध देखणी नयनरम्य दृष, अशा विविध गुणांनी नटलेल्या कृषी परिसराचे वातावरण मन प्रसन्न करून टाकते. पण वास्तवात मात्र या व्यवसायात राबणारा शेतकरी आणि शेतमजूर मात्र विविध कारणाने हैराण आहे. शेतकरी विविध प्रश्नांना कित्येक वर्षापासून सामोरे जात आहे आणि जन्मजात समस्यांचा सामना करत आहे. महात्मा फुले यांनी "शेतकऱ्याचा आसूड" या पुस्तकात शेतकऱ्यांचा विविध प्रकारच्या समस्यांचे तत्कालीन परिस्थितीचे जे वर्णन केले होते ते आजही लागू पडते.**

तथापि या परिस्थितीवर मात करण्यासाठी शास्वत शेती, हा कृषि व्यवसायात व्यवस्थापकीय कौशल्य आत्मसात करून हा व्यवसाय करावाच लागेल. त्याचाच भाग म्हणून शास्वत शेती म्हणजेच "Sustainable Agriculture" ही संकल्पना काही दिवसापूर्वी प्रकाशझोतात आली. शासनाने या संकल्पनेला विशेष महत्व देऊन शेतकऱ्यांचे आणि शेतीच्या शाश्वत विकासासाठी प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट ठेवले. पण त्याला हवे तेवढे यश आले नाही. तथापि शेतीचां शाश्वत विकास का महत्वाचा आहे ? याचा अभ्यास या लेखात करण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

अभ्यासासाठी काही गृहितके

1 ) शेतीमालाची विक्री करण्यासाठी हक्काची आणि दराची हमी असणारी बाजारपेठ उपलब्ध नाही.

2 ) शेतीवरील खर्च आणि मिळणारे अस्थिर उत्पन्न यामुळे अनेक शेतकऱ्यांना आणखीच कर्जबाजारी व्हावे लागत आहे. 3 ) शेतीवरील सतत वाढता खर्च हे शेती व्यवसायातील घटत्या उत्पन्नाचे मुख्य कारण आहे. 4 ) शेती व्यवसायातील मजुरांचा प्रश्न, आणि यांत्रिकीकरण यामुळे शेती व्यवसाय तोट्यात जात आहे. 5 ) शेतकऱ्यांचा वाढता कर्जबाजारीपणा ही चिंतेची व विचार करण्याची बाब आहे. **संशोधनाची उद्दिष्ट्ये** 1 ) कृषी व्यवसाय आणि या व्यवसाय संबंधित प्रश्नांचा अभ्यास करणे. 2 ) कृषी क्षेत्रातील समस्यावर उपाय योजनाचां अभ्यास करणे. 3 ) कृषी व्यवसायाला पूरक आणि आधार देणाऱ्या व्यवसाय शोधणे. 4 ) कृषी क्षेत्रातील आधारभूत सोई सुविधाचां अभ्यास करणे, 5 ) कृषी संबंधित शासनाच्या योजनांचा अभ्यास करणे, ई संशोधन प्रश्न

१ ) शेतीमालाची विक्री करण्यासाठी हक्काची आणि दराची हमी असणारी बाजारपेठ उपलब्ध आहे का ?

२ ) शेतीवरील खर्च आणि मिळणारे अस्थिर उत्पन्न यामुळे शेतकऱ्यांचे कर्ज वाढत आहे का ?.

भारतातील कृषी व्यवसाय : भारत हा शेतीप्रधान असून 69 टक्के लोक आजही ग्रामीण भागात वास्तव्य करतात, तर 60 टक्के रोजगार हा कृषी तथा कृषीवर आधारित विविध व्यवसायात उपलब्ध होतात. भारताचे उद्योगिक क्षेत्र सुद्धा आपल्या कच्च्या मालासाठी कृषी मालावर आधारित आहे, असे उद्योगीक क्षेत्र हे कृषी मालावर प्रक्रिया करते. थोडक्यात कृषी व्यवसाय हा अत्यंत महत्वाचा व्यवसाय आहे. त्यामुळेच म्हटले जाते की "भारत हा कृषी प्रधान देश आहे". आपला देश, कृषी उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. वर म्हटल्या प्रमाणे प्रामुख्याने ६० टक्क्यांपेक्षा जास्त ग्रामीण कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत. रोजगाराच्या बाजूने विचार केला असता, देशातील एकूण रोजगारांमध्ये 60 टक्क्यांपेक्षा जास्त रोजगार कृषी व्यवसाय आणि कृषी संलग्न प्रक्रिया उद्योगातून येतो. त्यामुळे अजूनही कृषिक्षेत्र हेच बहुतांश कुटुंबाच्या उपजीविकेचा सर्वांत मोठा स्रोत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि जीवनशैलीसाठी शेतकऱ्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र असे असले तरीही हाच शेतकरी घटक गेल्या तीन दशकांपासून बदलते हवामान, दुष्काळ परिस्थिती, अतिवृष्टी, शेतीमाल विक्रीप्रश्न तथा बाजारपेठ समस्या, व्यापाऱ्याचे दलालाचे जाळे, रासायनिक खते-बियाणे आणि शेती अवजारे यांच्या भरमसाट वाढलेल्या किंमती. अशा अनेक समस्यांनी शेतकरी कचाट्यात सापडलेला आहे. परिणामी बहुतांश शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, अत्यंत गरिबीची परीस्थिती. अशा अनेक कारणाने त्यांच्या जीवनाचा दर्जा खालावलेला दिसून येतो. शिवाय दोन वर्षांपूर्वी आलेल्या जागतिक कोरोना महामारीने



शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांमध्ये भर पडलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्रोतांमध्ये मोठी घसरण झालेली दिसून येते. परिणामी, अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत. तथापि महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ तर कायम शेतकऱ्यांच्या आत्महत्या ग्रस्त भाग म्हटला जातो. उदा. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये, १९ जुलै २०२२ रोजी विरोधी पक्षनेत्यांनी गेल्या ४५ दिवसांमध्ये १३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती दिली. अर्थात, दररोज तीन पेक्षा जास्त शेतकऱ्यांची आत्महत्या होत असल्याचे दिसून येते. २०१६ च्या 'एनएसएसओ'च्या ( NSSO ) अहवालानुसार, भारतीय शेतकऱ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे ७७,११२ रुपये आहे. यामध्ये शेतकरी कुटुंबाच्या मिळणाऱ्या कौटुंबिक उत्पन्नापैकी फक्त ५० टक्के किंवा त्याहून कमी उत्पन्न हे शेतीतून येते. त्यामुळे शेतकरी कुटुंबाला जगण्यासाठी शेतीशिवाय उत्पन्नाचे इतरही दुय्यम स्रोत वापरावे किंवा शोधावे लागत आहेत. उदा. शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न घसरले असल्याने, उपजीविकेसाठी अनेक कुटुंबाला छोटे-छोटे व्यावसायिक कामे, सेवा क्षेत्रातील कामे, बिगारी रोजंदारीवरचे कामे- उद्योग, वाहनांचे ड्रायव्हर, सुरक्षारक्षक, फेरीवाले, छोटे दुकानदार, दुग्ध व्यवसाय, पशुपालन इत्यादी स्वरूपातील, मिळेल ती कामे करावी लागतात. मात्र कोरोना लॉकडाउनने अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पन्नाचा दुसरा स्रोत गमावला आहे. त्यामुळे आधीच्या ताणलेल्या परिस्थितीत पुन्हा भर पडलेली दिसून येते. शेतीतील गुंतवणुकीचा वाढलेला खर्च आणि शेतीमालाला मिळणारा कमी मोबदला. यामुळे अनेक शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. ग्रामीण भागातील उपजीविकेचे साधन असलेली शेती वाचविण्यासाठी आणि उपजीविका भागवण्यासाठी बहुतांश शेतकरी विविध बँका, सोसायटी, खाजगी सावकार, मायक्रो फायनान्स कंपनी यांच्याकडून कर्ज मिळवण्याचा प्रयत्न करतात. मात्र शेतकऱ्यांना अनेकदा शासकीय कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था कर्जपुरवठा करण्यास टाळतात. त्यामुळे अलीकडे ग्रामीण भागात मायक्रो फायनान्स कंपन्या ( खासगी सावकारी संस्था ) कर्ज देण्यासाठी पुढे आल्या आहेत. या विविध संस्थांकडून कर्ज घेऊन, जर शेतीमालाच्या मिळणाऱ्या परताव्यातून घेतलेले कर्ज फेडता आले नाही, तर कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याची उदाहरणे गावोगाव दिसून येतात. राहायला चांगले घर नाही. अंगात घालायला चांगली कपडे नाहीत. आरोग्यावर फारसा खर्च करू शकत नाही. कर्जबाजारीपणाचा कलंक कुटुंबावर लागलेलाच आहे. मुलांना चांगले शिक्षण देऊ शकत नाही. आयुष्यात प्रत्येक दिवशी कष्ट-श्रम केले तरीही पोटाला पोटभर मिळत नाही. राहणीमान-जीवनशैली सुधारू शकत नाही, अशा बऱ्याच अडचणी या शेतकऱ्यांच्या बाबतीत सांगता येतील. उद्याचा दिवस कसा जाईल या चिंतेने झोप येत नाही. अशा निराशाजनक परिस्थितीत बहुतांश शेतकरी वर्ग अडकलेला आहे. या परिस्थितीतून सुटका करून घेण्याच्या मानसिकतेत शेतकरी वर्ग आहे. **क्रमश :**

## संतांचे माहेर



सावळ्या हरीचे ।
गोजीरे ते रूप ।
आवडे हो खूप ।
जीवा माझ्या ।।१।।

भाळावरी शोभे।
गंध चंदनाचा ।
सुगंध तयाचा ।
दरवळे ।।२।।

संतांचे माहेर ।
तुझी रे पंढरी ।
सावळा श्रीहरी ।
वाट पाही ।।३।।

माय रखुमाई ।
अर्धांगिनी शोभे ।
विटेवरी उभे ।
पांडुरंग ।।४।।

आषाढी कार्तिकी ।
वैष्णवांचा मेळा ।
वारकरी गोळा। पंढरीत ।।५।।

सौ.शारदा श्रीकृष्ण
वानखेडे-चोपडे,
परभणी ९८२३०६६६०६

## विठू तुझ्या वाटेवरी



वैष्णवांचा मेळा! कीर्तनात दंग!
तुझा करी संग ! वारकरी!!१!!

मनीची वेदना! कुठेच सोडली!
वाट तुडवली! भेटीसाठी!!२!!

प्रकृती कोपली!भुई ती रापली!
तूच दुःख हारी !विठुराया !!३!!

पाऊल पडता! मुखी तुझे नाम!
अमूल्य ते दाम ! अंतरात!!४!!

चंद्रभागा तिरी! आनंद सोहळा
वारकरी गोळा! झाले सारे!!५!!

टाळांचा गजर! तू पुढे हजर
पावन झाले! भक्तगण!!६!!

जीव पुढे ठेवी!मार्ग तूच दावी!
तरुन जावावी! वाट सारी!!७!!

रंजना सानप
मायणी(सातारा)
मो.-९०४९५४८३२३

## गेली...

विसरुन गेली
लागलेली तहान गेली

सूर्य मावळला
सावली पुढे गेली

निर्माल्य घेऊन
नदी सागरात गेली

काळजी लेकीची
जरी सासरी गेली

शपथ उरली
आई दूर गेली

डोळ्यातली स्वप्नं
डोळयात विरून गेली

विझलेली वात
दिव्यात राहून गेली
बलराज संघई
9420015108

## घर

घर आंगण पूजिता..
प्रसन्न होईल मन !
तिथेच शांती नांदेल !
संचयीले हेची धन !

शांत चित्ती मना माझ्या
तिथे लक्ष्मी विराजती ..
पुजूनिया उंबरठा..
संरक्षण ते करीती!

नामस्मरण करूनी..
मिळे अध्यात्मिक बळ
होई जीवन सुकर..
मिटे कुकर्मांचा छळ !

घर बांधीले हौसेने..
नसाव्या नुसत्या भिंती
प्रेम असावे घरात..
जुळेल सुंदर नाती

घंटानाद करूनिया..
करूया स्तोत्र पठण !
धूपदिप लावूनिया..
मन होते रे प्रसन्न..

काम करूनिया मना
लागे ओढ त्या घराची !
मग पाऊले वळती..
घरच्या कारभाऱ्याची
- सौ.भाग्यश्री गोविंदप्रसाद
दायमा, जयसिंगपूर

## आषाढी यात्रा..!

विठोबाला भेटण्यास
दिंडीतून भक्त निघे,
पायी-पायी चालतांना
वारकऱ्यांचे पाय सुजे.
वारीत पायी चालणे
ही वारकऱ्यांची रीत,
आषाढीच्या महिन्यात
यात्रा भरे पंढरीत.
भक्तांच्या मुखात असे
पांडूरंग - पांडूरंग,
भक्ती करण्यासाठी ते
होई किर्तनात दंग.
चंद्रभागेमध्ये स्नान
करून पवित्र होई,
बा-विठ्ठलाच्या चरणी
जाऊन दर्शन घेई.
पांडूरंगाच्या भेटीने
भक्त समाधानी होती,
प्रसन्न मनाने, सारे
आपापल्या गावी जाती...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## स्वप्नंप्रेम

प्रवासात जिवनाच्या
स्वप्नं असंख्य पहावे
स्वप्नांच्या ह्या नगरीत
चला या जाऊन यावे

बालपणीचे क्षण ते
आठवावे का नव्याने
हौस मौज सारीच ती
करू आता आनंदने

स्वप्नांना पाहता सारे
स्वप्नं ही साकार व्हावी
जाणीववास्तव्याचीही
स्वप्नांत सुद्धा रहावी

अथांग सार्‍यां स्वप्नांना
बंधननाही कुणाचे
मन हे स्थिर असता
मार्गही दिसे यशाचे

खेळ हे मनाचे सारे
क्षण दुःख आनंदाचे
आयुष्य जगावे सदा
अस्तित्वांतुनी स्वप्नांचे

- तुषार राजेश लाखे .
वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

## घरटं



एक अनंत काळाची वेदना
असते नेहमी तिच्या उरात घर
करून
माझी पाखरं खरंच
घरटं सोडून
जातील का उडून ?

आठवते तिला जेव्हा पाखरांच घर
घरट्यातून न परतण्यासाठी
उडालेली चिमणीची पिल्लं
आणि आक्रोश करत शोधणारी
त्यांची आई

आपलंही असंच होईल का ?
ती बेचैन होते
तिच्या भोवती असलेले
मुलांच जग आठवून

तिच उबदार सजवलेलं घर
अन त्यांच्यात रमलेली ती
सगळा जन्म तिचा असाच
लेकरांच्या काळजी चिंतानी
ग्रासलेला

शिकस्त करते ती त्यांना
बंदिस्त करण्याची घर बांधून,
दार सजवून,अंगणात रांगोळ्या
काढून
घराला कुंपण घालून पण...

एक दिवस बंधने तोडून
सगळेच जातात उडून दूर
पाखरांच्या थव्यासारखे
आपलं घरटं सोडून

आणि एकाकी मनाने
ती वाट पाहत असते
पाखरं पुन्हा घरट्यात येण्याची
तीच घरटं फुलण्याची

प्रा. डॉ. संगीता दोंदे
मिलिंद कला महाविद्यालय,
औरंगाबाद

## पूर आसवांचा



जेंव्हा पूर येतो आसवांना
स्वप्नं, इच्छा, वाहुन जातात
काळजात भाव दाटतांना
कृर घनघाती घाव बसतात.. !!

तेंव्हा घायाळ त्या मनाला
शब्दांच्या इंगळ्यां डसतांत
सावरताना स्वतःच स्वतःला
हात तिथे अपुरे पडतात.. !!

विचारही इथे सारे गोठून
आतल्या आत मिटून जातात
भले भले भावनाचें डोंगर
पुरात ह्या विरून जातात.. !!

मी मात्र आज एकटीच इथे
ठाम खंबीरपणे उभी आहे
आसवांच्या ह्या लाटां सवे
झुंज माझी सुरू आहे.. !!
©® हेमः ज्योती, लातूर.

## राजर्षी शाहू महाराज

राजर्षी शाहू महाराज
महाराष्ट्राची खरी शान
तुमच्या अफाट कार्याचा
सर्व भारतीयांना अभिमान

दीनदलीतांना आपलेसे करूनी
छाया दिली ममतेची
जातीभेद नष्ट करुनी
शिकवण दिली समतेची

होते तुम्ही कलेचे आश्रयदाते
पाठीराखे शेतकऱ्यांचे
विद्वानांचे होते चाहते
कैवारी गोरगरीबांचे

अंधश्रद्धा व कर्मकांडांचा
केला तुम्ही नायनाट
दीनदुबळ्यांना आरक्षण देवूनी
दाखविली शिक्षणाची वाट

सक्तीचे आणि मोफत
दिले सर्वांना शिक्षण
प्रबोधनाचा वसा घेवूनी
केले लोककलेचे रक्षण

आयुष्यभर लोककल्याणाचा
घेतला होता तुम्ही वसा
जगभर तुमच्या कार्याचा
मनोमनी उमटला ठसा

रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## आस

ओली चिंब वाट जशी पाझर तो
माठ वळणा वळणावरती जसे
दिसतात घाट
आयुष्य दगदगते भेगाळल्या
भुईगत कोंडमारा जगण्याचा
जसा पस्तावा जन्माचा
आयुष्य एवढं रेटत चाललं
स्वतःचं जगणं विसरत चाललं
नभातला पक्षी जणू पिंजऱ्यात
कोंडला वाहत्या नदीला आडवा
जणू बांध बांधला
ओली चिंब वाट जशी
पाझर तो माठ
वळणा वळणावरती जसे
दिसतात घाट
स्वप्नरंगी होऊन भिजवते आशा
अंधार ही पाही आता
प्रकाशाची वाट
- लक्ष्मण वाल्डे-कन्नड

## मैत्री

शाळेत पाठीमागच्या बाकावर बसून दोस्ताच्या
सोबतीने केलेली खोडी म्हणजे मैत्री
अभ्यास पूर्ण असूनही जिगरी मित्रासोबत
शिक्षा म्हणून खाल्लेली छडी म्हणजे मैत्री
शाळा बुडवून, माळरान तुडवून
पोटभर खाल्लेला रानमेवा म्हणजे मैत्री
पोहता येत नसतांनाही मित्राच्या विश्वासावर
नदीच्या पाण्यात मारलेली उडी म्हणजे मैत्री
पायाला भिंगरी लावून रात्रभर केलेली
गावच्या जत्रेची सफर म्हणजे मैत्री
एका तिकिटात दोघांनी मिळून
पाहिलेला चित्रपट म्हणजे मैत्री
एकाकडे पैसे नसल्याने दुसऱ्याने भरलेली
शाळेच्या सहलीची फिस म्हणजे मैत्री
अनंत आठवणींनी तुडूंब
भरलेली नाव म्हणजे मैत्री
मनाच्या कोपऱ्यात कायमसाठी
गजबजलेलं हळव गांव म्हणजे मैत्री
मैत्री शब्द ऐकू येताच अलगदपणे
डोळ्यात आलेलं पाणी म्हणजे मैत्री
प्रवीण दाभाडे पाटील,कन्नड
ता.कन्नड जि.औरंगाबाद
मो.क्र-9403011083

## नको तुझे मज काही

नको तुझे धन, दौलत, नको तुझे हिरे सोनं
तूच नारायण देवा करितो तुजला मी वंदन
काय मागू देवा तुजला दिलेस मला सारं
घोर नाही या जीवाला,तूच आहेत माझा आधार
तुझेच देणे, घेणे मी तुलाच वाहते रे
सारं काही तुजला कळते रे
आषाढीची वारी नाही माझ्या नशिबात
तरीही आहे रे मी घरी सुखात
धाव घेशील रंजल्या, गांजल्यांसाठी
हेच खूप काही आहे माझ्यासाठी
जीवन जगणे कळले रे मजला
जाणार नाही मी भलत्याच वाटेला
स्वतः वर विश्वास, मुखी ठेवते तुझे नाम
अडलेले करतेस रे माझे तू काम
नाही मी तेवढी रे मोठी भक्तीवान
करिते तुझी क्षणोक्षणी आठवण
देवा आता खूप जगल्यासारखे वाटते रे
हाक देईन शेवटी तवा धावून येशील रे
संगीता रडली, हसली अन् जगली
पण विठ्ठला तुला कधी नाही विसरली
सौ. संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा, जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## अजूनही मी



अजूनही मी तिथेच बालपणीच्या
गोड आठवणीत शेतशिवारातल्या काळ्या मातीत
की ज्या मातीने माझ्या पिढ्यांपिढ्यांचे पोट
भरवून जीवन जगणे शिकवले.
पण इथं व्यवस्थेने माझे गगनभरारी
घेणारे पंख छाटून आकाशाला गवसणी घालणाऱ्या
स्वप्नांची राखरांगोळी करूनही
चेहऱ्यावरची रांगोळी विस्कटू न देता
वास्तवाशी दोन हात करून जगतोय
हसत हसत. पण आयुष्याच्या भर दुपारी
डोईवर ऊन तापून अनवाणी पावलांच्या नशीबी
काटेकुटयांशी लढण्याबरोबर
चिखलगाळ तुडवणे आले अन् समजलो फुल गुलाबी
ते ही शेवटी काटेच निघाले आत आत रुतणारे वर वर
हसणारे हे पाहून खरंच मनाला हजार इंगल्या डसत आहे
पण असे कितीक वादळवारे,उनपाऊस
अन् काटेकुटे आले हरवण्या तरी
मी घट्ट उभा आहे पाय रोवून मातीत
कारण मी मातीतला माणूस आहे..
ज्ञानेश्वर गायके, कन्नड
मो..९४०३३८४८८९

# विरोधी पक्ष बैठकीत आंबेडकरवादी नेत्यांचे स्थान ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्याची देशातील एकुणच परिस्थिती पाहता संविधान, संविधानीक हक्क अधिकार धोक्यात असल्याचे स्पष्ट दिसते. सरकारकडे न्यायीक व निरपेक्ष भुमिका नसुन केवळ खुर्ची आणि सत्ता टिकवण्यासाठी देशातील वातावरण दुषीत केले जात आहे. कशाचाच कशाशी थोडाही संबध नसताना सरकार व सत्ताधारी राजकीय नेते संबंध जोडून सामाजिक तेढ निर्माण करत आहेत. इतिहासातील चुकिचे दाखले देऊन किंवा चुकिचा अर्थ काढून त्याचा संबंध धर्माशी जोडून धर्म धोक्यात असल्याचे भासवून जनतेलाच व देशाला धोक्यात टाकत आहे. हल्ली यांनी एवढे दहशतीचे वातावरण निर्माण केले की सत्ताधारी सांगतील तेच सत्य व अंतिम त्यांच्या विरोधात कोणतेही सत्य, पुरावा वा तर्क काम करत नाही.**

सत्ताधारी सांगतील तेच मान्य केले तर तो व्यक्ती देशभक्त आणि सरकार व सत्ताधारी ध्येय धोरण व कृती विरोधात बोलले तर तो देशद्रोही हेच समिकरण तयार झाले. सत्तेची पोळी भाजून विषमता निर्माण करणारे लोक नेहमीच धर्माला ढाल बनवून लोकांच्या हक्क,अधिकार, नोकरी, शिक्षण, आरक्षण, आरोग्य इत्यादी मुलभूत बाबीवर वार करत आहेत. हिंदु मुस्लिम वाद हा तर सत्ताधारी नेत्यांचा आपुलकी चा विषय. कोणत्याही विषयात मुस्लिम शोधायचा आणि वादंग करायचे. कोणालाही येथे दोषी ठरवतात दोनच गोष्टी बघितल्या जातात एक तर विरोधी पक्षाचा आहे का ? आणि दुसरी गोष्ट तो मुस्लिम आहे का ? विरोधी पक्षातील असेल आणि मुस्लिम असेल तर त्यांच्या सोबत वेगळे वर्तन आणि सत्तेशी संबधीत असेल तर वेगळे वर्तन अशी भुमीका सत्ताधारी घेऊन राजकीय हुकुमशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वायत्त संस्थाचा व मिडीयाचा स्वतः च्या हितासाठी वापर करून निव्वळ द्वेषात्मक बाबी केल्या जात आहेत.

ईडीच्या धाडी केवळ विरोधीपक्षातील नेत्यांच्या घरावर पडतात. विरोधी पक्षाच्या घरावर धाडी पडू नाही असे मुळीच नाही परंतु सत्ताधारी लोकच प्रामाणिक हा कुठला नियम ? सत्ताधारी नेत्यांच्या घरावर का ईडी जात नाही ? मिडीयाने सरकार ला प्रश्न विचारायला पाहिजे परंतु सरकार ला प्रश्न न विचारता विरोधी पक्षाला जबाबदार धरुन बातम्या तयार केल्या जातात. राहुल गांधीने चोर म्हणले तर राहुल गांधीला शिक्षा होऊन लोकसभा सदस्यत्व रद्द केले जाते. परंतु वृजभुषण सिंह यांच्या विरोधात नामांकित महिला लैंगिक शोषणाचा आरोप करतात तरीही अटक नाही, रंगावरून धर्म धोक्यात येतो अशी वल्गना करणारे लोक आदीपुरुष मध्ये देवाची व धर्माची पार वाट लाऊन टाकली तरीही गप्प, लव जिहाद वास्तविकतेपेक्षा जास्त सांगुन तिन मुलीच्या केस कस्टडीचा चित्रपट बनवून बत्तीस हजार मुलींचा खोटा आकडा सांगून वादंग व द्वेष निर्माण करून हिंसक भाषेचा वापर केला जातो. परंतु गुजरात मधून पाच वर्षात एकेचाळीस हजार महिला व महाराष्ट्रातुन तीन महिन्यांत पाच हजार महिला बेपत्ता होतात यावर मात्र कोणी बोलत नाही. देशामध्ये चुकिचे काम करताना एखादा मुस्लिम सापडला तर संपूर्ण मुसलमानांना आरोपी च्या रांगेत उभे करून मुस्लिम विरोधी बोलले जाते परंतु कुरुलकर देशाची गुप्त माहिती पाकिस्तान ला देतो, किरण पटेल सुरक्षा यंत्रणेची ऐसीतैसी करून झेड सुरक्षा घेतो सर्व जण गप्प. का गुन्हांचे गांभीर्य बघितले तर फाशीची शिक्षाही कमीच आहे. परंतु यावर कोणी बोलत नाही. आफताब मुसलमान नसुन त्या घटनेमध्ये जबरदस्ती लव जिहाद चा मुद्दा उपस्थित करून मुस्लिम द्वेषाचे राजकारण केले जाते. आणि साने तुकडे करून, कुकर मध्ये शिजवून, मिक्सर मधून काढुन घेतो एवढी निर्घृण हत्या केली जाते तेव्हा आफताब ला गुन्हेगार म्हणणारे सानेच्या वेळी गप्प बसतात. आरोपींना सुट द्यावी असे मुळीच नाही परंतु आरोपीची जात नाही गुन्हा बघुन शिक्षा व्हावी हे महत्त्वाचे. संताचा अवमान झाला म्हणून



ओरड करणारे वारकऱ्यांवर लाठीमार होतो तर गप्प बसतात तेव्हा मात्र यांच्या बुद्धीची कीव येते. आणि कोणती गोष्ट बरोबर कोणती गोष्ट चुक हे फक्त सत्ताधारी राजकारणी ठरवून संस्कार, संस्कृती आणि इतिहासाची मोडतोड केली जाते. आणि यातच यांना धन्यता वाटते. धर्म, गाय, मंदिर, चोर, चौकीदार असे शब्द वापरायला भिती वाटत आहे. आणि गंभीर गुन्हेगारांवर शांततेत कारवाई आहे. एकंदरीत बघितले तर केवळ सत्ताधारी लोकांनी सांगितले तेच अंतिम सत्य मानायचे आणि यांच्या विरोधात कोणी बोलले तर सत्तेशी संबधीत लोकच अरेरावी ची भाषा करून तेढ निर्माण करतात आणि त्यात मिडीया तेल टाकते. सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यां नेत्यावर मात्र कोणतीही कार्यवाही होत नाही. शैक्षणिक अभ्यासक्रम बदलून दर्जाहीन व काल्पनिक बाबीवर आधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. शालेय अभ्यासक्रम चुकिच्या पद्धतीने आणुन सत्य इतिहास लपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज परिस्थिती पाहता प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती सत्ताधारी लोकांना त्रस्त आहे. याचे पडसाद सोशल मिडीयावर दिसुन येत आहेत. परंतु सत्ता व पैशाच्या जोरावर सोशल मीडियावर सुद्धां बंधने आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे सर्व थांबवण्यासाठी विरोधी पक्षातील लोकांनी एकत्र येणे हे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण होय. परंतु केवळ सत्तापालट व्हावी म्हणून एकत्र येत असतील तर हेही घातक आहे. सत्तेमध्ये येऊन संविधानाची अंमलबजावणी व मुलभूत हक्क अधिकाराचे संरक्षण हा उद्देश असेल तर ही बाब देशाची लोकशाही वाचवू शकते.

परंतु यामध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो म्हणजे संविधान व लोकशाही वाचवण्यासाठी निघालेल्या विरोधी पक्षांनी बैठक घेतली पण त्यामध्ये आंबेडकरवादी नेत्यांचे काय स्थान आहे ? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श माणूस अनेक राजकीय पक्ष गट तट निर्माण झाले. संविधान व सामाजिक न्यायासाठी नेहमी आंबेडकरवादी नेते तत्पर असतात. भारतीय संविधान, सामाजिक न्याय, लोकशाही चे जतन, हक्क अधिकाराचे संरक्षण ह्या मुद्याच्या नावाखाली राजकारण करणारे आणि उच्च शैक्षणिक व बौद्धिक पातळी असणारे अनेक आंबेडकरवादी, संविधानतज्ञ देशात आहेत. त्यापैकी कोणत्याही नेत्यांना बैठकीसाठी बोलवण्यात आले नाही याचाच अर्थ स्वतः ला राजकीय ताकदवर समजणारे आंबेडकरवादी नेते राजकीय दृष्टीकोनातून स्वतः ची ताकद काय ? जर ताकद असेल तर बैठकीला का नाही बोलावले ? स्वतः ला आंबेडकरवादी आणि विद्वान समजणाऱ्या नेत्यांनी अंहकार व स्वप्नातुन बाहेर येऊन संघटीत होणे शहाणपणाचे ठरेल. आंबेडकरवादी नेते फक्त मर्यादित लोकांमध्येच मीच कसा श्रेष्ठ याची स्पर्धा करत आहेत. बाहेर मात्र एकी आणि संघटीत नसल्याने कोणतेही महत्त्व नाही. जे लोक संघटीत होत नाहीत त्यांना विद्वान आणि आंबेडकरवादी कसं म्हणायच ? विरोधी पक्ष बैठकीमधुन आंबेडकरवादी नेत्यांनी काही धडा घेतला नाही तर यांच्या गटा तटाने जे चळवळीचे नुकसान केले आहे आणि राजकीय सत्ता दुर केली आहे ती दरी कधीच भरून निघणार नाही. चार पाच लोकांनी आमच्या नेत्या सारखा नेताच नाही असे बोलुन सामाजिक व राजकीय महत्त्व मुळीच वाढत नाही. राजकीय महत्त्व वाढवायचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन एका मताने नेतृत्वाचा विचार न करता केवळ समाजिक हक्क अधिकार आणि संविधानासाठी एकीची ताकद दाखवणे आवश्यक आहे. आज बेकीने गटा तटाने आहात तर काहीच हाती नाही. परंतु एकी ने संघटीत झाले तर काही तरी हाती येईल. बेकीने बाहेरून नुसता आक्रोश केल्या पेक्षा काही लोकांना आत पाठवून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करावा. स्वतः च्या गट तटाच्या डबक्यात राहुन त्यालाच विश्व समजून त्या विश्वास मध्ये मलाच मानसन्मान आहे या भ्रमामधुन बाहेर येणे गरजेचे आहे. निवडणुकीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो प्रत्येक पक्षाच्या बँनरवर असतो परंतु निर्णायक बैठकीला आंबेडकरवादी नेत्यांना बोलावले जात नाही कारण त्यांना माहिती आहे की कोणत्याही नेत्याच्या मागे बहुसंख्य समाज नाही. आणि निवडणुकीत कोणत्याही नेत्याला हाताशी धरले तर लगेच गळाला लागतो व त्याच्या मागे काही मत मिळतात. संविधान विरोधी लोक निवडणुकी पुरते का होईना आंबेडकरवादी नेत्यांना एकत्र आणतात, निवडणुकीत हेच आंबेडकरवादी लोक त्यांना मदत करतात त्यांचे लोक आत जातात आणि हे आहेतच बाहेर. परंतु आंबेडकरवादी लोक एकत्र येऊन आंबेडकरवादी विचाराचा विद्धान सभागृहात असायला पाहिजे या साठी कोणीच एकत्र येत नाही. एकत्र आल्यावर काय होते आणि नाही आले तर काय होते याचे परिणाम दिसुनही आंबेडकरवादी नेते एकत्र येत नाहीत. संघटीत होत नाहीत म्हणून तर यांना कुठेच महत्त्व प्राप्त होऊन वजन निर्माण होत नाही हि वस्तुस्थिती नाकारुन जमणार नाही. थोडक्यात काय तर आपण मंथन केले तर आपल्या लक्षात येते आंबेडकरवादी नेत्यांची दखल का घेतली जात नाही तर एक म्हणजे ते संघटीत नाहीत. संघटीत का नाहीत याचे अनेक कारणे आहेत. दुसरे म्हणजे निवडणुकीच्या वेळी आंबेडकरवादी नेते सहज कोणत्याही प्रकारची अट न ठेवता कोणत्याही पक्षा सोबत जातात. म्हणून यांचे वजन निर्माण होत नाही आणि दखल घेतली जात नाही. एकत्रित आले तर आंबेडकरवादी विचारधारेचे पाच सहा खासदार फक्त महाराष्ट्रातून लोकसभेवर जाऊ शकतात एवढी ताकद असतानाही ती विखुरली गेल्याने एकही खासदार नाही. म्हणून आंबेडकरवादी नेत्यांनी थोडा मनाचा मोठेपणा दाखवून एकत्र येणे गरजेचे आहे. आंबेडकरवादी नेते सोडून सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन जो लढा देत आहेत तो लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आहे हि गौरवाची बाब आहे परंतु सत्ता हि बहूजन नेत्याच्या हाती आणि बहुजन समाजाच्या विकासासाठी असली पाहिजे. सनातन धर्माचा जय करून विषमता व द्वेष पसरवून बहूजन समाजातील लोकांचे हक्क अधिकार हिसकावून घेतले जात आहेत याचे भान ठेवून व सर्वात महत्त्वाचे ईव्हीएम ला विरोध करून बँलेट पेपर वर निवडणूक घेतली तरच सत्ता बहुजन समाजाकडे येऊ शकते. केवळ विरोधी पक्षानी एक येऊन जमणार नाही तर निवडणूक बँलेटवर झाली तर विजय निश्चित होऊन लोकशाही वाचण्यासाठी आपण सकारात्मक प्रयत्न करू शकाल. नाही तर सर्व काही व्यर्थ जाईल.

# बाल भिक्षेकरी जटील समस्या



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वेळ काळ परिस्थिती माणसाला घडविते बिघडविते . परिस्थिती आणि वेळेचा फायदा घेऊन आपल्याला कोणी वापरू करू नये अथवा आपल्या आयुष्या व भविष्या सोबत खेळू नये हि मानसिकता असेल तर ज्ञानाची शिक्षणाची कास धारा कोणी कितीही प्रयत्न केले तरी ते प्रयत्न ज्ञाना समोर निष्फळ ठरतात.मुलं हि देशाचं भवितव्य असतात. त्यांच्या भविष्य सोबत खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही.बाल भिक्षा हि खरंच मुलांची मजबुरी आहे कि त्यांना आपल्या फायद्यासाठी कोणी वापरतंय हे पण शोधन महत्वाचं आहे. बाल भिक्षेकरी या मध्ये फक्त मुलंच नाहीत तर मुलं आणि मुलींचं प्रमाण हे जवळपास सारखच आहे.**

हि गंभीर परंतु चिंतेची बाब असुन बाल भिक्षा हि एक ज्वलंत आणि जटील समस्या असुन राज्यातील वेगवेगळ्या भागात सर्वदूर पसरलेली हि समस्या संपुष्टात येण्यासाठी शिक्षण हाच मुख्य उपाय असुन मुक्तिचा मार्ग आहे. शिक्षणाचा अभाव हेच मुख्यत्वे बाल भिक्षेकरू समाजात अढळण्याच निर्माण होण्याचं मुख्य कारण आहे.शिक्षण हे वाघिणीचे दुध असल्याने त्या पासुन कोणीही वंचित राहणार नाही एवढी दक्षता घेणं गरजेचं आहे. सामाजिक पातळीवर असो कि व्यक्तिगत कौटुंबिक पातळीवर शिक्षण हेच प्रगतीच लक्षणं आहे. समाजाच्या पातळीवर समस्या निर्माण होण्याची काही करणं असतात त्या मध्ये काही समस्या ह्या नैसर्गिक असतात तर काही समस्या ह्या पडद्याआडून लादल्या जातात .मग बालभिक्षेकरू हि नैसर्गिक समस्या तर नक्कीच नाही. मग पडद्याआडून हि समस्या लादण्यात काही शक्ति सहभागी आहेत का ? या मध्ये स्वारस्य नेमकं कोणाचं आहे ? स्वार्थापोटी मुलांना हा व्यवसाय करण्यासाठी कोणी प्रवृत्त तर करत नाही ना ? मग याच मुळ काय आहे ? पोटाची खळगी भरण्यासाठी कि कोणाच्या हातची कटपुतली म्हणून या व्यवसायाला जीवनाची व्याख्या न समजलेली हजारो लहान लहान मुलं बळी पडत आहेत. हे अगदी वास्तव आहे. हि समस्या कठिण असलीतरी प्रयत्न केला तर निश्चित बदलु शकते.अथवा पुर्ण पणे संपुष्टात येऊ शकते. आयुष्य घडण्याच नेमकं वय हे बाल वय असतं या वयात ज्या पद्धतीने संस्कारा होतील उपदेश होतील त्या नुसार व्यक्तिमत्व आकारास येत असत . लहान वयात ज्या हातात वही पेन पुस्तक येणं अपेक्षित असतं नेमकं त्याच वयात या हातात जर भिक्षापात्र आलं तर हि खूप वेदनादायक बाब असुन सामाजिक पातळीवर अजुनही किती मोठ्या प्रमाणात आर्थिक दरी आहे याच या मधून दर्शन घडतच आहे . हक्काचं शिक्षण आणि वेगवेगळे जीवनावश्यक अधिकार या पासुन अजुनही अनेक वेगवेगळे समाज घटक वंचित आहेत मग अशा वंचितांचा वाली कोण आहे. अगदी लहान लहान वयातील मुल मुली ज्यांच वय शिक्षणाचं आहे खेळण्याच आहे बागडण्याच आहे .नेमकं त्याच वयात जीवनाचा आनंद लुटायचा सोडून हि कोमल नाजुक मुलं मंदिर परिसरात तसंच सार्वजनिक ठिकाणी भिक मागतात हि खूप जटिल आणि गंभीर स्वरूपाची समस्या आहे. पण गंभीर समस्या आहे म्हणून चालणार नाही यावर योग्य मार्ग शोधला गेला पाहिजे.हे कोमल नाजुक जीव त्यांचं उज्वल भविष्य घडलं पाहिजे त्या अनुषंगाने सामाजिक पातळीवर त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होण गरजेच आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागात मग देवस्थाना पासुन बस स्थानक परिसरा पर्यंत ते सार्वजनिक गर्दीच ठिकाण जिथे जिथे आहे त्या ठिकणी वेगळ्या अवस्थेतील लहान वयातील मुलं मुली ही भिक मगातान ज्या अवस्थेत स्थिती मध्ये दिसतात आणि ज्या पद्धतीने आचरण करतात यावरून हि स्थिती पोटाची खळगी भरण्यासाठी तर नक्कीच नाही पण कोणीतरी पडद्याआडून यांना प्रशिक्षित करून आपल्या स्वार्थ साठी वापरत आहे पण या मध्ये या निरागस मुलांचं भविष्य मात्र उध्वस्त होतोय .हि मुलं नेमकी कोण आहेत त्याच बरोबर यांना इतरत्र कोणती शक्ति पडदया अडुन नियंत्रण ठेवुन यांच्या कडुन हा व्यवसाय करून घेत आहे याचा सामाजिक पातळीवर शोध होण गरजेच तर आहेच पण ह्या भयानक विळख्यात अडकलेली हि नाजुक मुलं त्यांचं माणुस म्हणून पुनर्वसन होण गरजेच आहे. या मागे असणारे सुत्रधार हि खूप मोठी विकृती आहे. या विकृतीच्या चक्रव्युहातुन या निरागस मुलांची सुटका करून त्यांना यथा योग्य शिक्षण देऊन त्यांचं पुनर्वसन करण गरजेचे आहे.शिक्षणाच्या माध्यमातून या मुलांचं पुनर्वसन झालं तर त्याचं भविष्य निश्चितच सुरक्षित होईल.



# CSMSS कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश नोंदणीसाठी ३० जूनपर्यंत संधी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक येथे विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता पॉलिटेक्निक प्रवेशासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १ जुन २०२३ पासून नावनोंदणी सुरु झाली असून प्रवेश नोंदणीसाठी शनिवार, ३० जुनपर्यंत शेवटची संधी आहे.

विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळावी, तसेच ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मदत व्हावी. यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाने सुविधा केंद्राची स्थापना केली आहे. या सुविधाकेंद्रावर विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्र अपलोड करणे, सर्व विद्याशाखांची माहिती, त्यांचे मागील वर्षाचे कट -ऑफ, प्रवेशासाठी लागणारे कागपत्रांची माहिती, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व शिष्यवृत्यांची




माहिती, तसेच पॉलिटेक्निक अभ्यासक्रम पूर्ण केल्यांनतर शाखानिहाय भविष्यातील संधी इत्यादी बाबत सविस्तर समुपदेशन केले जात आहे. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक (एफ. सी. क्रमांक - २१७६) हे पॉलिटेक्निक प्रवेशासाठी शासनाचे मान्यता प्राप्त सुविधा केंद्र आहे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे सहसंचालक श्री. उमेश नागदेवे यांनी प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी भेटीदरम्यान विद्यार्थी, पालक व सुविधा केंद्रातील स्टाफ यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी विद्यार्थी व पालकांनी सांगितले की छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमधील सुविधा केंद्रावर सर्वोतोपरी मोफत मार्गदर्शन व नाव नोंदणीसाठी मदत केली जाते. तसेच या महाविद्यालयामधील उपलब्ध सोयी सुविधाबाबत समाधान व्यक्त केले. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या सुविधाकेंद्रावर येऊन पॉलिटेक्निक प्रवेशासाठी नाव नोंदणी केली आहे. याबद्दल सहसंचालक उमेश नागदेवे यांनी समाधान व्यक्त केले.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमधील उत्तीर्ण होणारे विद्यार्थी दरवर्षी विविध नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पदावर रुजू होतात. येथील वैविध्यपूर्ण शिकवण्याची पद्धत, अद्यावत लॅबोरेटरीज, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, भव्य क्रीडांगण, स्वच्छ व नैसर्गिक वातावरण यामुळे येथील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व ते खात्रीशीर उच्च शिक्षण किंवा चांगल्या नोकरीवर हजर होतात. येथे उपलब्ध असलेल्या सुविधा केंद्र व मार्गदर्शन केंद्राचा विद्यार्थी तसेच पालकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी केले.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जनावरांना चरण्यासाठी घेऊन गेलेल्या गुरख्यावर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना शुक्रवारी, २३ जून रोजी गुडेगाव नियत क्षेत्रातील संरक्षित वनाच्या सीमेपासून अंदाजे २०० मीटर अंतरावरील शेतात घडलेली आहे. सीताराम कांबळे, वय ४५, रा. गुडेगाव असे मृत गुरख्याचे नाव आहे. भंडारा वनविभागाअंतर्गत येणाऱ्या पवनी वनपरिक्षेत्रातील सहवनक्षेत्र सावरला नियतक्षेत्र गुडेगाव येथील कक्ष क्रमांक २३८ या संरक्षित वनालगत असलेल्या शेतात सुधाकर कांबळे गुरे चारण्यासाठी गेले होते. मात्र जवळच दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला चढवून त्यांना ठार केले. तसेच सदर घटनेची माहिती प्राप्त होताच सहायक वनसंरक्षक वाय.बी नागुलवार, वनपरिक्षेत्र अधिकारी एच.डी. बारसागडे हे आपल्या वनक्षेत्रातील क्षेत्रीय वन कर्मचारीसह तसेच पोलीस ठाणे पवनी येथील पोलीस निरीक्षक हे त्यांचे कर्मचाऱ्यांसह व प्राथमिक प्रतिसाद दलातील सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. उपवनसंरक्षक भंडारा राहुल गवई, विभागीय वन अधिकारी (दक्षता) पी. जे. कोडापे, सहाय्यक वनसंरक्षक साकेत शेंडे, सहाय्यक वनसंरक्षक रोशन राठोड यांनी मृतांच्या नातेवाईकांना ग्रामीण रुग्णालय पवनी येथे भेट घेऊन सांत्वन केले. वन विभागाद्वारे मृताच्या पत्नीस आर्थिक मदत म्हणून शासन निर्णयाप्रमाणे तात्काळ देय असलेली रक्कम दहा लक्ष रुपयांचे धनादेश व पंधरा हजार रुपये रोख मदत करण्यात आली.

सदर वाघाचा शोध घेण्याकरिता जलद कृती दल नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प यांना पाचरण करण्यात आलेले आहे. सदर वन्य प्राण्यावर निगराणी ठेवण्याकरिता परिसरामध्ये ट्रॅप कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.



# शेवगाव येथील हत्याकांड निषेधार्थ मुक मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**निलकंठ कराड**

**शेवगाव :** येथील व्यापारी गोपीकिशन गंगाकिशन बलदवा (वय ५५ वर्ष) यांच्या शेवगाव शहरातील भरमध्यवस्ती मध्ये असलेल्या बालाजी मंदिराजवळ मारवाडी गल्लीत दरोडा टाकून त्यामध्ये गोपीकिशन बलदवा व त्यांच्या मोठ्या भावजय पुष्पा हरिकिशन बलवा (वय ६५ वर्ष) या दोघांचा या दरोड्यामध्ये मृत्यू झाला. त्याचबरोबर गोपीकिशन यांच्या पत्नी सुनिता बलदवा दरोडेखोराकडून झालेल्या हल्यात भंभीर जखमी झाल्या या घटनेचा निषेधार्थ व झालेल्या घटनेचा लवकरात लवकर तपास करून आरोपीस अटक होणेसाठी शेवगाव तालुका माहेश्वरी समाजाच्या वतीने शेवगाव तहसील कार्यालायवर मूक मोर्चाचे आयोजन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले होते या निवेदनामध्ये त्यांनी असे म्हंटले कि, माहेश्वरी समाज अल्पसंख्यांक असून कुठल्याही वादात नसतो, आपलं घर आणि आपला व्यापार ह्या चाकोरीतून बाहेर कधीही जात नाही, तरीही या समाजावर समाजकंटकाकडून अथवा दरोडेखोराकडून नियमित हल्ले होत असतात.

या विषयाची गंभीर दखल घेऊन आपण जातीने लक्ष घालून या घटनेचा लवकरात लवकर शोध लावावा आणि यातील आरोपींना कडक शिक्षा करण्यात यावी, जेणेकरून कुठल्याही दरोडेखोराकडून असे कृत्य करण्यासाठी हिंमत होणार नाही. सदर घटनेची उच्च स्तरीय तपास यंत्रनेमार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मूक मोर्चामध्ये समाजबांधवासह विविध समाजातील नागरिक, मोठ्या प्रमाणात महिला वर्ग, व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.यावेळेस विविध पदाधिकारी यांनी आप आपल्या भावना तीव्र स्वरुपात व्यक्त केल्या असून, येत्या आठ दिवसात या घटनेचा तपास न लागल्यास राज्यभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा या वेळेस सरकार व प्रशासनास देण्यात आला. बालाजी मंदिरापासून सुरु झालेला मोर्चा मुख्य बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, क्रांती चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे तहसील कार्यालयामध्ये आला यावेळेस मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. या वेळेस झालेल्या सभेत शेवगावचे आमदार मोनिकाताई राजळे, प्रताप ढाकणे, क्षितीज घुले, यांच्यासह माहेश्वरी समाजाचे विविध जिल्ह्यातून आलेले पदाधिकारी यांचे भाषणे होऊन नायब तहसीलदार प्रविण सानप यांना निवेंदन देण्यात आले.

यावेळेस प्रदेशअध्यक्ष मधुसूदन गांधी, छत्रपती संभाजीनगर येथील जगदीश बियाणी, सत्यनारायण सारडा, ओमप्रकाश तापडिया, अजय जाजू , अनिश मणियार, दिलीप बजाज, राजेंद्र राठी , शामसुंदर सोमाणी, अजित नावंदर, उमेश मुंदडा , महेश सोमाणी, दामोधर बजाज, लक्ष्मीकांत लखोटिया, मनीष बाहेती, अतुल डागा, नितीन मालानी, पुरुषोत्तम बिहाणी, वल्लभ लोहिया, प्रविण लाहोटी, प्रकाश लड्डा, श्रीकांत लड्डा, ओमप्रकाश बिहाणी, जगदीश धूत, सुभाषचंद्र बाहेती, दिलीप मुंदडा, राधेश्याम मुंदडा, संतोष लाहोटी,कृष्णा ढोरकुले, बंडू रासने, रिंकू फलके, बापूसाहेब पाटेकर, विजयराव देशमुख, विष्णू घनवट, शरद जोशी, सन्नी देशमुख, खंडू बुलबुले, यांचेसह तालूक्यातील महिला व नागरिक मोठा संख्येने उपस्थित होते, यावेळेस प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक बी.चंद्रेकांत रेड्डी , उप विभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील, पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या सह मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# संस्कार सरकची टाटा कंपनीमध्ये निवड

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील चांदापुरी येथील सदाशिव देठे निवासी प्रशाला व ज्यू कॉलेज विद्यार्थी घडवण्यात अव्वल ठरत आहे.या कॉलेजचा ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी संस्कार सरक टाटा कंपनीमध्ये ट्रेनी म्हणून रुजू होत आहे.2022-23 मध्ये विज्ञान मधून अकरावी व बारावी प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण आहे. आज तो कॉलेजमध्ये आला त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर प्रचंड समाधान व आनंद अश्रू ओसंडून वाहत होते.सर्वांना पेढे वाटून संस्थापक चेअरमन यांच्या पायाचे दर्शन घेतले आणि म्हणाला सर माझा पहिला पगार मी शाळेला देणार आहे, कारण आपले कॉलेज व शाळा मोठी झाली पाहिजे!

सदर विद्यार्थ्यांस तीन वर्षे इंजिनिअरिंग चा कोर्स करत असताना महिन्याला 15800 विद्यावेतन,सर्व सोयी सुविधा (PF सह) व कोर्स पूर्ण केल्यावर नोकरीची संधी सुद्धा टाटा कंपनीमध्ये मिळणार आहे.प्रत्येक मुलाचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी टाटा कंपनी सकारात्मक आहे तसा विश्वास डॉ कुमार लोंढे यांना कंपनी व्यवस्थापन यांनी दिला आहे. या सर्व निवडीसाठी टाटा कंपनीचे HR मॅनेजर मयूर सोनवणे,चेअरमन डॉ.कुमार लोंढे यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.संस्कार सरक याची निवड झाल्याबद्दल संस्थेच्या सचिव डॉ.पंचशीला लोंढे प्राचार्य के.साठे यांनी पुस्तक व पेढे भरवून विशेष सत्कार केला.प्रा एन.सरक,प्रा आर.वायदंडे,प्रा.ए पठाण,प्रा.व्ही.देवकाते,प्रा.शेख सर,ए. धुमाळ सर,काळे मॅडम,अरुणा मॅडम,आकाश सरतापे इ सर्व स्टाफ ने सदिच्छा देऊन स्वागत केले.




# तरुणाकडून गावठी बंदुकीसह काडतुसे जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वेगवेगळ्या कारणांमुळे संवेदनशील झालेल्या शहरात गावठी बंदूक आणि दोन जिवंत काडतूसे घेऊन फिरणाऱ्या तरुणाविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याच्याकडून सुमारे २७ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. मुजाहिद अहमद (३३, रा. देविका मल्ला, आदम नगर, मालेगाव) हा गावठी बंदूक विक्रीच्या उद्देशाने धुळे तालुक्यातील आर्वी येथे आला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मुंबई-आग्रा महामार्गावरील आर्वी गावालगत असलेल्या लकी स्टार हॉटेलजवळ पोलिसांनी सापळा रचून मुजाहिदला ताब्यात घेतले. अंगझडतीत २५ हजार रुपयांची गावठी बंदूक आणि दोन हजार रुपयांचे दोन जिवंत काडतूस असा २७ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला.



# पोलिसांकडून बनावट देशी-विदेशी दारू जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ट्रक क्र. GJ. 08 AU 2358 या कंटेनर मध्ये बेकायदेशिररित्या विदेशी दारुचे खोके भरण्यात आले असून वाहन ने दिल्ली येथून मुंबईकडे धुळे मार्गे जात आहे अशी बातमी मिळाल्यावरुन मा. पोलीस अधीक्षक धुळे व मा. अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मुंबई-आग्रा महामार्गावर सोनगीर पोलीस ठाणे हद्दीत धुळे कडे येणारी वाहने चेक करीत असताना कंटेनर धुळेकडे जात असल्याचे दिसल्याने त्यास अडथळा करुन थांबविले. त्यावरील चालकास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव रमेश मुन्शीराम कुमार रा. आझाद नगर कॉलनी, इसहार ता. जि. इसहार ( हरीयाणा राज्य ) असे सांगितले.

त्यास कंटनेर मधील मालामधील विचारपुस केली असता, चालकाने उडवा उडवीचे माहिती दिली. कंटेनर मधील मालाचा अंबुस उग्र वास येत असल्याने सदरचे कंटनेर चालकाससह पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आवारात आणुन कंटनेर मधील मालाची तपासणी करता त्यात खालील नमुद वर्णनाची देशी-विदेशी दारु मिळुन आली.

एकूण ३२,२२,५६०/- रु. किं. ची देशी-विदेशी दारुचे ३८० बॉक्स कंटनेरसह जप्त करण्यात आला असून सदर आरोपी विरूध्द सोनगीर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे. तसेच आरोपीने सदरचा माल कोठून आणला व डिलेवरी कोठे देणार होता या चेन मध्ये आणखी कोण आरोपी आहेत या बाबत विचारपूस चालू आहे.

सदरची कारवाई श्री. संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, धुळे श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्री. हेमंत पाटील, योगेश राऊत, बाळासाहेब सुर्यवंशी, प्रकाश पाटील, दिलीप खोडे, श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, संदीप सरग, संतोष हिरे, प्रकाश सोनार, मयुर पाटील, राहुल गिरी, कमलेश सुर्यवंशी, मायुस सोनवणे, प्रशांत चौधरी, देवेंद्र ठाकुर, योगेश साळवे अशांनी केली आहे., संतोष हिरे, प्रकाश सोनार, मयुर पाटील, राहुल गिरी, कमलेश सुर्यवंशी, मायुस सोनवणे, प्रशांत चौधरी, देवेंद्र ठाकुर, योगेश साळवे अशांनी केली आहे.





# ज्ञानेश्वर वाघ यांना उत्कृष्ट योग क्रीडा शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त क्रीडा भारती देवगिरी प्रांत यांच्याकडून योगाचा प्रचार आणि प्रसार या आयामामध्ये ज्ञानेश्वर गयाबाई विठ्ठलराव वाघ यांना उत्कृष्ट योग क्रिडा शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार डॉ. पुरुषोत्तम भापकर सर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा हेडगेवार रुग्णालयातील दामूअण्णा सभागृहात पार पडला. यावेळी विभागीय संघचालक बबनराव जागडे, हेडगेवार रुग्णालयचे अध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, योगाचार्य डॉ. उत्तम काळवणे, क्रीडा भारतीचे प्रमुख पंकज भारसाखळे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

डॉ. भापकर यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, योग शिकणे सोपे आहे पण योग जीवनशैली म्हणून जगणे कठीण काम आहे. पुणे, परभणी सारख्या जिल्ह्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना एक हजार शिक्षक योग प्रशिक्षित करता आले आणि त्यांच्या माध्यमातून ८ लाख विद्यार्थ्यांपर्यंत योगा नेता आला, याचा आनंद आहे. यावेळी पंकज भारसाखळे म्हणाले, खेळाडू आणि प्रशिक्षकांचा सन्मान हा नित्याने होतच असतो. मात्र योग क्षेत्रात योगदान देणाऱ्या लोकांचा पण सन्मान करता यावा म्हणून हा पुरस्कार सुरू करण्यात आला. भविष्यात योग आणि विविध खेळाडूंसाठी 'क्रीडा भारती' आगामी काळात अनेक कार्यक्रम घेणार आहे.

चाटे स्कुलच्या योग विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमाची सुरुवात झाली. योग प्रशिक्षक अंजली देशपांडे, कैलास शिवणकर, प्रमिला आव्हाळे यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. संदीप जगताप यांनी केले.

# संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हर्सुल येथे करा योग,,रहा स्वस्थ चा मंत्र देत मयूरपार्क येथील विश्वास मल्टिपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये जागतिक योग दिनानिमित्त एक दिवसीय योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या योग शिबिरात योग परीक्षकांकडून विद्यार्थ्यांना योगा चे महत्व व विविध आसने या वेळी करून घेत योगा आपल्या आयुष्यात किती महत्वाचा आहे त्याचे आपल्या शरीराला किती फायदे आहेत यावेळी विद्यार्थ्यांना समजवून सांगण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रशिक्षकांसह प्रमुख पाहुने म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. श्री जगदीश जी देसले सर, श्रीमती लीनाजी देसले, संस्कार बालक मंदिर पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.कल्पना भाले मॅडम, व प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती राहत मॅडम, यांची उपस्थित होती. कार्यक्रमासाठी शिक्षक व कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले. सहशिक्षिका श्रीमती योगिता भोजने व श्रीमती वर्षा पाटील, श्रीमती अमृता मॅडम, श्रीमती रूपाली वायकोस मॅडमसह विद्यार्थ्यांसह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# ४४९७ विद्यार्थ्यांना मिळणार मोफत गणवेश

## १३ लक्ष ४९ हजार रुपयांचा निधी शासनाकडून प्राप्त

आधुनिक केसरी न्यूज

राज्य शासनाकडून प्रति विद्यार्थी एक गणवेशासाठी ३०० रुपये मिळतात .धर्माबाद तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी १३ लाख ४९ हजार १०० रुपये समग्र शिक्षा अभियान खात्यावर वर्ग झाला असून मुख्याध्यापकांना त्यांच्या सोयीनुसार गणवेश खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . पहिल्या गणवेश खरेदीसाठी कोणत्याही आर्थिक अडचणी नसून विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गणवेश दिला जाईल . **एच . डी . काकडे गट शिक्षण अधिकारी**

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या पहिली ते आठवीपर्यंतच्या ४४९७ पात्र विद्यार्थ्यांना यंदा शासनाकडून दोन मोफत गणवेश दिला जाणार आहेत.पहिल्या गणवेशासाठी शासनाकडून १३ लक्ष ४९ हजार १०० रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे, अशी माहिती तालुका गट शिक्षण अधिकारी एच. डी. काकडे यांनी दिली आहे.

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षण उपक्रमांतर्गत पहिली ते आठवीच्या अनु. जाती, जमाती, दारिद्रय रेषे खालील सर्व विद्यार्थी आणि सर्व प्रवर्गातील मुलींना दरवर्षी मोफत गणवेश राज्य सरकारद्वारे दिला जात असतो. धर्माबाद तालुक्यातील जारीकोट ( १७ ) चिकना ( १४ ) रत्नाळी ( ११ ) आणि बाळापूर ( १४ ) चार केंद्राअंतर्गत एकूण ५६ शाळा पात्र आहेत. या सर्व शाळेतील अनु जाती - ७८० ( मुले ), अनु. जमाती - ४४६ ( मुले ) बिपीएल - ५३१, मुली - २७६० असे एकूण ४४९७ विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. दरवर्षी गणवेश खरेदी व वितरण, कलर निर्धारण शालेय व्यवस्थापन समितीद्वारे केली जाते.मात्र यंदा राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी 'एक राज्य एक गणवेश' योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना एकाच रंगाचा गणवेश देण्याची घोषणा केली होती.तसेच हा गणवेश राज्य शासना मार्फत देण्यात येणार असल्याचे घोषित केले होते. मात्र, अनेक शाळांनी गणवेश वाटपाची प्रक्रिया सुरू केल्याने नव्या शासकीय योजनेमुळे त्यात अडचणी निर्माण होण्याची चर्चा सुरू झाली. यावर तोडगा म्हणून शासनाकडून दोन गणवेशांऐवजी एक गणवेश देण्याचा निर्णय झाला. तर दुसरा गणवेश शाळा व्यवस्थापन समितीने देण्याचा मध्यम मार्ग काढण्यात आला.

मात्र या सर्व खेळखंडोबात गणवेश वितरण प्रक्रियेला उशीर झाला असून शाळा सरू होऊनही बहुतांश शाळेत अजूनही विद्यार्थ्यांना गणवेशच मिळाला नाही. लवकरात लवकर गणवेश वाटप व्हावा अशी मागणी पालकांकडून केली जात आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या
स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)
पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.
फीस - 300 रू.
संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्स्लटींग उपलब्ध
पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.



# सब्जी मुटके :

आधुनिक केसरी

लय भारी **सुगरण**



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

1 वाटी मुगाची डाळ, 1 वाटी हरभरा डाळ ,1 चमचा धणे, 2 चमचे जीरे , 1 चमचा मिरे , 1 चमचा बडिशेप , 2 चमचे तीळ , 7..8 लाल मिरच्या , 7..8 लसूण पाकळ्या, अर्धा इंच आले ,कोथिंबीर, चिमूटभर खाण्याचा सोडा , अर्धी वाटी दही , अर्धा चमचा साखर , चवी प्रमाणे मीठ , तेल , 1 मोठा कांदा ,1 सिमला मिरची , 1गाजर, कोथिंबीर , हळद , 2 चमचे खोबऱ्याचा किस .

**कृती :** प्रथम दोन्ही डाळी 5..6 तास भिजवून ठेवाव्यात. मग गॅसवर कढई ठेवून ती थोडी तापली की गॅस एकदम बारीक करावा .त्यात धणे, मिरे, बडीशेप , जिरे व लाल मिरच्या घालून सतत परतून 7..8 मिनिटे कुरकुरीत भाजून घ्यावे व मिक्सर मधून मसाल्याची जाडसर पूड करून ठेवावी. नंतर डाळी भिजल्या की त्यातील पाणी काढून त्या मिक्सर मधून जाडसर वाटून त्यातील पाव डाळ बाजूला काढून बाकीच्या डाळीत दही घालून अगदी थोडेसे व्हायपर वर फिरवावे. आले व लसूण ठेचुन घ्यावे.
नंतर मिक्सर मधील डाळीचे वाटण एका बाऊल मध्ये काढून घेऊन त्यात हळद ,मीठ व पाऊण मसाला ,साखर घालावी .सर्व भाज्या बारीक चिरून त्यामध्ये घालाव्यात .थोडी कोथिंबीर सजावटी साठी बाजूला ठेवावी .शेवटी त्यात सोडा घालून छान मिक्स करून घ्यावे .
गॅसवर मोठ्या कढईत पाणी घालून मध्ये वाटी ठेवून त्यावर चाळणी ठेवुन त्यात केलेल्या मिश्रणाचे मूटके करुन 7..8 मिनिटे मोठ्या आचेवर छान वाफवून घ्यावेत .नंतर सुरी मुटक्यात खुपसून व्यवस्थित वाफल्याची खात्री करून घ्यावी .व बाहेर काढून घ्यावेत .
आता कढई मध्ये 2 चमचे तेल घालून जिरे ,हिंग ,तीळ घालून मस्त फोडणी करून त्यामध्ये मुटके घालून बाजुला ठेवलेला मसाला आणि खोबऱ्याचा किस घालून परतावे .नंतर सर्व्हिंग डिश मध्ये काढून वरून कोथिंबीर घालून सर्व्ह करावेत .

**वैशिष्ट्य :** हे मुटके खमंग व खूपच चविष्ट लागतात . डाळी आणि भाज्यांचा समावेश असल्यामुळे पौष्टिक व भरपूर प्रथिने , जीवनसत्वे यांनी परिपूर्ण अशी सुरेख डिश आहे .मसाल्याची लज्जत काही औरच लागते . चटपटीत खाणार्यांना नक्की आवडेल .करून पहाच.असेच आवडतील त्या मेथी ,पालक यांच्या सारख्या पालेभाज्यान्चे सुद्धा मुटके खूप टेस्टी लागतात .



# हाफिज सिद्दीकीनगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 12 मध्ये हाफिज सिद्धिकी नगर व परिसरातील अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण व गटार काम करणे या 60 लक्ष रुपयात कामाचा शुभारंभ आमदार फारुक शहा यांचे पुत्र शहेबाज शाह यांच्या हस्ते करण्यात आला या भागातील नागरिकांना पावसाळ्यात रस्त्या न असल्यामुळे फार त्रास सहन करावा लागत होता तसेच पावसाळ्यात पाण्याच्या निचरा होत नसल्यामुळे या भागात पावसाळ्यात संपूर्ण पाणी तुंबून जात होते त्यामुळे या भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या मोठा प्रश्न निर्माण होत होता या भागात व परिसरात जेव्हापासून हाफिज सिद्दीकी नगर वसले तेव्हापासून आजपर्यंत कोणत्याही आमदारांनी या परिसरात ढुंकून सुद्धा पाहिले नव्हते असा स्थानिक नागरिकांचा आरोपही होता. परंतु आमदार फारुक शहा यांचे विकासाचे काम बघता या भागातील नागरिकांनी आमदार फारुक शाह यांच्याकडे या भागातील अंतर्गत रस्ते व गटारीसाठी निधीची मागणी केली होती त्याला तात्काळ प्रतिसाद देत आमदार फारुक शाह यांनी महाराष्ट्र सुरण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 12 मध्ये आपली सिद्धिकी नगर व कबीर कबीर गंज परिसरातील गटारी व रस्त्यांसाठी निधी मंजूर करून आणला व त्याचे आज शुभारंभ करण्यात आले या शुभारंभ च्या कार्यक्रमाच्या वेळेस या भागातील नागरिकांनी आमदार फारुक शाह यांचे आभार मानले व धुळे शहरासाठी परत आपल्यासारखा आमदार विकास करू शकतो म्हणून पुढच्या वेळेस सुद्धा या भागातील नागरिक आपले कार्य बघून आपल्याला मतदान करतील असे आश्वासन या भागातील नागरिकांनी दिले व यावेळेस या भागातील प्रतिष्ठित नागरिकांनी आमदार फारुक शाह यांचा सत्कार केला या कार्यक्रमाच्या वेळेस

शहेबाज शाह यांच्या सोबत मौलवी शकील,डॉ. शराफत अली, अब्दुल हाफिज अन्सारी,रशीद मामू अन्सारी,इम्रान आझमी,आसिफ कुरेशी,अयुब खान,सुफी कुरेशी,प्यारेलाल पिंजारी,कलीम अन्सारी,इकबाल शाह, अकलाख अन्सारी,शकील शाह,शेर खान,इम्रान खान,वसिम पिंजारी,बाला भैय्या अन्सारी,हालिम शामसुद्दिन,मोहम्मद अन्सारी,खुस्तर खान,समीर पिंजारी, जाकीर अन्सारी,जमील अन्सारी,सलमान खान, सउद अन्सारी, जैद अन्सारी व भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या सभेला गर्दी जमवण्यासाठी अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व रोजगार सेवक सरसावले

## शासन आपल्या दारी कार्यक्रमासाठी प्रशासन सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** शासन आपल्या दारी या योजने अतंर्गत राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री आज नांदेड दौऱ्यावर असुन, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व गर्दी जमवण्यासाठी लोहा तालुक्यातील प्रशासन सज्ज झाले असुन,लोहा शहरास ग्रामीण भागातुन सभेसाठी मुख्यमंत्र्यांच्या सभेला जाण्यासाठी शासनाच्याच वतीने वाहनांची व भोजनाची व्यवस्था केल्याचे नागरीकातुन बोलले जात आहे.

एकाच ठिकाणी सरकारच्या योजना गोरगरिबांच्या घरापर्यंत पोहोचवण्याचा मार्ग म्हणुन सरकार जनतेच्या घरी जाईल कृषी,ग्रामविकास योजना,कामगाच्या किंवा आदिवासी मायनॉरिटीच्या वेगवेगळ्या अनेक योजना एकाच प्लटफॉर्मवर मिळाव्या यासाठी सरकारच्या वतीने शासन आपल्या दारी अभियानास सुरुवात केली खरी, परंतु शासन आपल्या दारी असेल तर मग नांदेड येथे आयोजीत कार्यक्रमास जाण्याची काय गरज आहे, असे म्हणत शासनाच्या या कार्यप्रणालीवर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. सद्या राज्यात खरीप पेरणीचे दिवस दिवस असुन, प्रशासनाच्या वतीने शासन आपल्या दारी या उपक्रमात अंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या सभेला लाभार्थी व नागरिक घेवून जाण्यासाठी प्रवासच सरसावले आहे तालुक्यातुन शासनाच्या वतीने सर्व खर्च करुन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या सभेला गर्दी जमवण्यासाठी प्रशासनच सरसावले असल्याचे चित्र पहावयास मिळत मिळत आहे. सध्या राज्यासह तालुक्यात शासनाच्या वतीने शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवण्यात येत असुन, शासनाच्या सर्व योजना व सुविधा घेवून शासन आपल्या दारी येत असल्याच्या जाहिराती सध्या सर्वत्र दिसत आहेत. प्रत्यक्षात मात्र शासन आपल्या दारी या उपक्रमा अंतर्गत आज राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह तुटपुंज मंत्रीमंडळ नांदेड दौऱ्यावर येत असुन, नांदेड येथे भव्य दिव्य कार्यक्रमासाठी तेवढीच गर्दी जमण्याची जबाबदारी प्रशासनावर देण्यात आली असुन सर्व विभागास प्रत्येक गावातुन लाभार्थी व नागरीकांना घेवून येण्याची जबाबदारी देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे,जर शासन आपल्या दारी येत असेल तर आपण नांदेड येथे जाण्याची काय गरज असे ही काहींचे म्हणने आहे. अशा परिस्थितीत बळीराजा पावसाअभावी व शासनाच्या मदतीअभावी मेटा कुटीला आला असून शासनाचे येणारे अनुदानही आज घडी पर्यंत शेतकऱ्यांच्या हाती लागले नसून बळीराजा वरून राजाच्या आणि शासनाच्या कृपेवर अवलंबून असल्याचे दिसून येत आहे. आज घडीला शासन आपल्या दारी अशी जाहिरात देऊन लाभार्थ्यांना कागदपत्र देण्याची आवश्यकता नाही शासनास आपणास कागदपत्र देत आहे. हे भुलताप देऊन एकाही कार्यालयात सर्वसामान्यांचे काम होत नसल्याचे दिसून येत आहे. फक्त आणि फक्त मलिदा लाटण्याचे काम शासकीय कार्यालयात दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी विशेषता पक्ष घातल्यास ही वेळ येणार नसल्याचे सर्व सामान्य जनतेतून बोलले जात आहे.

# कामगाराला अग्निशमन दलामुळे जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सहकानगर भागातील एका इमारतीच्या तळमजल्यावर यांत्रिक पार्किंगसाठी खोदलेल्या खड्ड्यात सफाई कामगार पडल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन खड्ड्यात पडलेल्या जखमी कामगाराला बाहेर काढल्याने तो बचावला. सहकारनगर भागातील ज्ञानदीप सोसायटीत यांत्रिक पार्किंगसाठी १५ फूट खड्डा खोदण्यात आला आहे. इमारतीच्या तळमजल्यावर तुकाराम देठे सफाई करत होते. त्यावेळी देठे यांचा तोल गेला आणि ते खड्ड्यात पडले.

# ट्रकच्या धडकेने टेम्पो चालकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**लोणावळा :** खंडाळा घाटातील अंडा पॉईंटजवळ अवजड ट्रकने मालवाहू टेम्पोला धडक दिल्याने चालकाचा मृत्यू झाला. अपघातात दोघेजण जखमी झाले असून, जखमींमध्ये शाळकरी मुलाचा समावेश आहे.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून खंडाळा घाटातून मुंबईकडे भरधाव ट्रक निघाला होता. अंडा पॉईंट येथील तीव्र उतार आणि वळणावर ट्रक चालकाचा ताबा सुटला आणि ट्रकने दोन मालवाहू टेम्पोला धडक दिली. ट्रक उलटला. त्या वेळी ट्रक उलटून मालवाहू टेम्पोवर आदळल्याने टेम्पो चालकाचा मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच राज्य रस्ते विकास महामंडळाचे देवदूत पथक, खोपोलीतील अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या संस्थेतील कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. टेम्पोतील जखमींना बाहेर काढण्यात आले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. खोपोली पोलीस, आयआयबीचे पथक, महामार्ग पोलिसांच्या पथकाने क्रेनच्या सहायाने टेम्पो, ट्रक बाजूला काढला. अपघातानंतर काही काळ या भागातील वाहतूक विस्कळीत झाली होती.





# देवगिरी बँकेने बांधला विद्यापीठात सिमेंट बंधारा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील दुसऱ्या बंधाऱ्याचे खोलीकरण व काँक्रीटीकरण सोहळा हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी अध्यक्षपद भूषविले.
जलतज्ञ सर्जेराव वाघ, प्र कुलगुरु डॉ. श्याम शिरसाठ, कुलसचिव डॉ. भगवान साखळे, व्यवस्थापन परिषद सदस्य व सिनेट सदस्य उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना हरिभाऊ बागडे यांनी देवगिरी बँकेशी बँकेच्या स्थापनेपासून असलेल्या जिव्हाळा अधोरेखित केला आणि बँकेच्या प्रगती बद्दल कौतुक केले. या कार्यक्रम प्रसंगी बोलताना देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी बँकेच्या विविध सामाजिक कार्याची माहिती दिली. तसेच फेरोसिमेंट बंधारा आणि त्याचे फायदे तसेच उपयोग यांची माहिती दिली.
मनाली कुलकर्णी यांनी सूत्र संचालन केले तर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास देवगिरी बँकेचे संचालक जयंत अभ्यंकर , संदीप पंडित, उप मुख्य कार्यकारी अधिकारी रुपेंद्र कोयाळकर व कर्मचारी तसेच विद्यापीठातील मान्यवर उपस्थित होते.

# बाजार सावंगी स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल शाळेचे नवोदय परीक्षेत घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल या शाळेने नवोदय परीक्षेत घवघवीत यश मिळविले. सन 2022-23 या शैक्षणिक वर्षात पार पडलेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत सार्थक शेषराव काटकर या विद्यार्थ्यांची निवड झाली. या यशस्वी विद्यार्थ्याला प्राचार्य कल्पना विलास साळुंखे यांचे मार्गदर्शन मिळाले. सार्थक हा विद्यार्थी अतिशय बुद्धिमान, हुशार, संयमी असून अपेक्षेप्रमाणे त्याला यश मिळाले व त्याची निवड झाली. त्यास त्याचे आई-वडील यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले. त्याची जिद्द, चिकाटी, अभ्यासू वृत्ती या गुणामुळे सार्थक ने उत्तुंग भरारी घेऊन यश संपादन केले. या अगोदर शाळेतील शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये ओम मुक्तेश्वर गायकवाड, गणेश भाऊसाहेब गायकवाड, शैक्षणिक वर्ष2018-19 मध्ये तेजस्विनी सुरेश नलावडे, शैक्षणिक वर्ष 2019-20मध्ये ऋतुजा खंडू नलावडे, गौरी भाऊसाहेब गायकवाड, संकेत देवबा मोकासे, आदित्य गणेश तुरे, शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये समीक्षा बाळू काटकर, कुमारी कीर्ती बळीराम महालकर, शैक्षणिक वर्ष 2021-22 सुदर्शन बळीराम महालकर तसेच आता शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये सार्थक शेषराव काटकर या सर्व विद्यार्थ्यांची नवोदय मध्ये निवड झाली आहे. शाळेने यशाची परंपरा कायम राखली असून या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विलास रामदास साळुंखे, प्राचार्य कल्पना विलास साळुंखे, योगेश झिणे, अरुण साळुंखे ,यादव डहाके, मनोज इंगळे, जाधव प्रवीण, अनुज काथार, गणेश



पुंजाराम दांगोडे, जीवन राजपूत, शिवा चंदनसे, पवन कामठे, आकाश आवटे, नलावडे सुरेखा, दांगोडे ज्योती गणेश, आरती रघु, काटकर पूजा, माधुरी खडके, कल्याणी चव्हाण, ऋतुजा सोळुंके, मोनिका डहाके, शीला श्रीखंडे, ज्योती नलावडे, प्रियंका भागवत, भाग्यश्री मैंद, धुमाळ आरती, शेख रेश्मा, प्रिया बोर्डे आदी नी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या. सार्थकचे सर्व समाज माध्यमातून तसेच पत्रकार बंधू, सरपंच, गावकरी मंडळी, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ परिसरातील शिक्षण प्रेमी व अधिकारी वर्ग यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# पाथ्री येथे स्मार्ट कॉटन उपप्रकल्पांतर्गत कापूस खरीप हंगामापूर्वी प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाथ्री येथे शुक्रवार रोजी मौजे पाथ्री येथे स्मार्ट कॉटन उपप्रकल्पांतर्गत कापूस खरीप हंगामपूर्व प्रशिक्षण ग्रामपंचायत समोर घेण्यात आले. सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक ( आत्मा ) जगदीश जाधव यांनी स्मार्ट कॉटन योजनेचे महत्त्व, उद्दिष्ट "एक वाण एक गाव" या संकल्पने नुसार एक जिन्सी कापूस लागवड करून गटामार्फत कापसाच्या गाठी बनवणे आणि सामुदायिक विक्री करणे याबाबत शेतकऱ्यांना समजून सांगितले. तसेच मल्टी टास्किंग ग्रेडर नागेश सोमवंशी, यांनी कापसाच्या वाण पासून ते लागवड, वेचणी, कापसाच्या गाठी तयार करणे आणि विक्रीपर्यंतची पारदर्शक प्रक्रिया शेतकऱ्यांना समजून सांगितली. तसेच डॉ. गंगाधर पाथ्रीकर कृषी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक बी. डब्ल्यू. गाडेकर यांनी शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच सरपंच राजेंद्र एकनाथ पाथ्रीरीकर यांनी पदाधिकाऱ्यांचे आभार मानत शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया करणे आणि गटामार्फत कापसाचे एक वाण लागवड करून सामुदायिक विक्री करण्याचे आवाहन केले. सदरील कार्यक्रमास डॉ. गंगाधर पाथ्रीकर कृषी महाविद्यालयचे सहाय्यक प्राध्यापक बी. डब्ल्यू. गाडेकर, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ( आत्मा ) मकरंद ननावरे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक ( आत्मा ) जगदीश जाधव, कॉटन मल्टी टास्किंग ग्रेडर नागेश सोमवंशी, कृषी सहाय्यक प्रितेश अजमेरा, महिला आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक संदीप नांदवे, उपजीविका सल्लागार शिवाजी भोसले, लेखापाल पंडित भोकरे , गावचे सर्व प्रतिष्ठित पदाधिकारी सरपंच, उपसरपंच, योजनेतील सहभागी आणि इतर शेतकरी उपस्थित होते.



# नांदेड जि.प.समोर 28 जूनला शिक्षक सेनेचे लाक्षणिक उपोषण

## वेतन एक तारखेलाच मिळावे

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जिल्हातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे वेतन एक तारखेला मिळत नसल्यामुळे वेतन हे एक तारखेलाच व्हावे व वेतनात अनियमत्ता करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करुन योग्यती कार्यवाही करण्यासाठी नांदेड जि.प.समोर दि.28|6|2023 रोज बुधवार सकाळी 10=30 ते सायं. 5=30 पर्यंत शिक्षक सेनेच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक ऊपोषण करण्यात येणार आहे. शिक्षकांचे पगार हे दर महिण्याला एक तारखेला व्हावेत आसे शासनाचे सक्त आदेश आसतांना नांदेड जिल्हात गेल्या दिड वर्षा पासून वेतन हे दर महीण्याच्या शेवटच्या आठवड्यातच होत आहे.2021 पासून पगारीसाठी बजट आले किती व खर्च झाला किती याची चौकशी झाली पाहीजे शिक्षण विभागातीलकाही कर्मचारी स्वताःच्या आर्थीक स्वार्थासाठी शिक्षकांची आर्थीक पिळवणूक करुण बजेट इतरत्र वळून पगारात अनियमित्त आणत आहेत, मेडीकल बिल आर्थीक स्वार्थासाठी विलंब, सातवा वेतन आयोगाचा, पहिला दुसरा तिसरा हत्ता जमा न होणे, 4%यरियस अद्याप न मिळणे, निवडश्रेनी नाही,चट्टोपाध्यय नाही,पदोन्नत मु.अ.पद भरणे कॉंसलींग नाही, विषय शिक्षकांच्या याद्या आपडेट नाहीत, केंद्रप्रमुख पदे भरणे संभ्रम,म.दर्शन नाही, शिक्षकांच्या फाईली वर्षानवर्षो निकाली नाही, या सर्व शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी शिक्षक सेनेच्या वतीने लक्षणिक ऊपोषणास होणार आहे तरी जिल्हातील जास्तीजास्त शिक्षक बांधवांनी ऊपोषणात प्रत्यक्ष सहभाग नोंदवावा. असे आहवान शिक्षक सेनेचे राज्य ऊपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण,जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, विभागीय सहसचिव विठ्ठल देशटवार, श्रीरंग बिरादार,रवी बंडेवार,गंगाधर कदम,अनिरुद्र शिरसाळकर,बळी पा.शिंदे, अविनास चिद्रावार, मुस्तफा शेख़,शिवाजी पा.महिला प्रतिनिधी सुकन्या खांडरे,पंचफूला वागमारे,शोभा गिरी,जिल्हा कार्यकारणी व तालुका कार्यकारणी यांनी केले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर